अध्याय सव्विसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो देव जगन्मोहन । मोहिनीमोहना आद्यकारण कार्यकारणातीत चिद्घन । जय जनार्दन जगद्गुरू ॥ १ ॥ जगासी पडे मायामोहन । तें तूं निर्दळिसी ज्ञानघन । जगीं जगद्रूप जनार्दन । कृपाळू पूर्ण दीनांचा ॥ २ ॥ दीनासी देवमाया स्त्रीरूपें । भुलवी हावभावखटाटोपें । ते स्त्रीमोहादि मोहक रूपें । जनार्दनकृपें निर्दळिती ॥ ३ ॥ जेथ वैराग्य वाढे संपूर्ण । तेथ जनार्दनाची कृपा पूर्ण । वैराग्य तेथ ब्रह्मज्ञान । सहजें जाण ठसावे ॥ ४ ॥ जीव सहजें ब्रह्मचि आहे । तो मायागुणें जीवत्व वाहे । जेवीं भद्रीं निजेलेनि रायें । तो स्वप्नींचें लाहे रंकत्व ॥ ५ ॥ त्यासी राजपदा यावया जाण । सेवक करिती थापटण । तेवीं वैराग्य निर्दळी त्रिगुण । जीवा ब्रह्मपण स्वयंभचि ॥ ६ ॥ ऐसें स्वयंभ जोडल्या ब्रह्म पूर्ण । तेव्हां स्त्री पुरुष हें मिथ्या ज्ञान । मृषा दृश्याचें दृश्यभान । भोग्यभोक्तेपण असेना ॥ ७ ॥ असो साधकासी देवमाया । स्त्रीरूपें ये भुलवावया । तेथ स्मरतां भावें गुरुराया । जाय विलया स्त्रीबाधू ॥ ८ ॥ सद्गुरूचें निजनाम एक । निवारी बाधा महादोख । वैराग्य उपजवी अलोलिक तेणें होय निजसुख साधकां ॥ ९ ॥ निर्विशेष निजसुखदाता । आम्हां सद्गुरुचि तत्त्वतां । त्याचे चरणीं ठेवितां माथा । सुखसंपन्नता साधकां ॥ १० ॥ संत साधकांची निजमाउली । शांति निजसुखाची साउली । जनार्दनकृपेच्या पाउलीं । कथा चालिली यथार्थ ॥ ११ ॥ हाता आलिया निजनिर्गुण । साधक होती सुखसंपन्न । तदर्थ करावें माझें भजन । हें बोलिला श्रीकृष्ण पंचविसावां ॥ १२ ॥ भावें करितां भगवद्भजन ।

जगन्मोहन, मोहिनीला मोहित करणाऱ्या, आद्य कारणरूप देवा ! तुला नमस्कार असो. कार्य-कारणातीत व ज्ञानस्वरूप जनार्दनरूपी जगद्गुरूचा जयजयकार असो. १ जगावर जें मायेचें आवरण पडतें, तें तूं ज्ञानस्वरूप जनार्दन कृपादृष्टीनें नाहिंसें करितोस, असा तूं दीनजनांवर कृपा करणारा आहेस. २ ही देवाची माया या दीनजनांस स्त्रीरूपानें हावभाव करून स्त्रीमोहादिकांच्या रमणीय रूपानें भुलवीत असते. पण स्त्रीमोहासारखी मोहक असलेलीं तीं अनिष्ट स्वरूपें जनार्दनाच्या कृपेनें नाश पावतात. ३ जेथें पूर्ण वैराग्य वाढतें, तेथें जनार्दनाची पूर्ण कृपा आहे, असें समजावें. जेथें विरक्ति असते तेथें ब्रह्मज्ञान सहज ठसतें. ४ जीव स्वभावतः ब्रह्मच आहे. तो मायेच्या गुणांमुळें जीवत्वाला प्राप्त होतो. एखादा मऊ शय्येवर निजलेला राजा स्वप्नांत स्वतःला भिकारी झालेले पहातो, ५ पण त्याचे सेवक त्याला पुनः राज्यपद भोगण्यासाठीं हलवून जसे जागे करितात, त्याप्रमाणें वैराग्यानें तीन गुणांचा नाश केला कीं, जीवांचें ब्रह्मत्व स्वयंसिद्धच आहे. ६ असें स्वयं-सिद्ध ब्रह्म प्राप्त झालें असतां स्त्री-पुरुष हें ज्ञान मिथ्या ठरतें. दृश्याचें दृश्यभान मिथ्या ठरल्यावर भोग्य व भोक्तेपणा उरतच नाहीं. ७ अशा प्रकारें ही देवमाया साधकाला स्त्रीरूपानें भुलविण्यास येतें. त्यावेळीं भक्तिभावानें गुरुरायाचें स्मरण केलें असतां स्त्रीरूपी मायेचा बाध नाहींसा होतो. ८ सद्गुरूचें केवल नांव महादोषांची बाधा घालवितें. मनांत अलौकिक विरक्ति उपजवितें. त्यायोगानें साधकाला आत्मसुख मिळतें. ९ आम्हांला निर्विशेष आत्मसुख देणारा खरोखर एक सद्गुरूच आहे. त्याच्या चरणांवर मस्तक ठेविलें असतां साधक सुखसंपन्न होतो. १० संत साधकांची माउली व शांतिसुखाची छायाच आहे. अशा जनार्दन कृपेच्या आश्रयानें यथार्थ कथा चालली आहे. ११ निर्गुणाची प्राप्ति झाली असतां साधक सुखसंपन्न होतात. त्यासाठीं माझें भजन करावें, असें श्रीकृष्णानें पंचविसाव्या अध्यायांत सांगितलें. १२ भक्तिभावानें माझें भजन करीत असतां देवता स्त्रीरूपानें येऊन विघ्न करितात. त्यांचा नाश करण्यासाठीं

देव दारारूपें करिती विघ्न । तें निर्दळावया जाण । माझें नामस्मरण करावें ।। १३ ।। अच्युत हें स्मरतां नाम । प्रतापें निर्दळी कर्माकर्म । सकळ पातकें करी भस्म । दाटुगें नाम हरीचें ।। १४ ।। नामें होइजे विरक्त । नामें निर्मळ होय चित्त । नामें साधे गुणातीत । नामें निर्मुक्त भवपाश ।। १५ ।। नामीं लोलिंगत चित्त । भवभय रिघों न शके तेथ । नामीं विश्वास ऐसा जेथ । भगवंत तेथ तुष्टला ।। १५ ।। दुष्टसंगें विषयासक्त । जरी झाला लोलिंगत । अनुताप उपजलिया तेथ । होय विरक्त क्षणार्धें ।। १७ ।। महादोषासी प्रायश्चित्त । केवळ अनुताप निश्चित । अनुतापेंवीण प्रायश्चित्त । तो जाण एथ विटंबू ।। १८ ।। अनुतापाएवढा सखा । जगीं आणिक नाहीं लोकां । धडाडिल्या अनुताप देखा । सकळ पातकां निर्दळी ।। १९ ।। अनुतापा चढलिया हात । क्षणार्धें करी विरक्त । येचि अर्थीं ऐलगीत । हरि सांगत उद्धवा ।। २० ।। सविसाव्या अध्यायीं येथ । विषयासक्त ज्याचें चित्त । त्यासी व्हावया विरक्त । ऐलगीतप्रस्तावो ।। २१ ।।

श्रीभगवानुवाच—मल्लक्षणमिमं कायं लब्धा मद्धर्म आस्थितः ।
आनन्दं परमात्मानमात्मस्थं समुपैति माम् ।। १ ।।

ब्रह्म लक्षिजे परिपूर्ण । हेंचि कायेचें मुख्य लक्षण । तें हें मानवी शरीर जाण । परम पावन तिहीं लोकीं ।। २२ ।। मनुष्यदेहीं अधर्म । करितां नातुडे परम ब्रह्म । तेथ करावे भागवतधर्म । जे कां परम

माझें नामस्मण करावें. १३ 'अच्युत' या नांवाचें स्मरण केलें असतां, त्याच्या प्रभावानें कर्म-अकर्म हीं दोन्ही नष्ट होतात. हरीचें नांव इतकें समर्थ आहे कीं, तें सगळ्या पातकांचें भस्म करितें. १४ हरिनामाच्या प्रभावानें विरक्ति येते. चित्तशुद्धि होते. गुणातीत होतां येतें आणि नामच भवपाशांतून सोडवितें. १५ चित्त एकदा नामांत लुब्ध झालें म्हणजे तेथें भवभय प्रवेश करूं शकत नाहीं. इतका ज्याचा विश्वास असतो, त्यावर भगवंत संतुष्ट होतो. १६ दुर्जन संगतीनें जरी कोणी विषयलोलुप झालेला असला तरी त्याला पश्चात्ताप होतांच तो क्षणार्धांत विरक्त होतो. १७ पश्चात्ताप हेंच महादोषांचें प्रायश्चित आहे. पश्चात्तापावांचून प्रायश्चित घेणें म्हणजे ती केवल विटंबनाच होय. १८ या जगांत लोकांना पश्चात्तापासारखा दुसरा कोणीहि मित्र नाहीं. पूर्ण पश्चात्ताप झाला असतां तो सगळ्या पातकांचा नाश करितो. १९ एकदां पश्चात्ताप दृढ झाला कीं, एका क्षणांत विरक्ति येते. यासंबंधीं श्रीहरि ऐलगीत म्ह० पुरूरवा राजानें गायिलेली कथा उद्धवाला सांगत आहे. ज्याचें चित्त विषयासक्त असतें त्याला विरक्त होण्यासाठीं ऐलगीताची प्रस्तावना या सव्विसाव्या अध्यायांत केली आहे. २१

[या सव्विसाव्या अध्यायांत दुष्टांच्या संगतीनें योगनिष्ठेचा विघात व साधुसंगतीनें तिची पराकाष्ठा सांगितली आहे. संगामुळें योग्याचा सर्वथा योगविभ्रंश होतो. यास्तव सर्वथा संगनिवृत्तीसाठीं ऐलगीत सांगितलें जातें.]

—वर चौतिसाव्या श्लोकांत विद्वानानें निःसंग होऊन माझें भजन करावें, असें सांगितलें. उलटपक्षीं अनर्थाचें कथन करणारे भगवान् 'तर मग जीवन्मुक्ताचाहि संग अनिवार्य आहे, त्यामुळेंहि अनर्थ प्राप्त होईल' अशी आशंका घेऊन पूर्वोक्तानुवादपूर्वक पुढील अडीच श्लोकांनीं तिचें निवारण करितात—

श्रीभ० उ०—श्रीभगवान् म्हणाले, मल्लक्षणं इमं कायं लब्ध्वा—ज्याच्यावरून माझें लक्षित होतें अशा या नरदेहास पुरुष प्राप्त होऊन, मद्धर्मे आस्थितः सन्—माझ्या भक्तिलक्षण धर्मामध्यें सर्वथा स्थित होऊन, आत्मस्थं परमात्मानं आनंदं मां समुपैति—स्वशरीरांतच नियंतृत्वानें राहिलेल्या परमानंदरूप मज आत्म्याला प्राप्त होतो. १.

ब्रह्माला पूर्णपणें जाणावें, हेंच नरदेहाचें मुख्य कर्तव्य आहे. हा मनुष्यदेह तीन्ही लोकीं परम पवित्र आहे. २२ मनुष्य देहांत अधर्माचरण केलें असतां परम ब्रह्म प्राप्त होत नाहीं. यास्तव परम पावन भागवत धर्माचें अनुष्ठान

पावन ।। २३ ।। भागवतधर्में करितां भक्ती । निर्मळ होय चित्तवृत्ती । जीव तोचि ब्रह्म निश्चिती । ऐशी शुद्ध स्फूर्ती ठसावे ।। २४ ।। ठसावल्या ब्रह्मस्फूर्ति । होय स्वानंदाची अवाप्ती । तेणें परमानंदी लीन होती । हे शुद्धप्राप्ती पैं माझी ।। २५ ।। माझिये प्राप्तीचें लक्षण । देहीं असतां वर्तमान । सर्वथा नाहीं विषयस्फुरण । तेंचि निरूपण हरि सांगे ।। २५ ।।

गुणमय्या जीवयोन्या विमुक्तो ज्ञाननिष्ठया । गुणेषु मायामात्रेषु दृश्यमानेष्ववस्तुतः ।
वर्तमानोऽपि न पुमान् युज्यतेऽवस्तुभिर्गुणैः ॥ २ ॥

जे मूळ अज्ञानाची खाणी । जे संसारप्रवाहाची श्रेणी । जे तिहीं गुणांची जननी । माया राणी अनादि ।। २७ ।। मायागुणयोगें पहा हो । सोळा कलांचा संभवो । तो वासनात्मक लिंगदेहो । जीवासी पहा हो दृढ झाला ।। २८ ।। ज्या लिंगदेहाचिये प्राप्ती । भोगी नाना सुखदुःखसंपत्ती । पडे स्वर्गनरक-आवर्ती । मिथ्यामरणपंक्ती स्वयें सोशी ।। २९ ।। वंध्यापुत्राचा पराचार । तैसा जीवासी संसार । देहा-भिमानें केला थोर । अपरंपार अनिवार्य ।। ३० ।। तेथ गुरुवाक्यें ज्ञानानुभवो । पाहतां मायेचा अभावो । लिंगदेह झाला वावो । जीव जीवभावो तो मिथ्या ।। ३१ ।। जेंवी उगवलिया गभस्ती । अंधारेंसी हारपे राती । तेवी गुरुवाक्ये ज्ञानप्राप्ती । मायेची स्थिति मावळे ।। ३२ ।। एवं नासल्या गुणविकार । जीव-न्मुक्त होती नर । जेवीं कुलालचक्र । भंवे साचार पूर्वभ्रमणें ।। ३३ ।। तेवी प्रारब्धशेषवृत्तीं । ज्ञाते निज-देहीं वर्तती । वर्ततांही देहस्थिती । देहअहंकृती असेना ।। ३४ ।। जेवीं कां छाया आपुली । कोणी गांजिली ना पूजिली । परी कळवळ्याची न ये भुली । तेवीं देहींची चाली सज्ञान ।। ३५ ।। तो देहाचेनि

करावें. २३ भागवत धर्मानें भक्ति केली असतां चित्तवृत्ति निर्मल होते आणि जीवच ब्रह्म आहे अशी शुद्ध निश्चित बुद्धि ठसते. २४ अशी ब्रह्मस्फूर्ति मनांत ठसली म्हणजे स्वानंदाची परमावधि होते. त्यामुळें ते परमानंदांत लीन होतात. तीच माझी शुद्ध प्राप्ति होय. शरीरानें सर्व व्यवहार चालले असतां सर्वथा विषयस्फूर्ति न होणें हेंच माझ्या प्राप्तीचें लक्षण आहे. त्याचेंच निरूपण आतां हरि करीत आहे. २६.

—अशा प्रकारच्या पुरुषाचा विषयसंग संभवत नाहीं, असें सांगतात—

गुणमय्या जीवयोन्या **विमुक्तः पुमान्**—त्रिगुणप्रचुर जी जीवोपाधि तिच्यापासून मुक्त झालेला पुरुष, **ज्ञान-निष्ठया अवस्तुतः दृश्यमानेषु माया मात्रेषु गुणेषु वर्तमानः** अपि **अवस्तुभिः गुणैः न युज्यते**—ज्ञाननिष्ठेनें मिथ्यात्वानें पाहिल्याजाणाऱ्या मायापरिणामरूप गुणांमध्यें रहात असूनहि मिथ्या गुणांनीं युक्त होत नाहीं. [गुणांना मिथ्या न समजणारे पुरुष त्यांमध्यें जरी आसक्त होत असले तरी ज्ञाननिष्ठेनें त्यांना मिथ्या मानणारे त्यांत आसक्त होत नाहींत, असा याचा भावार्थ] २.

जी मूळ अज्ञानाची खाण, संसारप्रवाहाची पंक्ति, तीन्ही गुणांची जननी तीच अनादि मायाराणी होय. २७ माया आणि तीन गुण यांच्यापासून सोळा तत्त्वें होतात. मनासह अकरा इंद्रियें व पांच विषय या सोळा कला मिळून वासनात्मक लिंगदेह होतो आणि तो जीवाला दृढ बद्ध करितो. २८ या लिंगदेहामुळें जीव नानाप्रकारची सुख-दुःखें भोगितो. स्वर्ग-नरकांच्या भोंवऱ्यांत पडतो. जन्म-मरणाचे फेरे व्यर्थ सोशितो. २९ वंध्या स्त्रीच्या मुलाचा जसा पाहुणचार तसा देहाभिमानानें जीवाचा संसार अनिवार वाढविला आहे. ३० त्या जीवाला जेव्हां गुरुवाक्यानें ज्ञानप्राप्ति होते. तेव्हां मायेचा अभाव होतो, लिंगदेह व्यर्थ होतो आणि जीवभाव मिथ्या ठरतो; ३१ सूर्य उगवतांच रात्र जशी अंधारासह नाहींशी होते. त्याप्रमाणे गुरुवाक्यानें ज्ञानप्राप्ति झाली असतां मायेचें अस्तित्व मावळतें. ३२ अशा प्रकारें गुणांचे विकार नाहींसे झाले म्हणजे मनुष्य जीवन्मुक्त होतो. कुंभाराचें चक्र जसें त्याला एकदां दिलेली गति संपेपर्यंत फिरत असतें. ३३ त्याप्रमाणें प्रारब्धकर्माचा शेष संपेपर्यंत आत्मज्ञानी विद्वान् देहांत राहून शरीरानें सर्व व्यवहार करीत असूनहि देहाभिमान धरीत नाहींत, ३४ आपल्या छायेला कोणी त्रास दिला किंवा तिची पूजा केली तर त्याबद्दल आपल्याला जसा हर्ष-विषाद वाटत नाहीं, त्याप्रमाणें आत्मज्ञानी देहाचें चलनवलन समजतो.

दैवमेळें । जरी विषयामाजीं लोळे । परी विकाराचेनि विटाळें । वृत्ति न मैळे अणुमात्र ॥ ३६ ॥ त्यासी विषयांचें दर्शन । समूळत्वें मिथ्या जाण । करितां मृगजळाचें पान । करा वोलेपण बाधीना ॥ ३७ ॥ गगनकमळांचा आमोद । जैं भ्रमर सेवी सुगंध । तैं सज्ञाना विषयसंबंध । निजांगीं बाध लागता ॥ ३८ ॥ असो अतर्क्य मुक्तांची स्थिती । परी मुमुक्षांलागीं श्रीपती । नियमाची यथानिगुती । निजात्मप्राप्तीलागीं सांगे ॥ ३९ ॥

सङ्गं न कुर्यादसतां शिश्नोदरतृपां क्वचित् । तस्यानुगस्तमस्यन्धे पतत्यन्धानुगाऽन्धवत् ॥ ३ ॥

शिश्नोदरार्थ आसक्त । स्वधर्मत्यागें अधर्मरत । ऐसे जे विषयासक्त । ते जाण निश्चित असाधू ॥ ४० ॥ऐसे जे असाधु जन । त्यांसीं सर्वथा आपण । संगती न करावी जाण । कायावाचामनःपूर्वक ॥ ४१ ॥ वोढाळेचे संगतीं पाहें । क्षणभरी गेलिया धर्मगाये । त्या क्षणासाठीं पाहें । लोढणें वाहे निरंतर ॥ ४२ ॥ यालागीं दुर्जनाची संगती । क्षणार्धें पाडी अनर्थीं । मुमुक्षीं ऐशियाप्रती । अणुमात्र वस्ती न वचावें ॥ ४३ ॥ लोहाराची आगिठी जैशी । सहजें पोळी भलत्यासी । दुर्जनाची संगती तैशी । पाडी अपभ्रंशीं भाविकां ॥ ४४ ॥ अवचटें असाधुसंगती । जोडल्या वाढे विषयासक्ती । तेणें उठी अधर्मरीती । विवेकस्फूर्तिघातक ॥ ४५ ॥ मावळल्या विवेकवृत्ती । अंध होय ज्ञानस्फूर्ती । आपण आपली न देखे गती । जेवीं आभाळी राती अंवसेची ॥ ४६ ॥ जेवीं अंधें अंध धरिल्या हातीं । दोघां पतन महागर्ती । तेवीं अविवेकाचिया स्थितीं । अंधतमा जाती विषयांध ॥ ४७ ॥ कुसंगाचा जो सांगात । तेणें वोढवे नरकपात । अनुताप सोडविता तेथ । ते ऐलगीत हरि सांगे ॥ ४८ ॥

---

३५ तो दैवयोगानें विषयामध्यें जरी लोळत असला, तरी त्या विकाराच्या विटाळानें त्याची वृद्धि अणुमात्रहि मलिन होत नाहीं, ३६ मृगजलाचें प्राशन केले असतां हात जसे ओले होत नाहींत, त्याप्रमाणें त्याला विषयाचें दर्शन समूळ मिथ्या भासतें. ३७ आकाशपुष्पाच्या परिमळाचा सुगंध जर भ्रमर सेवन करील तर ज्ञानी विषयांनीं बद्ध होईल. ३८ असो, याप्रमाणें मुक्तांची स्थिति अतर्क्य आहे. तरीहि श्रीहरि मुमुक्षूंना आत्मप्राप्ति करून देण्यासाठीं त्याविषयींचे नियम सांगत आहे. ३९.

—' असें जरी आहे तरी संग टाकावाच ' असें आतां सांगतात—

शिश्नोदरतृपां असतां संगं क्वचित् न कुर्यात्—शिश्न व उदर यांना तृप्त करणाऱ्या असाधूंचा संग केव्हांहि करूं नये. (अहो, अनेक असाधूंचा संग तर राहूं दे, पण—) तस्य अनुगः अन्धानुगाऽन्धवत् अन्धे तमसि पतति—एकाहि असाधूचें अनुवर्तन करणारा अंधाच्या मागून जाणाऱ्या अंधाप्रमाणें अंधतमांत पडतो. ३.

विषयोपभोग आणि उदरभरण यांतच आसक्त होऊन, स्वधर्माचा त्याग करून, अधर्मांत रत झालेले जे विषयासक्त असतात, ते असाधु होत. ४० असे जे असाधू असतात त्यांची संगति काया-वाचा-मनानें केव्हांहि धरूं नये. ४१ ओढाळ गुरांमध्यें चांगली गाय क्षणभर जरी मिसळली तरी तिच्या गळ्यांत निरंतरचें लोढणें जसें अडकतें; ४२ तशी दुर्जनांची संगति क्षणांत अनर्थांत टाकिते. अशा लोकांजवळ मुमुक्षूनें एक पळभरहि उभें राहूं नये. ४३ लोहाराची भट्टी जशी भलत्यालाच पोळते, त्याप्रमाणें दुर्जनांची संगति भाविकांसहि दुःखांत टाकिते. ४४ असाधूंची सहज जरी संगति घडली तरी विषयासक्ति वाढते. त्यामुळें विवेकस्फूर्तिचा घात करणारा अधर्म उचल खातो. ४५ विवेकवृत्ति मावळली कीं, ज्ञानाची स्फूर्ति आंधळी होते. त्यामुळे मेघांनीं व्याप्त झालेल्या आमावस्येच्या रात्रीं जसा गाढ अंधकार पसरलेला असतो, त्याप्रमाणें अज्ञानानें आवृत झालेला जीव स्वतःचीच गति स्वतः जाणूं शकत नाहीं. ४६ एका आंधळ्यानें दुसऱ्या आंधळ्याला हातीं धरून नेले असतां दोघेहि जसे मोठ्या खळग्यांत पडतात, त्याप्रमाणें अज्ञान जीवांची स्थिति होते. ४७ ते विषयांध अंधतमनांवाच्या घोर नरकांत पडतात. दुर्जनांच्या मेळ्यांत मिसळलें असतां नरकपातच ओढवतो. त्यांतून पश्चात्ताप सोडवितो. त्याविषयीं हरि ऐलगीत सांगत आहे. ४८.

ऐलः सम्राडिमां गाथामगायत बृहच्छ्रवाः । उर्वशीविरहान्मुह्यन्निर्विण्णः शोकसंयमे ॥ ४ ॥

समुद्रवलयांकित क्षिती । सकळ रायांचा राजपती । पुरूरवा चक्रवर्ती । ज्याची ख्याती पुराणीं ॥ ४९ ॥ तेज प्रभाव महाशौर्य । उचित वदान्य गांभीर्य । महिमा महती अतिवीर्य । धर्मधैर्य पुरूरवा ॥ ५० ॥ राजधर्मांचिया नीती । स्वधर्में प्रतिपाळी क्षिती । ब्राह्मण तितुका ब्रह्ममूर्ती । हा भाव निश्चितीं रायाचा ॥ ५१ ॥ प्राणांतेंही आपण । न करी ब्राह्मणहेळण । गायीलागीं वेंची प्राण । करी संरक्षण दीनांचें ॥ ५२ ॥ ऐसा धार्मिक ऐलचक्रवर्ती । तोही उर्वशीचे आसक्तीं । भुलोनि ठेला भूपती । निजात्मगती विसरला ॥ ५३ ॥ तेणें अनुतापें गायिली गाथा । ते तुज मी सांगेन आतां । परी त्याची पूर्वावस्था । कामासक्तता ते ऐक ॥ ५४ ॥ विसरोनि निजमहत्त्वासी । अतिदीन झाला वेश्येसी । कामविर्से लावी मनुष्यासी । तें ऐलइतिहासीं हरि सांगे ॥ ५५ ॥ ऐलउर्वशीकामासक्ती । सवेंचि अनुतापें विरक्ती । हे कथा बोलिली वदोक्ती । तेचि यदुपति स्वयें सांगे ॥ ५६ ॥ उर्वशीपुरूरव्यांचा संबंधू । नवम स्कंधीं असे विशदू । तेणें जाणोनियां गोविंदू । एथ कथाअनुवादू न करीच ॥ ५७ ॥ पूर्वकथासंबंधः उर्वशी स्वर्गभूषण । नारायणें धाडिली आपण । तो उर्वशीसी गर्व पूर्ण । श्रेष्ठपण मानूनी ॥ ५८ ॥ तया गर्वाचिये स्थिती । ताल चुकली नृत्यगतीं । तेणें ब्रह्मशापाची प्राप्ती । तुज मानवी हो गती भूतळीं ॥ ५९ ॥ उश्शाप मागतां तिसी । ब्रह्मा सांगे तियेपाशीं नग्न देखिल्या पुरूरव्यासी । स्वर्गा येसी निमेषमात्रें ॥ ६० ॥ ऐशा लाहोनि शापासी । भूतळा आली उर्वशी । देखोनि

—याविषयी इतिहास सांगतात—

बृहच्छ्रवाः ऐलः सम्राट् उर्वशीविरहात् मुह्यन् शोकसंयमे निर्विण्णः सन् इमां गाथां अगायत—पुरूरवा या नांवाचा चक्रवर्ति व ज्याची कीर्ति फार मोठी आहे असा प्रसिद्ध राजा उर्वशीच्या विरहांमुळें प्रथम अतिशय मोहित झाला; पण मागून कुरुक्षेत्रांत तिचा पुनः समागम होऊन गंधर्वांनें दिलेल्या अग्नीने देवांचें भजन करून पुनः उर्वशीलोकाला प्राप्त होऊन शोकाची निवृत्ति झालीं असतां विषयांविषयी विरक्त होऊन ही पुढील गाथा गाता झाला [नवव्या स्कधांत हि पुरूरव्याची कथा सविस्तर आहे.]४.

समुद्रानें वेष्टित असलेल्या समग्र पृथ्वींतील सगळ्या राजांचा जो सम्राट् चक्रवर्ती पुरूरवा राजा, त्याची कीर्ति पुराणांतून प्रसिद्ध आहे. ४९ तेज, प्रभाव, महाशौर्य, योग्य औदार्य, गंभीर्य, कीर्ति, महत्त्व, पराक्रम, धार्मिक धैर्य इत्यादि गुणांनीं तो राजा संपन्न होता. ५० राजधर्मांच्या नीतीनें व स्वधर्मानें तो पृथ्वीचें पालन करीत असे. जेवढा ब्राह्मण तेवढा ब्रह्मस्वरूप अशी त्या राजाची निष्ठा होती. ५१. प्राणांतीहि ब्राह्मणांची निंदा करीत नसे. गायींच्या साठीं स्वतःचा प्राण देण्यास तयार होत असे आणि गरिबांचें संरक्षण करीत असे. ५२ असा तो धार्मिक चक्रवर्ती ऐलराजा उर्वशीला भाळला आणि तिच्या आसक्तींत गुंतून आत्महित विसरला. ५३ त्यानें पुढें पश्चात्तापानें जें गीत गाइलें, तें मी तुला सांगणारच आहें; परंतु अगोदर त्याच्या कामासक्तीची कथा सांगतों, ती ऐक. ५४ एकदा तो राजा आपली थोर योग्यता विसरून त्या वेश्येच्या नादानें अत्यंत दीन झाला. कामासक्ति मनुष्याला कसें वेडें करून सोडिते, तेंच श्रीहरि या ऐलगीतानें सांगत आहे. ५५ ऐलराजाला उर्वशीची आसक्ति जडली व लगेच पश्चात्तापानें त्याला विरक्ति आली. अशी कथा वेदांत सांगितली आहे. तिचेंच वर्णन आतां श्रीकृष्ण करीत आहे. ५६ उर्वशी-पुरूरव्याची कथा नवव्या स्कंधाच्या चवदाव्या अध्यायांत सविस्तर सांगितली आहे. म्हणून श्रीहरी त्या कथेचाच अनुवाद येथें करीत नाहीं. (कृतयुगाच्या शेवटीं व त्रेतायुगाच्या आरंभीं पुरूरवा राजा झाला. पहिल्या युगांत लोक ध्याननिष्ठ होते, ते दुसऱ्या युगांत धर्मनिष्ठ झाले.) ५७ पूर्वकथेचा संबंधः—स्वर्गलोकाला भूषण असलेल्या उर्वशीला स्वतः नारायणानें तेथें पाठविली असल्यामुळें आपल्या श्रेष्ठपणाबद्दल तिला अत्यंत गर्व झाला. ५८ त्या गर्वमदांत नृत्य करीत असतां एकदा तिचा ताल चुकला. तेव्हां ब्रह्मदेवानें तिला शाप दिला कीं, तूं मृत्युलोकीं मनुष्यजन्म घेशील ५९ तेव्हां उर्वशी त्याला शरण गेली असतां 'पुरूरवाराजाला नग्न पाहाताच तूं स्वर्गी परत येशील' ६० असा ब्रह्मदेवानें तिला उःशाप दिला. या शापामुळें उर्वशी भूलोकीं आली. तेव्हां तिचें

तिचिया स्वरूपासी । पुरूरवा तिसी भुलला ॥ ६१ ॥ विसरोनि आपुली महंती । वश्य झाला वेश्येप्रती । रूपा भुलला भूपती । विचारस्फूर्ती विसरला ॥ ६२ ॥ नग्न देखिलिया रायासी । सांडुनि जावें उर्वशी ऐसी भाक देऊनि तिसी । निजभोगासी आणिली ॥ ६३ ॥ तिणें आपुलिया उश्शापासी । आणिले दोघां एडक्यासी । पुत्रस्नेहें पाळावें त्यांसी । ते विखीं भाकेसी दीधलें रायें ॥ ६४ ॥ ते उर्वशीच्या कामप्राप्ती । अतिशयें वाढली कामासक्ती । नेणे उदयास्तदिवसराती । ऐशा अमित तिथी लोटल्या ॥ ६५ ॥ ऐसा भोगितां उर्वशीसंगें काम । विसरला स्वधर्मकर्म । विसरला नित्यनेम । कामसंभ्रम वाढला ॥ ६६ ॥ तेथ मेषरूपें दोघेजण । झाले अश्विनीकुमार आपण । उर्वशीभोगक्षयाकारण । पहावया जाण इंद्रें ठेविले ॥ ६७ पुरूरव्याच्या भोगप्राप्ती । उर्वशी न्यावया स्वर्गाप्रती । दोनी एडके चोर नेती मध्यरातीं भेंमात ॥ ६८ ॥ ऐकोनि मेषांच्या शब्दासी । दुःखें हडबडली उर्वशी । रागें निर्भर्त्सी रायासी । नपुंसक होसी तूं एक ॥ ६९ ॥ वृथा वल्गसी पुरुषबळें । चोरें नेलीं माझीं बाळें । जळों तुझें तोंड काळें । म्हणोनि कपाळें ते पिटी ॥ ७० ॥ एकोनि स्त्रियेचा शोक थोरू । शस्त्र घेऊनि सत्वरू । धांवतां फिटला पीतांबरू । तें नृपवरू स्मरेना ॥ ७१ ॥ पराभवूनि ते चोर । मेष आणितां सत्वर । विद्युल्लता झळकली थोर । तंव नग्न शरीर रायाचें ॥ ७२ ॥ नग्न देखोनि रायासी । सांडूनि निघाली उर्वशी तिचेनि वियोगें मानसीं । अतिशोकासी पावला ॥ ७३ ॥

त्यक्त्वाऽऽत्मानं व्रजन्तीं तां नग्न उन्मत्तवन्नृपः । विलपन्नन्वगाज्जाये घोरे तिष्ठेति विक्लवः ॥ ५ ॥

स्वरूप पाहून पुरूरवा राजा तिच्यावर मोहित झाला ६१ आणि आपली थोरवी विसरून त्या वेश्येला वश झाला. तिच्या रूपाला भाळल्यामुळें त्याची विचारशक्ति नाहींशी झाली. ६२ 'राजा नग्नस्थितींत दृष्टीस पडल्यास तिनें त्याला सोडून जावें.' असें वचन देऊन राजानें तिला उपभोगासाठीं आणली. ६३ तिनें आपल्या शापाच्या परिहारासाठीं दोन मेंढे आणिले आणि राजानें त्यांचें पुत्रस्नेहानें पालन करावें, अशी त्याजकडून शपथ घेवविली. ६४ त्या उर्वशीच्या संगतीनें राजाची कामासक्ति अतिशय वाढली. तिच्या सहवासांत राजाला उजाडलें कधीं व सूर्यास्त कधीं झाला, याचेंहि भान राहिनासें झालें. रात्रं-दिवस केव्हां निघून जात असे तेंहि त्याला कळत नव्हतें. अशा स्थितींत बराच काल लोटला. ६५ अशारीतीनें उर्वशीबरोबर विलास भोगीत असतां तो राजा आपलें स्वधर्म-कर्म, नित्यनेम इत्यादि सर्व विसरला व त्याची विषयेच्छा बळावत चालली. ६६ ते दोघे मेंढे म्हणजे अश्विनीकुमार होत. उर्वशीची शापापासून मुक्तता करण्यासाठीं इंद्रानें त्यांना पाठविलें होतें ६७ पुरूरव्याच्या मोहांतून सोडवून उर्वशीला स्वर्गाला नेण्यासाठीं एका रात्रीं चोरानें ते दोन्ही मेंढे चोरून नेले. तेव्हां ते 'बें बें' करूं लागले. ६८ त्यांच्या ओरडण्याचा आवाज कानीं पडतांच उर्वशी दुःखानें व्याकुळ झाली आणि रागानें चवताळून राजाची निर्भर्त्सना करूं लागली कीं, तूं खरोखर पुरुषार्थहीन आहेस. ६९ व्यर्थ आपल्या पराक्रमाच्या वल्गना करितोस; पण माझीं बाळें चोरांनीं नेली, त्यांचा तुला संभाळ करतां येत नाहीं. जळों तुझें काळें तोंड !' असें म्हणून ती डोकें फोडून घेऊं लागली. ७० तिचा तो अनिवार शोक पाहून राजा मोठ्या गडबडीनें हातांत शस्त्र घेऊन त्या मेंढ्यांना सोडविण्यासाठीं त्वरेनें निघाला. तेव्हां धांवत असतां त्याचा नेसलेला पितांबर केव्हां सुटला याचेंहि त्याला भान राहिलें नाहीं. ७१ चोरांचा पराभव करून तो मेंढ्यांना तत्काळ सोडवून परत येत असतां एकदम आकाशांत विज चमकली व त्या प्रकाशांत राजाचें नग्न शरीर उर्वशीच्या दृष्टीस पडलें. ७२ तेव्हां ती तत्काळ राजाला सोडून स्वर्गलोकीं निघून गेली; परंतु राजा मात्र तिच्या वियोगानें अतिशय शोकाकुल झाला. ४९–७३

—आतां त्याच्याच पूर्वीच्या मोहावस्थेचें वर्णन करितात—

—आत्मानं त्यक्त्वा व्रजन्तीं तां जाये घोरे तिष्ठ इति विक्लवः सन् उन्मत्तवत् नग्नः नृपः विलपन् अन्वगात्—आपल्याला सोडून जाणाऱ्या तिला हे निष्ठुर जाये ! थांब, असें म्हणून व्याकुळ होऊन तो वेड्याप्रमाणें नग्नावस्थेंतच विलाप करीत तिच्या मागोमाग गेला. ५.

पृथ्वीपरिपालनीं वरिष्ठ। स्वधर्मी धार्मिक श्रेष्ठ। शत्रुदमनीं अति सुभट प्रतापें उद्भट महावीर ॥ ७४ ॥ जाणे वेदशास्त्रविवेक। ज्यासी वंदिती सकळ लोक। तोही वेश्येचा केवळ रंक। झाला देख निजांगें ॥ ७५ ॥ सुरां आसुरां न खालवी मान। जो अल्पही न साहे अपमान। तो वेश्येलागीं झाला दीन। निजसन्मान विसरोनी ॥ ७६ ॥ उर्वशी जातां देखोनि उठीं। नग्न उन्मत्त उठाउठीं। रडत पडत लागे पाठीं। स्फुंदतां पोटीं श्वास न रिघे ॥ ७७ ॥ डोळेभरी पाहूं दे दिठीं। सांगेन जीवींच्या गुह्य गोष्टी। प्राण रिघों पाहे उठाउठी। क्षणभर भेटी न देतां ॥ ७८ ॥ आपुल्या पूर्वजांची आण। कदा नुल्लंघी तुझें वचन। सत्य मानीं हें प्रमाण। तुज काय कारण रुसावया ॥ ७९ ॥ तुज चालतां लवलाहीं। झणीं खडे रुततील पायीं। तुज जाणें कोणे ठायीं। तरी सवें मीही येईन ॥ ८० ॥ जाऊं नको उभी राहें। परतोनि मजकडे पाहें। म्हणोनि धरूं धाये पाये। तंव ते जाये उपेक्षुनी ॥ ८१ ॥ ज्यासी राजे मुकुटमणी। सदा येती लोटांगणीं। तो लागे वेश्येचें चरणीं। बाप करणी कामाची ॥ ८२ ॥ तुझी मज अति कळवळ। तुजलागीं चित्त माझें कोमळ। तूं कठिण झालीस केवळ। कोप प्रबळ कां धरिला। ॥ ८३ ॥ यापरी रायाचें चित्त। विरहातुर शोकाकुलित। अतिशयें ग्लानियुक्त। ग्लानि सांगत श्रीकृष्ण ॥

कामानतृप्तोऽनुजुषन् क्षुल्लकान्वर्षयामिनीः। न वेद यान्तीर्नायान्तीरुर्वश्याकृष्टचेतनः ॥ ६ ॥

उर्वशीभोगकामीं कामासक्त। एकाग्र झालें रायाचें चित्त। नेणे सूर्याचें गतागत। केला भ्रांत कंदर्पें ॥ ८५ ॥ भोगिलीचि कामिनी। भोगितांही अनुदिनीं। अधिक प्रेम वाढलें मनीं। ऐसा तिजलागूनी

पृथ्वीचें पालन करण्यांत वरिष्ठ, स्वधर्मानें श्रेष्ठ, धार्मिक, शत्रूचें दमन करण्यांत अतिशय पराक्रमी, प्रतापानें महावीर. ७४ वेदशास्त्र जाणणारा, सर्व लोकांना वंद्य असा तो पुरूरवा राजा सर्वस्त्रीं वेश्येचा दास झाला. ७५ जो देव व असुर यांच्या पुढेंहि कधीं वाकावयाचा नाहीं, जो यत्किंचितूहि अपमान सहन करावयाचा नाहीं, तो आपली सर्व योग्यता विसरून वेश्येसाठीं अगदीं दीन झाला. ७६ उर्वशी तत्काल निघून गेलेली पहातांच राजा तशा नग्नावस्थेंतच तिच्या मागोमाग धांवला. तो रडत ओरडत तिच्या पाठीस लागला. त्याला स्फुंदून स्फुंदून श्वासहि घेववेना. ७७ 'मला डोळे भरून एकदा पाहूं तरी दे. मी तुला आपल्या मनांतील गुह्य गोष्टी सांगेन. तूं क्षणभर जर मला भेट दिली नाहींस, तर माझा प्राण निघून जाईल. ७८ माझ्या वाड-वडिलांची शपथ वाहून सांगतों तुझ्या शब्दाचें मी केव्हांहि उल्लंघन करणार नाहीं, हें अगदीं सत्य समज. तुला रुसावयास कारण तरी काय झालें! ७९ चालतांना तुझ्या पायांना खडे रुततील. तूं कोठें जात आहेस; तें तरी सांग, म्हणजे मीहि तुझ्याबरोबर येईन. ८० थांब, जाऊं नकोस. परतून माझ्याकडे एकदां पहा तरी' असें म्हणून तो तिचे पाय धरावयास गेला असतां ती त्याची उपेक्षा करून निघून गेली, ८१ ज्याच्या पुढें मुकुट धारण करणारे मोठमोठे राजे लोटांगण घालीत असत तो राजा स्वतः वेश्येच्या पाया पडूं लागला. अशी कामाची करणी मोठी विलक्षण आहे! ८२ 'मला तुझी अतिशय आवड आहे. तुझ्यासाठीं माझें मन सारखें कळवळत असता तूं अशी निष्ठुर कां झालीस! ८३ एवढा क्रोध कां केलास. याप्रमाणें त्या राजाचें मन विरहानें शोकाकुल झालें. तो अतिशय ग्लानियुक्त झाला. श्रीकृष्ण त्याच्या ग्लानीचेंच वर्णन करितात. ८४

—आतां त्याच्या विकलतेचें कारण सांगतात—

क्षुल्लकान् कामान् अतृप्तः अनुजुषन्—क्षुद्र कामांचें तृप्त न होतांच, अहोरात्र सेवन करणारा उर्वश्याकृष्टचेतनः व उर्वशीनें ज्याचें चित्त हरण केलें आहे, अशा त्याला यान्ती वर्षयामिनीः न वेद-भराभर निघून जाणाऱ्या वर्षांच्या रात्रींचें भान राहिलें नाहीं व आयान्तीः न वेद—पुढें येणाऱ्या वर्षांच्या रात्रींकडेहि त्याचें अवधान राहिलें नाही. ६

उर्वशीच्या विलासांत विषयासक्त झालेल्या त्या राजाला सूर्य कधीं उगवला व कधीं मावळला याचेंहि भान राहिलें नाहीं, इतका तो मदनानें वेडा झाला होता. ८५ उर्वशीच्या सतत सहवासामुळें त्याचें तिजवरील

आसक्त ॥ ८६ ॥ भोगितां उर्वशीकामासी । नेणे दिवसमासवर्षासी । व्ययो झाला आयुष्यासी । हेंही त्यासी स्मरेना ॥ ८७ ॥ जेवीं अग्नीमाजीं घृत पडे । तंव तंव ज्वाळा अधिक वाढे । तेवीं कांता भोगितां वाडेंकोडें । काम पुढें थोरावे ॥ ८८ ॥ विचारितां स्त्रीकामासी । अतितुच्छत्व दिसे त्यासी । तोही भोगितां अहर्निशीं । विरक्ति रायासी नुपजेचि ॥ ८९ ॥ प्रीति गुंतली उर्वशीसी । अतिग्लानी करिता तिसी । परतोन न येचि रायापाशीं । निघे वेगेंसी सांडूनी ॥ ९० ॥ उर्वशी न देखूनि पुढें । राजा विरहें मूर्च्छित पडे । पाहों धांवे इकडेतिकडे । आक्रोशें रडे अतिदुःखी ॥ ९१ ॥ अटण करितां दाही दिशीं । अवचटें आला कुरुक्षेत्रासी । तंव अंतरिक्षीं उर्वशी । देखे दृष्टीसी नृप नाथ ॥ ९२ ॥ देखोनि म्हणे धांव पाव । मजलागीं दे कां वेगीं खेव । येरी म्हणे मूढभाव । सांडीं सर्व विषयांधा ॥ ९३ ॥ आम्हां स्त्रियाची आसक्ती । कदा धड नव्हे गा भूपती । सदा स्त्रियांची दुष्ट जाती । जाण निश्चितीं महाराजा ॥ ९४ ॥ विशेषें आम्ही स्वैरिणी । स्वेच्छा परपुरुषगामिनी । आमुचा विश्वास मनीं झणीं । न मानीं नृपनाथा ॥ ९५ ॥ आम्हां प्रमदांच्या संगती । राया ठकले नेणों किती । आतां सांडूनि आमचीं आसक्ती । होई परमार्थीं विरक्त ॥ ९६ ॥ बहु काळ भोगितां माझ्याशीं भोग । अद्यापि नुपजे तुज विराग । कामासक्ति सांडुनि सांग । साधी चांग निजस्वार्थ ॥ ९७ ॥ राजा ग्लानि करी अनेग । एक वेळ निजांगें अंग । मज देई अंगसंग । सुखसंभोग भामिनी ॥ ९८ ॥ निकट देखोनि ग्लानीसी । कृपेनें द्रवली उर्वशी । मग ते आपुल्या पूर्व वृत्तांतासी । रायापाशीं निवेदी ॥ ९९ ॥ मी स्वर्गांगना अतिसुरूप । मज घडला ब्रह्मशाप । तूं महाराजा पुण्य पुरुष । संगे निःशाप मी झालें ॥ १०० ॥ तुझेनि संगें मी निर्धूत । शाप निस्तरले समस्त । मज तुज संग न घडे एथ । मी असें जात स्वर्गासी ॥ १ ॥ ऐकोनि उर्वशीचे

प्रेम अधिकच वाढत गेलें व तो तिच्यावर अत्यंत आसक्त झाला. ८६ उर्वशीबरोबर विलास करण्यांत किती काळ लोटला व किती आयुष्याचा व्यय झाला, याचेंहि त्याला स्मरण राहिलें नाहीं. ८७ अग्नीमध्यें तुपाची आहुति पडली असतां ज्वाला जशी अधिक भडकते, त्याप्रमाणें आसक्तीनें जेवढा स्त्रीसंग करावा तेवढी कामासक्ति अधिक वाढत जाते. ८८ स्त्रीसंगाचा विचार केला असतां तो अतिशय तुच्छ दिसतो, पण रात्र-दिवस त्याचा भोग घेत असूनहि त्याला मुळींच विरक्ति आली नाहीं. ८९ त्याचें सगळें मन उर्वशीमध्यें गुंतून गेलें होतें. तिचें अतिशय आर्जव करूनहि ती राजापाशीं परत आली नाहीं. ९० ती त्याला सोडून क्षणकाऱ्यानें निघून गेली. उर्वशी पुढें नाहीं, हें पाहून राजा विरहानें मूर्च्छित होऊन पडला, सैरावैरा पळत सुटला व अत्यंत दुःखानें आक्रोश करूं लागला. ९१ दाही दिशांमध्यें भटकत फिरत असतां तो अकस्मात् कुरुक्षेत्रीं आला. तेव्हां उर्वशी अंतरिक्षांत त्या राजाच्या दृष्टीस पडली. ९२ तिला पाहून राजा म्हणाला कीं, 'ये उर्वशी धांव, मजभर प्रसन्न हो आणि मला आलिंगन दे ' तें एकून उर्वशीनें उत्तर दिलें 'अरे विषयांधा ! हा सर्व मूर्खपणा सोडून दे. ९३ हे महाराजा ! आम्हां स्त्रियांची आसक्ति केव्हांहि हितकर नसते. स्त्रीसंग असा दुष्ट आहे, हें तूं निश्चयानें जाण. ९४ विशेषतः आम्ही वारांगना स्वच्छंदानें वागणाऱ्या असतों. मनास रुचेल तशा परपुरुषाशीं रत होतो. तरी हे राजा ! आमचा विश्वास कधीं धरूं नकोस. ९५ आम्हां स्त्रियांच्या संगतीनें किती लोक फसले आहेत, त्यांची गणती नाहीं. यास्तव आतां माझी आसक्ति सोडून विरक्त होऊन परमार्थाकडे लक्ष दे. ९६ दीर्घकाल माझ्याशीं विलास भोगूनहि अद्यापि तुझ्या मनाला विरक्ति उत्पन्न झाली नाहीं. म्हणून आतां कामासक्ति समूळ सोडून आधीं आपला खरा स्वार्थ साधून घे. ' ९७ तेव्हां राजा अत्यंत काकुळतीला येऊन तिचीं आर्जवें करीत म्हणाला कीं, हे भामिनि ! मला एकदा आलिंगन देऊन सुखी कर. ९८ तेव्हां त्या राजाची इतकी लगट पाहून उर्वशीचें मन दयेनें द्रवलें आणि तिनें आपला पूर्व वृत्तान्त सांगण्यास आरंभ केला. ९९ ती म्हणाली— 'हे महाराजा, मी अत्यंत लावण्यवती अशी स्वर्गीची अप्सरा आहें. मला ब्रह्मशाप झाल्यामुळें मी या मृत्युलोकीं आलें. परंतु तूं पुण्यवान् असल्यामुळें तुझ्या संगतीनें मी शापमुक्त झालें. १०० तुझ्या सहवासानें मी पावन झालें. आतां शापनिवृत्ति झाल्यामुळें मला तुझ्याशीं विलास करितां येत नाहीं. मी आतां स्वर्गलोकीं चाललें !' १ हें उर्वशीचें भाषण ऐकतांच राजा विरहव्यथेनें

वचन । राजा विरहें करी रुदन । तेव्हां कळवळलें तिचें मन । त्या उपाय पूर्ण दाविला ॥ २ ॥ प्रार्थूनिया गंधर्वांसी । अग्निस्थाली दीधली रायासी । यावरी करूनि यागासीं । मज पावसी महाराजा ॥ ३ ॥ उर्वशीवियोगें व्यथाभूत । अग्निस्थाली उपेक्षुनि तेथ । राजा निजमंदिरा येत । शोकाकुळित अतिदुःखीं ॥ ४ ॥ उर्वशीची व्यथा रायासी । स्वप्नीं देखिलें तियेसी । त्वरेनें पाहूं आला स्थालीसी । तंव देखे अश्वत्थासी शमीगर्भा ॥ ५ ॥ त्याच्या अरणी करूनि देख । यज्ञाग्नि पाडिला चोख । यजूनि पावला उर्वशीलोक । कामसुखभोगेच्छा ॥ ६ ॥ भोग भोगितां उर्वशीसीं । विरक्ति उपजली रायासी । तो जे बोलिला अनुतापेंसी । तें ऐक तुजसी सांगेन ॥ ७ ॥ अठरा श्लोकांचें निरूपण । राजा बोलिला आपण । आठ श्लोकीं अनुताप पूर्ण । तोचि श्रीकृष्ण स्वयें सांगे ॥ ८ ॥

ऐ०उ०–अहो मे मोहविस्तारः कामकश्मलचेतसः । देव्या गृहीतकण्ठस्य नायुःखंडा इमे स्मृताः

ऐलगीताचा अनुताप । नाशी अगम्यागमनपाप । करी श्रोत्यांसी निष्पाप । साधकां कंदर्प बाधीना ॥ ९ ॥ जेवीं मदगज गजीसंगीं । नाना आपत्ति स्वयें भोगी । तेवीं उर्वशीच्या संभोगीं । झाला विरागी पुरूरवा ॥ ११० ॥ जो उर्वशीलागीं अनुरक्त । तोचि तिसीं झाला विरक्त । तेणें वैराग्यें अनुतापयुक्त । स्वयें बोलत ऐलरावो ॥ ११ ॥ माझ्या मोहाचा विषयविस्तार । कामासक्त कामातुर कुश्चित कंदर्पाचें घर । म्यांचि साचार सेविलें ॥ १२ ॥ उर्वशीकामें अतिआसक्त । कामातुर झालें चित्त

व्याकुल होऊन रुदन करूं लागला. तें पाहून उर्वशीचें मन कळवळलें व तिनें त्याला एक उपाय सांगितला. २ तिनें गंधर्वांची प्रार्थना करून राजाला एक अग्निपात्र दिलें व सांगितलें कीं, हे राजा ! या अग्नीनें तूं यज्ञ कर, म्हणजे तुला माझी प्राप्ति होईल. ३ परंतु तो राजा उर्वशीच्या वियोगानें अत्यंत व्यथित झाल्यामुळें तें अग्निपात्र तेथेंच टाकून व दुःखानें अत्यंत शोकाकुल होऊन आपल्या महालांत परत आला. ४ त्याचें मन उर्वशीच्या विरहानें व्याकुल झाल्यामुळें स्वप्नांत त्याला उर्वशी दिसली; तेव्हां तो मोठ्या त्वरेनें तें अग्निपात्र शोधण्यास निघाला, तों त्यास तेथें गर्भांत शमी असलेला एक अश्वत्थवृक्ष दिसला. ५ त्याच्या अरणी (यज्ञासाठीं अग्नि उत्पन्न करण्याचीं काष्ठें) करून त्यानें अग्नि प्रकट केला आणि यज्ञ करून तो विषयभोग घेण्यासाठीं उर्वशीच्या लोकीं गेला. ६ तेथें उर्वशीबरोबर विलास करीत असतां त्याच्या मनाला विरक्ति आली व पश्चात्तापानें तो जें बोलला, तें मी तुला सांगतों, ऐक. ७ राजानें एकंदर अठरा श्लोक सांगितले. त्यापैकीं आठ श्लोक पूर्ण पश्चात्तापपर आहे. तेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. १०८

—गंधर्वलोकीं गेलेल्या व दिर्घकाल उर्वशीसंभोगानंतर विरक्त झालेल्या त्या राजाची गाथापुढील अठरा श्लोकांनीं सांगतात. त्यातील आठ श्लोकांनीं अगोदर त्याच्या पश्चात्तापानें वर्णन करितात—

ऐलः उवाच–ऐल म्हणाला–अहो कामकश्मलचेतसः देव्या गृहीतकण्ठस्य मे मोहविस्तारः–अहो, काय चमत्कार आहे ! ज्याचें चित्त कामानें कलुषित झालें आहे व ज्याच्या कंठाला देवीनें मिठी घालि आहे अशा माझा हा केवढा मोहविस्तार, मया इमे आयुःखंडाः न स्मृताः–कीं ज्यामुळें मी हे अहोरात्र आयुष्याचे भाग कधीं आठवलेहि नाहींत [अविवेकामुळें माझ्या आयुष्याचे दिवस अहोरात्र कसे भराभर निघून जात आहेत, तिकडे मीं लक्षहि दिलें नाहीं.] ७.

ऐलगीतांतील हा पश्चात्ताप ऐकणाराचा परस्त्रीगमनदोष नाहींसा करितो, श्रोते निष्पाप होतात आणि साधकाला मदनाची व्यथा केव्हांहि बाधत नाहीं. ९ मदोन्मत्त हत्ती जसा हत्तिणीच्या संगतीनें भयंकर आपत्ति भोगितो-तसा हा पुरूरवा राजा उर्वशीच्या आसक्तीनें दुःख भोगून पूर्ण विरक्त बनला. ११० पूर्वीं जो उर्वशीवर अत्यंत लुब्ध झाला होता, तोच तिच्याविषयीं विरक्त झाला आणि त्या विरक्तीनें पश्चात्तापाचे उद्गार स्वतःच काढूं लागला. ११ केवढा हा माझ्या मोहाचा विस्तार ! मी कामासक्त व कामातुर होऊन अपवित्र असें कंदर्पाचें घर सेविलें. १२ उर्वशीवर अत्यंत आसक्त झाल्यामुळें माझें चित्त कामातुर झालें, त्यामुळें मी अनर्थांत पडलों आणि मिळालेलें आयुष्य

तेणें म्यां जोडिला अनर्थ । थितें केलें व्यर्थ आयुष्य ॥ १३ ॥ उर्वशी कंठसल्लग्न शस्त्र । आयुष्यच्छेदनीं सतेजधार । छेदिलें आयुष्य अपार । तें मी पामर स्मरेना ॥ १४ ॥ कांताआलिंगन विषवल्ली । म्यां कंठीं घातली सकाम भुलीं । तिणें आयुष्याची होळी केली । विवेक समूळीं गिळिला ॥ १५ ॥ कामिनीकामआलिंगनीं । कंठीं पेटविला दावाग्नी । तो धडाडिला आयुष्यवनीं । विवेकअवनी जाळित ॥ १६ ॥ नरदेहीं उत्तमोत्तम । अमूल्य आयुष्य केलें भस्म । जळो जळो माझें कर्म । निंद्य अधर्म तो एक ॥ १७ ॥ नरदेहींच्या आयुष्यपुष्टी । साधक रिघाले वैकुंठीं । ज्ञाते ब्रह्म होती उठाउठीं । तें म्यां कामासाठीं नाशिलें ॥ १८ ॥

नाहं वेदाभिनिर्मुक्तः सूर्यो वाऽभ्युदितोऽमुया । मुषितो वर्षपूगानां बताहानि गतान्युत ॥ ८ ॥

नरदेहाचें आयुष्यक्षण । न मिळे देतां कोटी सुवर्ण । ते म्यां नाशिलें संपूर्ण । आपणया आपण नाडिलें ॥ १९ ॥ साधूंचिया निजस्वार्था । साधूनि द्यावया उगवे सविता । निमेषोन्मेषें परमार्था । साधक तत्त्वतां साधिती ॥ १२० ॥ तोचि सविता सकामासी । आयुष्य हरी अहर्निशीं । हें न कळे ज्याचें त्यासी । नरकपातासी निजमूळ ॥ २१ ॥ पुढिलांची गोंठी ते कायसी । मीच नाडलों उर्वशीसीं । न्हास झाला आयुष्यासी । हे हानि कोणासी सांगावी ॥ २२ ॥ जनांचिया हितासी वाहिला । सूर्यो अनुदिनीं उगवला । तें मीं नेणेंचि दादुला । उर्वशीकामें भुलला उन्मत्त ॥ २३ ॥ सूर्याचा उदयो अस्तमान । वर्षेंही लोटल्या नाहीं ज्ञान । करितां उर्वशीचें अधरपान । तेणें मदें संपूर्ण मातलों ॥ २४ ॥ मद्यमद

फुकट घालविलें. १३ आयुष्याचा छेद करणारी, जणुंकाय गळ्याला लागलेली तीक्ष्ण धारेची सुरीच, अशा उर्वशीनें माझें केवढें मोठें आयुष्य नष्ट केलें, याची मज मूर्खाला दादहि नव्हती. १४ स्त्रीचें आलिंगन म्हणजे केवळ विषाची वेलच आहे. ती मीं विषयलोलुप होऊन गळ्यांत घातली. त्यामुळें विवेकाला समूळ ग्रासून तिनें माझ्या आयुष्याची होळी केली. १५ विषयासक्त होऊन स्त्रीच्या भोगेच्छेनें तिला आलिंगन देऊन मीं आपल्या गळ्याभोंवतीं दावाग्नीच पेटविला. तो माझ्या आयुष्यवनांत भडकला व त्यानें विवेकभूमि जाळून टाकिली. १६ उत्तमोत्तम मनुष्यजन्म प्राप्त झाला असतां मीं अमूल्य आयुष्याचें भस्म केलें. जळो माझें निंद्य अधर्म कर्म. १७ मनुष्यजन्म लाभला असतां साधक वैकुंठाला जातात. ज्ञानी तत्काल ब्रह्माला प्राप्त होतात. पण तो लाभ मीं केवल कामासक्त होऊन घालविला. ११८.

—आतां तेंच सांगतात—

अमुया मुषितः अहं अभिनिर्मुक्तः अभ्युदिततः वाः सूर्यः न वेद—या उर्वशीकडून ठकविला गेलेला मीं (तिच्याशीं रममाण होत असतांना) अस्त पावलेल्या किंवा उदय पावलेल्या सूर्यालाहि जाणलें नाहीं. बत वर्षपूगानां अहानि गतानि उत—हर हर, उलट अनेक वर्षांचे दिवस मला न कळतां निघून गेले. ८

कोट्यावधि सुवर्णाच्या राशी दिल्या तरी मनुष्यजन्मांतील आयुष्याचा एक क्षणहि मिळत नाहीं. १९ अशा अमूल्य आयुष्याचा मीं व्यर्थ नाश केला व आपल्या हातानें स्वतःचा घात करून घेतला. आपला स्वार्थ साधून इतरांनाहि त्याचा स्वार्थ साधून देण्यासाठीं सूर्य उगवतो व साधक प्रत्येक क्षणाला परमार्थ साधितो. १२० पण तोच सूर्य कामासक्त पुरुषाचें आयुष्य रात्रंदिवस हरण करितो; परंतु हे ज्याचें त्यास कळत नाहीं. हेंच अधःपाताचें मूळ कारण आहे. २१ लोकांची गोष्ट कशाला पाहिजे, मी स्वतःच पहाना ! उर्वशीच्या नादीं लागून मीं आपल्या आयुष्याचा क्षय केला. ही हानि कोणाला सांगावी ! २२ लोकांच्या हितासाठींच नित्य सूर्य उगवत असतो. हें मीं पुरुष असूनहि जाणलें नाहीं. उर्वशीच्या आसक्तीनें मी पूर्ण मदोन्मत्त झालो. २३ सूर्य कधीं उगवला व कधीं मावळला याचेंहि मला वर्षानुवर्षें लोटलीं तरी भान राहिलें नाहीं. उर्वशीच्या चुंबनरूपी मद्यपानानें मी अगदीं धुंद होऊन गेलों होतों. २४ मद्याचा मद दुसऱ्या दिवशीं उतरतो; धनाचा मद दारिद्र्य आलें असतां नाहींसा होतो;

उतरे दिनांतीं । धनमद् जाय निधनास्थितीं । तारुण्यमद् जाय क्षीणशक्ती । स्त्रीमदप्राती कदा नुतरे ॥ २५ ॥ नरदेहाची आयुष्यकथा । पुढती दुर्लभ न लगे हाता । जळो हे उर्वशी देवकांता । इणेंचि तत्त्वतां नागविलों ॥ २६ ॥ मी निर्भय रक्षिता सर्वांसी । त्या मज नागविलें उर्वसीं । हे लाज सांगों कोणापाशीं । उकसाबुकसी स्फुंदत ॥ २७ ॥ माझ्या निजहिताचा चोरू । हे उर्वशी जीवें मारूं । सर्वेचि उपजला विचारू । येथ मीचि पामरू अविवेकी ॥ २८ ॥ मग म्हणे कटकटा । सृष्टीमाजीं मी करंटा । आयुष्य नाशिलें कामचेष्टा । अपाव मोटा मज झाला ॥ २९ ॥ मग आक्रंदे अति गर्जोनी कामें नागविलों आयुष्य हरोनी । याहीहोनि अधिक हानी । पाहतां यें जनीं असेना ॥ १३० ॥

अहो मे आत्मसंमोहो येनात्मा योषितां कृतः । क्रीडामृगश्चक्रवर्ती नरदेवशिखामणिः ॥ ९ ॥

राजे मुकुटांचे प्रतापी पूर्ण । माझ्या चरणा येती शरण । तो मी वेश्येचे धरीं चरण । हें निर्लज्जपण म्यां केलें ॥ ३१ ॥ मज पुरूरव्याचे आज्ञेवरी । राजे नाचती चराचरीं । तो मी वेश्येचे आज्ञेवरी । श्वानाचेपरी वर्तलों ॥ ३२ ॥ जैसें वानर गारुड्याचें । तैसा स्त्रियेचेनि छंदें नाचें । माझ्या चक्रवर्तीपणाचें । अतिनिंद्य साचें फळ झालें॥ ३३ ॥ राजे मज देती सन्मान। भूपति सदा वंदिती चरण। तो मी झालों स्त्रियेअधीन । हीनदीन अतिरंक ॥ ३४ ॥ राखतां स्त्रियेचा रसरंगप्रेम । पायां पडणें हें अनुचित कर्म । म्हणती ते जळो जन सकाम । हेचि धाडी परम कामाची ॥ ३५ ॥ वलयांकित मी चक्रवर्ती । तोहि योषिता घातलों आवर्तीं । त्याचि आवर्ताचि स्थिती । स्वमुखें भूपति अनुवादे ॥ ३६ ॥

तारुण्याचा मद शक्ति क्षीण झाली असतां जातो; पण स्त्रीसंगाचा मद मात्र केव्हांहि उतरत नाहीं. २५ या मनुष्यदेहांतील आयुष्य अत्यंत दुर्लभ आहे, तें पुढें कधीं प्राप्त होणार नाहीं, असें असतां मी या देवांगनेच्या नादानें साफ बुडालों. धिक्कार असो तिला. २६ मी जो निर्भय, सर्वांचें रक्षण करणारा राजा, त्या मला उर्वशीनें नागविलें. ही माझी लज्जास्पद स्थिति सांगूं तरी कोणाला ! असें म्हणून तो मुक्तकंठानें रुदन करूं लागला. २७ माझ्या आत्महिताची चोरी करणाऱ्या ह्या उर्वशीचा प्राण घ्यावा, असें त्याच्या मनांत आलें; पण तत्काल त्याच्या मनांत विचार आला कीं, मीच मूर्ख अविवेकी बनलों. (त्यांत तिच्याकडे काय दोष !) नंतर मोठा आक्रोश करून तो म्हणूं लागला कीं, या जगामध्यें मी दुर्दैवी खरा. मीं कामविलासांत आयुष्याचा व्यर्थ नाश केला. माझी अत्यंत हानि झाली. २९ पुनः मोठमोठ्यानें ओरडून तो आक्रंदन करूं लागला कीं, मी या कामासक्तीनें फसलों गेलों. माझें आयुष्य वायां गेलें. जगांत यापेक्षां दुसरी कोणतीहि अधिक हानि नाहीं. १३०.

अहो, मे आत्मसंमोहः—अहो केवढा हा माझा चित्तभ्रम कीं येन चक्रवर्ती नरदेवशिखामणिः आत्मा योषितां क्रीडामृगः कृतः—ज्या संमोहामुळें मी चक्रवर्ती व राजांचा मुकुटमणि अशा या देहाला स्त्रियांच्या हातांतील क्रीडामृग केलें. [म्ह० मी त्यांच्या अधीन झालों.] ९

मुकुट धारण करणारे महान् पराक्रमी राजे ज्या माझ्या चरणांना शरण येतात, त्या मीं निर्लज्जपणें वेश्येचे चरण धरिले. ३१ ज्या मज पुरूरव्याच्या आज्ञेत चराचरांतील राजे वागतात, तो मी कुत्र्याप्रमाणें एका वेश्येच्या हुकमांत राहिलों. ३२ गारुड्याचें माकड जसें नाचतें तसा मी उर्वशीच्या छंदानें नाचलों. मी सार्वभौम राजा असतां मला खरोखर अत्यंत निंद्य फल मिळालें. ३३ सगळे राजे ज्या मला मान देतात व माझ्या चरणांना वंदन करितात, तो मी हीन, दीन, अतिशय दरिद्री होऊन सर्वस्वीं उर्वशीच्या अधीन झालों. ३४ स्त्रीला प्रसन्न करण्यासाठीं मला तिच्या पायां पडण्याचें अनुचित कर्म करावें लागलें. धिक्कार असो अशा कामासक्त लोकांना. खरोखर हाच कामाचा मोठा हल्ला आहे. ३६ समुद्रवलयांकित पृथ्वीचा मी जो सार्वभौम राजा, त्या मलाहि एका वेश्येनें या भोवऱ्यांत टाकिलें. त्या भोंवऱ्याचें वर्णन राजा स्वतःच आपल्या मुखानें करीत आहे. १३६.

सपरिच्छदमात्मानं हित्वा तृणमिवेश्वरम्। यान्तीं स्त्रियं चान्वगमं नग्न उन्मत्तवद्रुदन्॥ १०॥

केवळ साकार मायाभ्रम। यालागीं प्रमदा स्त्रीचें नाम। संगें ठकिले उत्तमोत्तम। स्त्रीसंभ्रम बाढवितां॥ ३७॥ प्रमदा अंबेरें अलंकार। हें मायेचें सोलींव सार। एथ भुलले थोरथोर। मीही पामर स्त्रीसंगें॥ ३८॥ माझीच मज करणी। दिसतसे दैन्यवाणी। उर्वशी वेश्या कामचारिणी। जे बहुजनीं भोगिली॥ ३९॥ ऐशियेच्या कामासक्तता। मी सर्वस्वें भुललों आतां। ते भुललेपणाची कथा। अनुतापतां स्वयें बोलें॥ १४०॥ धर्मपत्नीसीं भोगितां काम। सहसा नासेना स्वधर्म। मज वोढवलेंसे दुष्ट कर्म। वेश्येसी परम भुललों॥ ४१॥ परदारा अभिलाषिती। ते अवश्य नरका जाती। मा स्वदाराकामासक्ती। तेथही अधोगती सोडीना॥ ४२॥ स्त्रियां भुलविलें हरिहर। स्त्रियां भुलविले ऋषिश्वर। स्त्रियां भुलविले थोर थोर। मीही किंकर स्त्रियीं केलों॥ ४३॥ राज्य आणि राजवैभव। वेश्येअधीन केलें सर्व। याहूनि केलें अपूर्व। तीलागीं जीव अर्पिला॥ ४४॥ मी राजवर्या मुकुटमणी। तो दास झालों तिचे चरणीं। बाप कंदर्पाची करणी। केलों कामिनीअधीन॥ ४५॥ ऐशिया मज राजेश्वरातें। वेश्येनें हाणोनि लातें। उपेक्षूनियां तृणवत्तें। निघाली निश्चितें सांडोनी॥ ४६॥ तीस जातां देखोनि पुढें। मी नागवा धांवें लवडसवडें। लाज सांडोनियां रडें। तरी ते मजकडे पाहेना॥ ४७॥ जेवीं कां लागलें महद्भूत। नातरी पिशाच जैसें उन्मत्त। तेवीं नागवा धांवें रडत। तरी तिचें चित्त द्रवेना॥ ४८॥ तरी रडत पडत अडखळत। मी निर्लज्ज तीमागें धांवत। माझे मोहाचा अतिअनर्थ। अपमान ग्रस्त मज झाला॥ ४९॥

—'अहोपण, प्रणयकुपित प्रियेच्या सान्त्वनासाठीं तिच्या अधीन होणें युक्तच आहे' असें जर म्हणाल तर तें खरें आहे. पण प्रस्तुत प्रसंगीं तेंहि नाहीं, असें आतां पुरूरवा सांगतो—

सपरिच्छदं ईश्वरं आत्मानं तृणं इव हित्वा यान्तीं स्त्रियं च नग्नः उन्मत्तवत् रुदन् अन्वगमं-राज्यादिक उपकरणांसह चक्रवर्ती असलेल्या मला तृणाप्रमाणें सोडून जाणाऱ्या त्या स्त्रीच्या मागोमाग मी नग्न होऊन वेड्याप्रमाणें रडत गेलों.

स्त्री म्हणजे आकारयुक्त मायाभ्रमच आहे. ती अत्यंत प्रमाद करविणारी आहे. म्हणून तिला प्रमदा म्हणतात. तिच्या संगतीनें अत्यंत श्रेष्ठ जन फसले आहेत. ३७ स्त्रिया, वस्त्रें व भूषणें हें मायेचें खरें सार आहे. त्यांच्या आसक्तीला मोठमोठे सज्जन भुलले आहेत. मीहि स्त्रीसंगानेंच दीन झालों. ३८ माझीच करणी मला बाधक झाली. उर्वशी उघड-उघड स्वैर वागणारी वेश्या. अनेक लोकांबरोबर तिनें विलास केलेले. ३९ पण अशा स्त्रीवर मी लुब्ध झालों व तिला सर्वस्वीं भाळलों. आपल्या त्या भाळण्याची कथा तो स्वतः पश्चात्तापपूर्वक सांगत आहे. १४० विवाहित धर्मपत्नीशीं रममाण झाल्यानें एकाएकीं स्वधर्माची हानि होत नाहीं. परंतु माझें दुर्दैव इतकें ओढवलें कीं, मी वेश्येवर अत्यंत भाळलों. ४१ जे परस्त्रीचा अभिलाष करितात, ते अवश्य नरकाला जातात; फार काय पण स्वस्त्रीचा संगहि अधोगतीला नेल्यावांचून रहात नाहीं. ४२ स्त्रियांनीं हरीला, शंकराला, परम ऋषींना व इतर श्रेष्ठ लोकांना भुलविलें आहे. मलाहि स्त्रीनेंच दास बनविलें. ४३ मीं माझें सर्व राज्य व ऐश्वर्य वेश्येच्या स्वाधीन केलें. याहूनहि अपूर्व गोष्ट म्हणजे मीं तिला जीव अर्पण केला. ४४ मी जो सगळ्या राजांचा श्रेष्ठ मुकुटमणि, तो तिच्या पायांचा दास झालों. मदनाची करणी मोठी विलक्षण आहे! त्यानें मला स्त्रीच्या अधीन केलें. ४५ अशा मज राजाधिराजाला वेश्येनें लाथेनें झिडकारिलें मला तृणवत् लेखून ती मला सोडून निघून गेली. ४६ तिला जातांना पाहून, मी तिच्या मागोमाग गडबडीनें नग्न स्थितींतच धांवत सुटलों. मीं लाज सोडून आक्रोश केला, तरीहि तिनें मागें वळून मजकडे पाहिलेंहि नाहीं. ४७ एखाद्याला जसें भूत लागावें किंवा एखादें उन्मत्त पिशाच जसें असतें, तसा मी नग्नावस्थेंत, रडत तिच्यामागें धांवत गेलों, पण तिचें मन द्रवलें नाहीं. ४८ तरीहि मी रडत, पडत, अडखळत निर्लज्जासारखा तिच्या मागें पळत सुटलों. माझ्या या मोहामुळें झालेला अनर्थ मला अत्यंत अपमानकारक झाला. १४९.

कुतस्तस्यानुभावः स्यात्तेज ईशित्वमेव वा । योऽन्वगच्छं स्त्रियं यान्तीं खरवत्पादताडितः ॥ ११ ॥

मी महत्त्वें राजराजेश्वरू । ऐसा गर्व होता दुर्धरू । तो मी वेश्येचा अनुचरू । झालों किंकरू निजांगें ॥ १५० ॥ एवढाही मी राजेश्वरू । मागें धांवें होऊनि किंकरू । तरी ते न करी अंगीकारू । जेवीं वोसंडी खरू खरी जैशी ॥ ५१ ॥ जेवीं खरी देखोनियां खरू । धांवोनि करी अत्यादरू । येरी उपेक्षूनि करी मारू । अतिनिष्ठुरू लातांचा ॥ ५२ ॥ तिच्या लाता लागतां माथां । खरू निघेना मागुता । त्या खराऐशी मूर्खता । माझे अंगीं सर्वथा बाणली ॥ ५३ ॥ स्त्री उदास कामदृष्टीं । मी आसक्त लागें पाठीं । माझ्या समर्थपणाची गोठी । सांगतां पोटीं मी लाजें ॥ ५४ ॥ ऐसें स्त्रीकाम ज्याचें मन । त्याचे योग याग अनुष्ठान । अवघेंचि वृथा जाण । तेंचि निरूपण निरूपी ॥ ५५ ॥

किं विद्यया किं तपसा किं त्यागेन श्रुतेन वा । किं विविक्तेन मौनेन स्त्रीभिर्यस्य मनो हृतम् ॥ १२ ॥

स्त्रीकाममय ज्याचें मन । त्याची वृथा विद्या वृथा श्रवण । वृथा तप वृथा ध्यान । त्याग मुंडण तें वृथा ॥ ५६ ॥ वृथा एकांतसेवन । वृथा जाण त्याचें मौन । राखेमाजीं केलें हवन । तैसें अनुष्ठान स्त्रीकाम ॥ ५७ ॥ कामासक्त ज्याचें चित्त । त्याचे सकळही नेम व्यर्थ । आपुलें पूर्ववृत्त निंदित । अनुतापयुक्त नृप बोले ॥ ५८ ॥

—तसाच माझा प्रभावादिकांविषयींचा अभिमानहि वृथाच आहे, असें आतां राजा सांगतो—

यः अहं खरवत् पादताडितः सन् यान्तीं स्त्रियं अन्वगच्छं तस्य अनुभावः तेजः ईशित्वं एव वा कुतः स्यात्—जो मी, गाढव जसा पायांनीं ताडन केला जात असला तरी गाढवीच्या मागोमाग जातो; त्याप्रमाणें मला सोडून जाणाऱ्या स्त्रीच्या मागोमाग गेलों, त्या माझ्यामध्यें प्रभाव, तेज, बल किंवा ईशित्व तरी कोठचें !

मी फार मोठा राजराजेश्वर असा मला अत्यंत गर्व होता. तो मी आपण होऊन वेश्येचा दास होऊन बसलों. १५० मी एवढा थोर राजराजेश्वर तिचा दास होऊन मागें धांवत असतां गाढवी जशी गाढवाला लाथा झाडून दूर घालविते, तसा तिनें माझा तिरस्कार केला. ५१ गाढवीला पाहून गाढव तिचा मोठा आदर करितो, पण ती उलट त्याला झिडकारून अतिशय निर्दयपणानें त्याच्यावर लाथांचा मारा करीत असते. ५२ याप्रमाणें डोकीवर लाथा जरी बसत असल्या तरी गाढव जसा तेथून हालत नाहीं, तसा त्या गाढवाप्रमाणें मीं मूर्खपणा केला. ५३ ती स्त्री विषयभोगाविषयीं उदास. पण मी कामासक्तीनें तिच्या पाठीस लागलों. त्यामुळें आतां माझ्या पराक्रमाच्या गोष्टी सांगण्यास मलाच लाज वाटते. ५४ ज्याची वृत्ति स्त्रीमध्यें इतकी आसक्त असते, त्याचा योग, याग, अनुष्ठान इत्यादि सर्व व्यर्थ आहे. आतां हरि याविषयींचेंच अधिक निरूपण करीत आहे. १५५.

—आजपर्यंत आचरलले माझे सर्व साधन व्यर्थ आहे, असें राजा म्हणतो—

यस्य मनः स्त्रीभिः हृतं तस्य विद्यया किं—ज्याचें मन स्त्रियांनीं हरण केलें आहे, त्याच्या विद्येचा काय उपयोग ! **तपसा त्यागेन श्रुतेन वा किं**—तप, संन्यास व शास्त्रश्रवण यांचा तरी काय उपयोग ! **विविक्तेन मौनेन किं**—एकान्तसेवन व मौन यांचा तरी काय उपयोग ! (सर्व व्यर्थ आहे.) १२

ज्याचें मन स्त्रीसंगाविषयीं लोलुप असतें त्याची विद्या, श्रवण, तप, ध्यान, संसाराचा त्याग, संन्यास, हीं व्यर्थ होत. ५६ त्याचें एकान्तात रहाणें व मौन धारण करणें, हीं दोन्हीं स्त्रीसंगामुळें राखेमध्यें हवन करण्याप्रमाणेंच व्यर्थ होत. ५७ ज्याचें मन कामासक्त असतें, त्याचे सर्व नेम-धर्म व्यर्थ होतात. याप्रमाणें तो राजा पश्चात्तापानें युक्त होऊन, आपल्या पूर्व चरित्राची निंदा करून आणखी असें बोलूं लागला. १५८.

स्वार्थस्याकोविदं धिङ्मां मूर्खं पण्डितमानिनम् । योऽहमीश्वरतां प्राप्य स्त्रीभिर्गोखरवज्जितः ॥ १३ ॥

चहूं पुरुषार्थांचें अधिष्ठान । नरदेह परम पावन । जेणें देहें करितां भजन । ब्रह्म सनातन पाविजे ॥ ५९ ॥ नरदेहीचा क्षण क्षण । समूळ निर्दळी जन्ममरण । भावें करितां हरिस्मरण । महापापें जाण निर्दळती ॥ १६० ॥ त्या नरदेहाची लाहोनि प्राप्ती । नरवर्य झालों चक्रवर्ती । त्या माझी जळो जळो स्थिती । जो वेश्येप्रती भुललों ॥ ६१ ॥ मानीं श्रेष्ठ मी सज्ञान । परी अज्ञानाहूनि अज्ञान । नेणेंचि निज-स्वार्थसाधन । वेश्येअधीन मी झालों ॥ ६२ ॥ लाभोनि नरदेहनिधान । म्यां देहीं धरिला ज्ञानाभिमान । न करींच निजस्वार्थसाधन । हें मूर्खपण पैं माझें ॥ ६३ ॥ जैसा गायीमागे कामयुक्त । धांवतां बैल न मानी अनर्थ । कां खरीमागें खर धांवत । तैसा कामासक्त मी निर्लज्ज ॥ ६४ ॥ खरी खरास हाणी लाताडें । तरी तो धसे पुढें पुढें । तैसाचि मीही वेश्येकडे । कामकैवाडें भुललों ॥ ६५ ॥ कामभोगाअंतीं विरक्ति । ऐसें मूर्ख विवेकी बोलती । ते अधःपातीं घालिती । हे मज प्रतीति स्वयें झाली ॥ ६६ ॥

सेवतो वर्षपूगान्मे उर्वश्या अधरासवम् । न तृप्यत्यात्मभूः कामो वह्निराहुतिभिर्यथा ॥ १४ ॥

सत्ययुगींचें आयुष्य माझें । ऐश्वर्य सार्वभौमराजे । उर्वशी स्वर्गमंडणकाजें । सर्वभोगसमाजें भोगितां– ॥ ६७ ॥ भोगितां लोटल्या वर्षकोटी । परी विरक्तीची नाठवे गोठी । मा वैराग्यभोगाशेवटीं । हे मिथ्या चावटी मूर्खांची ॥ ६८ ॥ स्त्रियेचें म्हणती अधरामृत । तेही मूर्ख गा निश्चित । तें उन्मादमद्य

——संतप्त होऊन राजा पुढील दोन श्लोकांनीं स्वतःची निंदा करितो——

यः अहं ईश्वरतां प्राप्य स्त्रीभिः गो-खरवत् जितः—जो मी सार्वभौम पदाला प्राप्त होऊनहि स्त्रियांकडून बैल किंवा गाढव यांप्रमाणें जिंकला गेलों त्या **स्वार्थस्य अकोविदं मूर्खं पंडितमानिनं मांधिक्—स्वार्थाला** न जाणणाऱ्या मूर्ख व पंडितमन्य अशा मला धिक्कार असो. १३

हा परम पवित्र मनुष्यजन्म चारी पुरुषार्थांचें अधिष्ठान आहे. या देहांत भजन केलें असतां सनातन ब्रह्माची प्राप्ति होते. ५९ मनुष्यदेहातील एकेक क्षण जन्म-मरणांचा समूळ नाश करितो. भक्तीनें हरिस्मरण केलें असतां महापातकांचें निरसन होतें. १६० अशा मनुष्य देहाला प्राप्त होऊन मी सार्वभौम राजा झालों असतांहि, एका वेश्येला भाळलों. ६१ धिक्कार असो या माझ्या भ्रष्ट बुद्धीला. मी स्वतःला अत्यंत श्रेष्ठ, ज्ञानी समजत होतों; परंतु मी अज्ञानाहूनहि मूर्ख ठरलों. आपल्या खऱ्या स्वार्थाचें साधन न जाणतां, मी वेश्येच्या अधीन झालों. ६२ मनुष्यदेह-रूपी अमूल्य ठेवा लाधला असतां, मी देहावर ज्ञानाभिमान ठेविला. स्वतःच्या हिताचें साधन आचरिलें नाहीं, हा माझा केवढा मूर्खपणा झाला ! ६३ कामासक्त बैल गायीच्या मागें धांवत असलेला अनर्थ जसा पहात नाहीं, किंवा गाढव गाढवीच्या मागोमाग पळत सुटतों, तसा मी कामासक्तीनें निर्लज्ज बनलों. ६४ गाढवी गाढवावर लाथा झाडीत असते, तरीहि तो जसा पुढेंच घुसत असतो, तसाच मीहि कामेच्छेनें वेश्येला भाळलों. ६५ कामभोगानंतर विरक्ति उत्पन्न होते, असे विवेकी लोक बोलतात, पण ते मूर्ख होत. कारण विषयोपभोग अधोगतीलाच नेतो, याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला. १६६

उर्वश्याः अधरासवं वर्षपूगान् सेवतः मे आत्मभूः कामः यथा आहुतिभिः वह्निः तथा न तृप्यति—उर्वशीचें अधरासव वर्षेंच्या वर्षें सेवन करीत असलेल्या माझ्या मनामध्ये उत्पन्न होणारा काम, आहुतींनीं जसा अग्नी शांत होत नाहीं तसा तृप्त होत नाहीं. १४.

माझें आयुष्य सत्ययुगाचें म्ह० दीर्घ काल होतें. मला सार्वभौम राजाचें वैभव प्राप्त झालें होतें. उर्वशी आपल्या स्वर्गांतील स्वार्थासाठीं मजकडून सर्व प्रकारचे विलास भोगवीत होती. ६७ त्या सुखोपभोगांत कोट्यवधि वर्षें लोटली, परंतु माझ्या मनांत कधीं विरक्तीची कल्पनाहि आली नाहीं. यावरून विषयोपभोगाच्या शेवटीं विरक्ति येते, ही केवळ मूर्खांची मिथ्या बडबड होय. ६८ स्त्रीच्या चुंबनाला 'अधरामृत' म्हणणारेहि मूर्खच होत. कारण तें अमृत तर

यथार्थ । अधिकें चित्तभ्रामक ॥ ६९ ॥ वनिताअधारपानगोडी । त्यापुढें सकळ मद्यें बापुडीं । तत्काळ अनर्थी पाडी । निजस्वार्थकोडीनाशक ॥ १७० ॥ घालितां कोटि घृताहुती । अग्नीसी कदा नव्हे तृप्ती । तेवीं वनिताकामासक्ती । कदा विरक्ति उपजेना ॥ ७१ ॥ ऐसा आठ श्लोकीं अनुताप । स्वयें बोलोनियां नृप । हृदयीं उपजला विवेकदीप । जेणें झांके कंदर्प तें स्मरलें ॥ ७२ ॥ सकामासी विषय त्यागितां । वासना न त्यागे सर्वथा । कां आदरें विषय भोगितां । विरक्ति सर्वथा उपजेना ॥ ७३ ॥ ऐशियें अर्थीचा उपावो । विचारोनि बोले रावो । कामत्यागाचा अभिप्रावो । साचार पहा हो संबोधी ॥ ७४ ॥

पुंश्चल्यापहृतं चित्तं को न्वन्यो मोचितुं प्रभुः । आत्मारामेश्वरमृते भगवन्तमधोक्षजम् ॥ १५ ॥

पुरुषा सदा स्त्रीअनुराग । परी सहसा न करवे प्रसंग । त्यासी पुंश्चलीचा घडल्या संग । तें बाधी निलाग हावभावीं ॥ ७५ ॥ पुंश्चलीचे कटाक्षगुण । तेंचि पुरुषासी दृढ बंधन । स्त्रीकामबंधन सोडवी कोण । एका नारायणावांचूनी ॥ ७६ ॥ कामिनीकामापासूनि निर्मुक्त । कर्ता ईश्वर समर्थ । जो कां आत्माराम भगवंत । तोचि निश्चित सोडविता ॥ ७७ ॥ मायागुणें कामसंचार । अविद्या वाढवी साचार । मायानियंता जो ईश्वर । तो कामकरकर निर्दळी ॥ ७८ ॥ स्वस्वरूपीं रमण आराम । ऐसा जो कां आत्माराम । तो निवारी सकळ काम । करी निभ्रम निजात्मता ॥ ७९ ॥ जो भोग भोगूनि अभोक्ता । त्या शरण रिघाल्या अनंता । बाधूं न शके विषयावस्था । स्त्रीसंगीं सोडविता तो एक ॥ १८० ॥ जो निवारी अधोगती । तो अधोक्षज असतां भक्तपती । शरण रिघाल्या तया निश्चितीं ।

नव्हेच, पण उन्माद आणणारे मद्य आहे. त्यानें चित्ताला अधिकच भ्रम होतो. ६९ स्त्रीच्या अधरामृताचें माधुर्य इतकें आहे, कीं, यापुढे इतर सर्व मद्यें तुच्छ वाटूं लागतात. कारण हें अधरामृत खऱ्या स्वार्थाच्या राशी नष्ट करून तत्काल अनर्थांत टाकितें. १७० तुपाच्या कोट्यवधि आहुत्या टाकिल्या तरी अग्नीची जशी तृप्ति होत नाहीं, तशी स्त्रीसंगापासून केव्हांहि विरक्ति उत्पन्न होत नाहीं. ७९ अशाप्रकारें राजानें आठ श्लोकांनीं आपला पश्चात्ताप सांगितला. त्याच्या हृदयांतील विवेकदीप प्रज्वलित झाल्यामुळें मदनाची व्यथा कशामुळें नष्ट होईल हें त्याला आठवलें. ७२ मनांत आसक्ति ठेवून विषयांचा त्याग केला असतां वासना केव्हांहि नाहींशी होत नाहींत. किंवा मोठ्या आवडीनें या विषयांचा उपभोग घेतला असतां मनांत विरक्ति केव्हांहि उत्पन्न होत नाहीं. ७३ याविषयींचा उपाय राजा विचार पूर्वक सांगत आहे. कामत्यागाचा खरा विचार आतां राजा सांगत आहे. पहा. १७४.

—याप्रमाणें आठ श्लोकांनीं राजानें आपलें- निर्वेद—वैराग्य सांगितलें. आतां दहा श्लोकांनीं विवेक सांगतो—

पुंश्चल्या अपहृतं चित्तं मोचितुं भगवन्तं अधोक्षजं आत्मारामेश्वरं ऋते अन्यः कः नु प्रभुः—जारिणीनें हरण केलेल्या चित्ताला सोडविण्यास भगवान् अधोक्षजच आत्मारामेश्वरावांचून दुसरा कोण बरें समर्थ आहे ! [कोणी नाहीं. कर्मांच्या योगानें देवांचें यजन करून मी दुःखालाच प्राप्त झालो आहें. यास्तव मी आतां परमेश्वराचेंच भजन करितों असा याचा भावार्थ.] १५.

पुरुषाला निरंतर स्त्रीची लालसा असतें; तथापि त्याला स्वस्त्रीबरोबर अतिप्रसंग सहसा करवत नाहीं. त्यामुळें त्याला वेश्येची संगत लागली कीं, तो तिच्या हावभावांनीं अत्यंत कामातुर होतो. ७५ वेश्येचे नेत्रकटाक्षच पुरुषाला बंधनांत टाकितात. मग एका नारायणावांचून त्याला या स्त्रीसंगाच्या आसक्तीपासून कोण सोडविणार ! ७६ स्त्रीविषयींच्या कामासक्तीपासून मुक्त करणारा एक ईश्वरच समर्थ आहे. आत्माराम भगवंतच त्यांतून निश्चयानें सोडविणारा आहे. ७७ मायेच्या गुणांमुळें कामसंचार होतो व अज्ञान अत्यंत वाढतें परंतु मायेचें नियमन करणारा जो ईश्वर तो कामपीडेचें निवारण करितो. ७८ आत्मस्वरूपांत रममाण होऊन आनंदरूप असणारा जो आत्माराम तो सगळ्या कामाचें निवारण करितो व आत्मस्वरूप भ्रमशून्य करितो. ७९ भोग भोगूनहि अभोक्ता असलेल्या त्या अनंताला शरण गेलें असतां विषयावस्था बाधूं शकत नाहीं. स्त्रीसंगापासून सोडविणारा तोच एक आहे. १८० भक्ताचा स्वामी जो श्रीकृष्ण त्याला शरण गेलें असतां कामासक्तीचें निवारण होतें. ८१ तो राजा कामासक्तीला कंटाळला, बाह्य विषया-

कामासक्ती निवारे ॥ ८१ ॥ राजा कामासक्तीं अतित्रासला । बाह्य विषयीं उदास झाला । त्याचा वासनाकाम जो उरला । तो न वचे त्यागिला त्याचेनि ॥ ८२ ॥ सर्वभावेंसी संपूर्ण । हरीसी रिघालिया शरण । सकळ कामाचें निर्दळण । सहजें जाण स्वयें होय ॥ ८३ ॥ एकाचा मतवाद निश्चितीं । करितां श्रुतिवाक्यव्युत्पत्ती । यजितां इंद्रादि देवांप्रती । कामनिवृत्ती हृदयस्थ ॥ ८४ ॥ ऐसें बोलती जे सज्ञान । ते सर्वथा गा अज्ञान । हरीसी न रिघतां शरण । कामसंचरण शमेना ॥ ८५ ॥ इंद्रादि देव कामासक्ती । विटंबले नेणों किती । त्यांचेनि भजनें कामनिवृत्ति । जे म्हणती ते अतिमूर्ख ॥ ८६ ॥

बोधितस्यापि देव्या मे सूक्तवाक्येन दुर्मतेः । मनोगतो महामोहो नापयात्यजितात्मनः ॥ १६ ॥

काम्य कर्मीं होईल सुख । हें बोलणें समूळ लटिक । काम्य कर्मीं अधिक दुःख । हें नेणती मूर्ख सकाम ॥ ८७ ॥ प्रत्यक्ष म्यां याग करून । इंद्रादि देवांतें यजून । उर्वशीसंभोगा लाधून । अतिदुःखी जाण मी झालों ॥ ८८ नारायणऊरूसीं जन्मली । यालागीं उर्वशी नांव पावली । त्या मज श्रुतिवाक्यें बोधिली । निष्काम बोली अतिशुद्ध ॥ ८९ ॥ ऐकतां श्रुतिनिष्कामबोली । माझी न वचेच सकाम भुली । जंव गोविंदें कृपा नाहीं केली । तंव कामाची चाली खुंटेना ॥ १९० ॥ भावें हरीसी रिघाल्या शरण । हृदयीं प्रकटे नारायण । तेव्हां सर्व काम सहजें जाण । जाती पळोन हृदयस्थ ॥ ९१ ॥ उर्वशीकामसंगें जाण । थोर कष्टलों मी आपण । असो तिचा अपराध कोण । मी हरीचें स्मरण विसरलों ॥ ९२ ॥ जरी मी करितों हरीचें स्मरण । तरी काम बापुडें बाधी कोण । मज माझी असतां आठवण । तेथ तुच्छ जाण उर्वशी ॥ ९३ ॥

विषयीं उदास झाला, परंतु त्याच्या अंतःकरणांत असलेली वासना मात्र त्याला कांहीं केल्या सोडतां सोडवेना. ८२ पूर्ण भक्तिभावानें हरीला शरण गेलें असतां सर्व वासनांचा स्वभावतःच नाश होतो. ८३ कांहीं लोकांच्या मतानें वेदाध्ययन व इंद्रादि देवांचें पूजन केलें असतां हृदयांतील वासनाक्षय होतो. ८४ परंतु असें बोलणाऱ्या विद्वानांस पूर्णपणें अज्ञच समजावें. कारण प्रभूला शरण गेल्यावांचून कामबाधा शांत होत नाहीं. ८५ स्वतः इंद्रादि देवच या कामासक्तीनें किती नाडले गेले, हें कळत नाहीं. असें असतां त्यांच्या भजनानें कामनिवृत्ति होते, असें म्हणणारेच मूर्ख होत. १८६.

परमेश्वराच्या प्रसादावांचून देवांनीं उपदेशिलेल्या सूक्तवाक्यांनीहि मोहाची निवृत्ति होत नाहीं, असें आतां राजा सांगतो—

देव्या सूक्तवाक्येन बोधितस्य अपि दुर्मतेः अजितात्मनः मे मनोगतः महामोहः न अपयाति–देवी उर्वशीनें सूक्तवाक्यांनीं ' पुरूरवो मा मृथा मा प्रतत:० ' इत्यादि यथार्थवचनानें बोध केलेल्याहि दुर्बुद्धि व अजितेंद्रिय अशा माझा मनोमोह निवृत्त होत नाहीं. [' हे पुरूरवा, मरूं नको, अतिशय संतप्त होऊं नको, तुला हिंस्र लांडगे न खावोत, स्त्रिया केव्हांहि हित करीत नाहींत., त्यांचीं हृदयें लांडग्यांच्या हृदयांसारखीं असतात ' असा पूर्वोक्त सूक्ताचा भावार्थ आहे.] १६.

यज्ञ-यागादि काम्य कर्मांनीं सुख होईल हें बोलणें मिथ्या आहे. काम्य कर्मांत उलट दुःखच आहे. हें त्या सकाम कर्म करणाऱ्या मूर्खांना कळत नाहीं. ८७ प्रत्यक्ष माझीच गोष्ट घ्या. मीं यज्ञ-याग करून इंद्रादि देवांची उपासना करून उर्वशीविलासाची प्राप्ति करून घेतली आणि अखेर अतिशय दुःखी झालों. ८८ नारायणाच्या मांडींतून उपजली म्हणून तिला ' उर्वशी ' हें नांव पडलें. त्या उर्वशीनें मला निष्काम शब्दांनीं अत्यंत शुद्ध अशा श्रुतिवचनांचा बोध केला. ८९ तें श्रुतीचें निष्काम वचन ऐकूनहि माझी कामासक्तीची भूल गेली नाहीं, कारण जोवर गोविंदानें कृपा केली नाहीं, तोवर कामाचा वेग थांबत नाहीं. ९० भक्तिभावानें श्रीहरीला शरण गेलें असतां हृदयस्थ नारायण प्रकट होतो. त्यावेळीं अंतःकरणातील सर्व इच्छा पळून जातात, ९१ उर्वशीवरील आसक्तीमुळें मला अत्यंत कष्ट झाले. पण यांत तिचा तरी काय अपराध ! मीच मुळीं श्रीहरीचें स्मरण विसरलों होतों. ९२ मींच श्रीहरीचें स्मरण केलें असतें तर काम बापडा पुढें येण्यासहि धजला नसता ! मला जर माझी आठवण असती तर उर्वशीला तुच्छ मानिली असती. १९३.

किमेतया नोऽपकृतं रज्ज्वा वा सर्पचेतसः । रज्जुस्वरूपाविदुषो योऽहं यदजितेन्द्रियः ॥ १७ ॥

मूढमतीचा प्रबोध । मानी उर्वशीचा अपराध । विवेकें पाहतां शुद्ध । मीच मतिमंद सकाम ॥ ९४ ॥ उर्वशी देखतां दृष्टीं । मी कामासक्त झालों पोटीं । माझिये लंपटतेसाठीं । मज म्यां शेवटीं नाडिलें ॥ ९५ ॥ जेवीं सांजवेळे पडिला दोरू । भेडा सर्प भासे थोरू । जंव नाहीं केला निर्धारू । तंव महाअजगरू भयानक ॥ ९६ ॥ तेणें सर्पभयें लवडसवडी । पळों जातां पैं तांतडी । दुपावली पडली आडी । त्याची कल्पना नाडी तयासी ॥ ९७ ॥ तेवीं माझिये कामभ्रांतीं । उर्वशी सुंदर युवती । एथ माझिया कामासक्ती । सुरतरतीं भुललों ॥ ९८ ॥ यापरी मी अविवेकात्मा । भुललों उर्वशीच्या कामा । तीवरी कोपणें जें आम्हां । हेंचि अधर्माचें मूळ ॥ ९९ ॥ दृष्टीं देखतां कामिनी । कामासक्त ते अतिरमणी विवेकिया पोहणघाणी । नरकमाथणी ते कांता ॥ २०० ॥ जेवीं सूकरा विष्ठेची प्रीती । तेवीं सकामा कामिनीची रती । विवेकी देखोनि थुंकिती । तेंचि श्लोकार्थीं नृप बोले ॥ १ ॥

क्वायं मलीमसः कायो दौर्गन्ध्याद्यात्मकोऽशुचिः । क्व गुणाः सौमनस्याद्या ह्यध्यासोऽविद्यया कृतः ॥१८॥

स्त्री पुरुष नामाभिधान । केवळ देहासीचि जाण । ते स्त्रीदेहीं पाहतां गुण । मलिनपण अत्यंत ॥ २ ॥ जे नीच नव्या विटाळाची खाणी । जे रजस्वलेची प्रवाहन्हाणी । जे कां दुर्गंधाची पोहणी । जे उतली

—पंधराव्या श्लोकांत उर्वशीला 'पुंश्चली' असें म्हणून तिनें केलेल्या अपकारांचें स्मरण केलें. पण आतां माझाच सर्व अपराध आहे, असें राजा सांगतो—

नः एतया किं अपकृतं—कामी बनलेल्या आम्हांला उर्वशीनें काय अपकार केला ! कांहीं नाहीं. **रज्जुस्वरूपाविदुषः सर्पचेतसः रज्ज्वा वा किं कृतं**—रज्जुस्वरूप न जाणणाऱ्या व त्यामुळें तिच्या ठिकाणीं सर्पाची कल्पना करून खेद पावणाऱ्या रज्जुद्रष्ट्याला रज्जु कांहीं करीत नाहीं. **यत् यः अहं अजितेंद्रियः**—कारण जो मीच स्वतः अजितेंद्रिय आहें, त्या मला ती काय करणार ! [खरोखर मीच अपराधी आहें, असा भावार्थ.] १७.

मूढमतींच्या दृष्टीला उर्वशीचा अपराध दिसेल; परंतु शुद्ध मनानें विचार केला असतां मीच कामासक्त, विवेक-शून्य व मूर्ख बनलों, हेंच खरें. ९४ उर्वशी दृष्टीस पडतांच, मी मनांत कामातुर झालों. स्वतःच्याच स्त्रीलंपटणापमुळें मी स्वतःलाच नाडलें. ९५ संध्याकाळच्या वेळीं अंधारांत पडलेला दोर दिसताच भित्र्याला 'तो महासर्पच आहे' असें भासतें. ९६ जोंपर्यंत खात्री पटली नाहीं, तोंपर्यंत तो त्याला भयंकर अजगरच समजतो व त्याच्या भयानें लगबगीनें पळत सुटतो. त्या धांदलींत पायांत पाय अडखळून तो पडतोहि. ९७ ही त्याची निव्वळ कल्पनाच त्याला बाधत असते. तसा मी भ्रांतीनें उर्वशीला सुंदर युवती समजलों आणि माझ्या कामासक्तीमुळें तिच्या विलासांत मग्न झालों. ९८ अशाप्रकारें मी स्वतःच्याच अविचारानें उर्वशीवर लुब्ध झालों असतां तिच्यावर व्यर्थ रागावणें हें अधर्माचें मूळच आहे. ९९ स्त्री दृष्टीस पडतांच कामासक्त माणसाला ती सौंदर्याची पुतळी भासते. परंतु विचारवानाला ती अमंगल व नरकाचें पात्रच वाटत असते. २०० डुकराला जशी विष्ठेची आवड असते, तशी कामासक्ताला स्त्रीसंगाची गोडी असते, परंतु विचारी लोक त्याच्याकडे पाहून थुंकत असतात. याविषयींचें वर्णन पुढल्या श्लोकांत राजा सांगत आहे. १

—'तथापि सौगंध्य, प्रेम, इत्यादि गुणांनीं तीच संमोहाचें कारण आहे' अशी आशंका घेऊन 'ते गुणहि आपल्या मतीनें कल्पिलेलेच आहेत,' असें चार श्लोकांनीं राजा सांगतो—

अयं मलीमसः दौर्गन्ध्याद्यात्मकः अशुचिः कायः क्व सौमनस्याद्या गुणाः क्व—हा अत्यंत मलिन, दुर्गंधादिकांनीं युक्त व अशुचि देह कोठें व सौमनस्यादिक गुण कोठें ? **अविद्यया अध्यासः कृतः**—अविद्येनें त्यावर हा केवल गुणांचा आरोप केला आहे. [पुष्पांच्या सुगंधासारखा गंध, सुकुमारता इत्यादि गुणांचा अत्यंत मलिन देहावर अविद्येमुळें केवल आरोप केला जातो.] १८.

स्त्री आणि पुरुष हीं नांवें केवळ देहाचीं आहेत. परंतु त्या स्त्रीदेहाचे गुण-धर्म पाहिले असतां तें शरीर अत्यंत अमंगल आहे. २ स्त्रीचा देह नित्य नव्या विटाळाची खाणच आहे. रजस्वलेच्या प्रवाहानें किसळवाण्या घाणीचें तें

चिडाणी विष्ठेची ॥ ३ ॥ जे कां दोषांचें जन्मस्थान । जे विकल्पाचें आयतन । जे महादुःखाचें भाजन । अधःपतन जिचेनी ॥ ४ ॥ जे वाढवी अतिउद्वेग । जिचेनि मनासी लागे क्षयरोग । जिचा बाधक अंगसंग । अतिनिलाग निंद्यत्वें ॥ ५ ॥ जेवीं नीचाचा कांठपरा । गळां अडकल्या मांजरा । तें रिघोनि शुचीचिया घरा । नाना रसपात्रां विटाळी ॥ ६ ॥ तेवीं कामिनीची संगती । गळां पडली न निघे मागुती । कामिनीकाम कामासक्तीं । नेणों किती विटंबिले ॥ ७ ॥ तें मांजर जेथें घाली मुख । तेथ कांठपरा रोधी देख । तेवीं स्त्रीसंगें अतिदुःख । मानिती सुख सकाम ॥ ८ ॥ मृगजळीं कमळ मनोहर । तैसें अंगनावदन सुंदर । सुस्मित चारु सुकुमार । सकाम नर वानिती ॥ ९ ॥ अंगनावदनाची निजस्थिती । निखळ शेंबुडाची तेथ वस्ती । तें मुख चंद्रेंसीं उपमिती । जेवीं अमृत म्हणती विखातें ॥ २१० ॥ वनिताअधरीं झरे लाळ । ते म्हणती अधरामृत केवळ । बाप अविद्येचें बळ । भुलले सकळ सुरासुर ॥ ११ ॥ स्त्रीपुरुषीं आत्मा एक । स्त्रीरुप तेथ आविद्यक । मिथ्या स्त्रीकामीं भुलले लोक । बाप कवतिक मायेचें ॥ १२ ॥ आत्मा भोक्ता म्हणावा स्त्रीसंभोगी । तंव तो नित्यमुक्त असंगी । देह भोक्ता म्हणावा स्त्रीसंयोगी । तंव देहाचे अंगीं जडत्व ॥ १३ ॥ तेथ विषयभोगासी कारण । मुख्यत्वें देहाभिमान । त्या देहाभिमानासी जाण । बहुत जन विभागी ॥ १४ ॥

पित्रोः किं स्वं नु भार्यायाः स्वामिनोऽग्नेः श्वगृध्रयोः । किमात्मनः किं सुहृदामिति यो नावसीयते ॥१९॥

स्थानच बनतें. ३ स्त्री दोषांचें जन्मस्थान, विकल्पाचें आश्रयस्थान व महादुःखाचें पात्र असून तिच्यामुळें पुरुषाचा अधःपात होतो. ४ तिच्यामुळें चित्ताचा उद्वेग वाढतो. मनाला क्षयरोग लागतो. अत्यंत निर्लज्जपणामुळें तिचा स्पर्श अत्यंत बाधक होतो. ५ एखाद्या नीच व हीन माणसाच्या घरांतील फुटक्या मडक्याचा कांठ मांजरीच्या गळ्यांत अडकला असतां, तें मांजर जसें शुचिर्भूत माणसाच्या घरांत शिरून त्याच्या स्वयंपाकाच्या भांड्यांना आपल्या स्पर्शानें विटाळ करितें, ६ त्याप्रमाणें ही स्त्रियांची संगति आहे. ती एकदा गळ्यांत पडली कीं, कदापि सुटत नाहीं. स्त्रीसंगाच्या आसक्तीनें किती लोकांची विटंबना केली आहे, त्यांची गणति नाहीं ! ७ तें मांजर ज्यांत तोंड घालावयास जाते तेथें तो फुटका काठ त्याला आडवा येतो. त्याप्रमाणें स्त्रीसंगांत अत्यंत दुःख आहे. परंतु कामासक्त लोक त्यांतच सुख मानितात. ८ मृगजलांतील कमल जसें मनोवेधक असावें, तसें स्त्रीचें मुखकमल सुंदर, सुस्मित, मोहक व सुकुमार आहे, असें कामासक्त लोक त्याचें वर्णन करितात. ९ परंतु खरें पाहूं गेल्यास स्त्रीचें मुख शेंबूड इत्यादि घाण पदार्थांनीं युक्त असतें. त्या मुखाला चंद्राची उपमा द्यावयाची म्हणजे विषाला अमृत म्हणण्यासारखेंच आहे. २१० स्त्रीच्या मुखांतून जी लाळ गळत असते, तिला ते अधरामृत म्हणतात. अविद्येचा प्रभाव काय विलक्षण आहे, पहा ! स्त्रीला सगळे सुर व असुर भुलतात. ११ वस्तुतः स्त्री व पुरुष या दोघांचा आत्मा एकच आहे. स्त्रीदेह केवल मायिक म्ह० भ्रांतिमूलक आहे. अशा मिथ्या स्त्रीसंगाला लोक भाळतात. मायेचा खेळ कसा अगाध आहे पहा ! १२ बरें, स्त्रीसंगाचा भोक्ता आत्मा आहे, असें जर म्हणावें, तर तो नित्यमुक्त असंग आहे. देहाला भोक्ता समजावें तर देह जड आहे. १३ वास्तव देहाभिमानच या विषयभोगाचें मुख्य कारण आहे व त्या देहाभिमानाचे भागीदारहि पुष्कळ आहेत. २१४.

त्यावरील ममत्वहि कल्पितच आहे, असें राजा सांगतो—

कायः पित्रोः किं स्वं नु भार्यायाः स्वामिनः अग्नेः श्वगृध्रयोः आत्मनः किं इति यः न अवसीयते—शरीर आई-बापांचें धन आहे. (कारण ती त्याची जनक आहे,) कीं तें भार्येचें धन आहे ! (कारण तें तिला भोग देणारें आहे. येथें याचा वस्तुतः कांहीं उपयोग जरी नसला तरी तुल्य न्यायामुळें हें सांगितलें आहे.) किंवा अधीनतेमुळें तें स्वामीचें धन आहे कीं अन्त्येष्टींतील आहुतित्वामुळें तें अग्नीचें आहे कीं भक्ष्यत्वामुळें कुत्रे व गिधाडें यांचें आहे, किंवा तत्कृत शुभाशुभ भागित्वामुळें तें आत्म्याचें आहे कीं उपकारित्वामुळें सुहृदांचें आहे ! असा विचार करूं लागलें असतां तें कोणाचें आहे, याचा निश्चयच होत नाहीं. १९.

गर्भधारण पोषण। स्वयें श्रमोनियां आपण। माता करी परिपालन। तो हा देह जाण मातेचा ॥ १५ ॥ एकलेपणें माता। स्वप्नीं न देखे पुत्रकथा। जो निजवीर्यनिक्षेपिता। तो हा देहो तत्त्वतां पित्याचा ॥ १६ ॥ जे अग्नि ब्राह्मण साक्षी करूनी। भार्या आणिली भाक देवोनी। जे जीवित्व समर्पोनी। सेवेलागोनी विनटली ॥ १७ ॥ जीसी याचेनि सुखश्रृंगार। जीसी याचेनि ऐहिक पर। ऐसा सूक्ष्म करितां विचार। देहो साचार स्त्रियेचा ॥ १८ ॥ या देहाचीं आवश्यकें। सुहृद् बंधू जे कां सखे। देहाचेनि सुखावती सुखें। देह एकें पाखें त्यांचाही ॥ १९ ॥ स्वयें घेऊनियां वेतन। देहो विकिला आपण। आज्ञेवीण न वचे क्षण। देहो जाण स्वामीचा ॥ २२० ॥ श्वानश्रृगालगिधांचें खाजें। तरी देहो त्यांचा म्हणिजे। जीवास्तव देहीं कर्म निपजे। यालागीं देह बोलिजे जीवाचा ॥ २१ ॥ पिता माता स्त्री पुत्र स्वजन। देहाचें अवश्य करिती दहन। यालागीं देह अग्नीचा पूर्ण। विचक्षण बोलती ॥ २२ ॥ यापरी देहाचे जाण। विभागी असती आठजण। तेथ मी भोक्ता हा अभिमान। तो केवळ जाण मूर्खत्वें ॥ २३ ॥ एथ एक मी विशिष्ट भोक्ता। माझा देह ऐसी ममता। हेचि जाण तत्त्वतां। अधःपाता नेतसे ॥ २४ ॥

तस्मिन्कलेवरेऽमेध्ये तुच्छनिष्ठे विषज्जते। अहो सुभद्रं सुनसं सुस्मितं च मुखं स्त्रियः ॥ २० ॥

देहो तितुका अशौचकर। त्यांत स्त्रीदेह अतिअपवित्र। केवळ विटाळाचें पात्र। निरंतर द्रवरूपें ॥ २५ ॥ स्वयें भोक्ता अतिकुश्चित। ऐसे अविवेकी कामासक्त। कामिनीकामीं लोलंगत। ते मूर्ख वानीत स्त्रियांतें ॥ २६ ॥ अहो हे सुंदर सुरेख। चंद्रवदन अतिसुमुख। सरळ शोभे नासिक। सुभग देख

माता गर्भधारणेपासून कष्ट सोसून बालकाचें पोषण करितें, म्हणून हा देह मातेचा आहें. १५ परंतु माता एकटीच असतां तिला अपत्याची वार्ता स्वप्नांतहि ऐकूं येत नाहीं. पित्याच्या वीर्यापासून देहाची उत्पत्ति होते. यास्तव हा देह पित्याचा आहे. १६ अग्नि-ब्राह्मणांना साक्षी ठेवून 'धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि' अशी शपथ घेऊन जिनें पाणी-ग्रहण केलें, जिनें आपलें सर्वस्व अर्पण करून पतीच्या सेवेंत स्वतःला वाहून घेतलें, १७ जिला त्याच्याचमुळें खरें सौख्य आणि इहलोक व परलोक प्राप्त होतो त्या धर्मपत्नीचा हा देह आहे; असें थोड्याशा विचारानें दिसून येतें. १८ सुहृद् बंधु, मित्र हे सर्व या देहामुळें सुखी होतात. तेव्हां एका पक्षीं हा देह त्यांचाहि आहे. १९ आपण स्वतः पगार घेऊन हा देह सेवेसाठीं विकल्यामुळें स्वामीच्या आज्ञेवांचून एक क्षणभरहि इकडचें तिकडे होतां येत नाहीं, यावरून हा देह स्वामीचा ठरतो. २२० शिवाय कुत्री, कोल्हीं, गिधाडें यांचें भक्ष्य असल्यामुळें या देहावर त्यांचाहि हक्क आहे. असें म्हणावें लागतें. जीवामुळेंच तर देहाकडून सर्व कर्म घडतें, तेव्हां हा देह जीवाचा म्हटला पाहिजे. २१ शेवटीं माता-पिता, स्त्री-पुत्र आप्त-मित्र ही सर्व मिळून देहाचें दहन करितात. म्हणून हा देह अग्नीचा आहे, असें विद्वान बोलतात. २२ याप्रमाणें देहाचे आठ भागीदार आहेत. तेव्हां त्यावर 'मी भोक्ता' असा अभिमान ठेवणें हा केवळ मूर्खपणा आहे. २३ कारण मी एक अमुक भोक्ता हें अहंत्व आणि हा माझा देह अशी ममता, हे दोन अभिमानच अधोगतीला नेतात. २२४

तस्मिन् अमेध्ये तुच्छनिष्ठे कलेवरे अहो **स्त्रियः मुखं सुभद्रं सुनसं सुस्मितं** इति **विषज्जते**–त्या अमंगल, कृमी, कीट व भस्म यांमध्यें ज्याचा अंत आहे, अशा शरीरावर 'काय हो या स्त्रीचें मुख सुंदर आहे, नाक किती सरळ आहे व स्मित किती चित्ताकर्षक आहे,' असें म्हणून पुरुष आसक्त होतो. २०

जेवढें शरीर तेवढें अपवित्र, त्यातहि स्त्रीदेह तर अतिशय अमंगल आहे. तें तर निरंतर स्त्रवणारें केवळ विटाळाचें पात्रच आहे. २५ त्याचा भोक्ता स्वतः अत्यंत पातकी होय. असे कामासक्त लोक अविचारी असतात. ते मूर्ख लोलुप होऊन स्त्रियांचें असें वर्णन करीत असतात कीं, २६ काय हो हें सुंदर स्वरूप ! हिचें मुखकमल

सुकुमार ॥ २७ ॥ ऐशिये सुंदर स्त्रियेतें । पावलों आम्ही सभाग्य येथें । ऐसे कामासक्तचित्तें । भुललीं भ्रांतें प्रमदांसी ॥ २८ ॥ स्त्रीदेहाचे विवंचनें । विवंचितां ओकारा ये मनें । जळो स्त्रियेचें निंद्य जिणें । मूर्खीं रमणें ते ठायीं ॥ २९ ॥

त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जाऽस्थिसंहतौ । विण्मूत्रपूये रमतां कृमीणां कियदन्तरम् ॥ २१ ॥

स्त्रीदेहाचा उभारा । केवळ अस्थींचा पांजरा । त्याचें आवरण तें स्नायु शिरा । बांधोनि खरा दृढ केला ॥ २३० ॥ तेथ रुधिरमांसांचें कालवण । करूनि पांजरा लिंपिला पूर्ण । अस्थीवरील जें वेष्टण । मज्जा म्हणती त्या नांव ॥ ३१ ॥ अस्थीमाजील सुबद्धू । त्या नांव बोलिजे मेंदू । वरी चर्म मढिलें सुबद्धू । त्वचा शुद्धू ती नांव ॥ ३२ ॥ त्या देहामाजीं सांठवण । विष्ठा मूत्र परिपूर्ण । ते स्त्रीदेहीं ज्याचें रमण । ते कृमि जाण नररूपें ॥ ३३ ॥ विष्ठेमाजीं कृमि चरती । तैसी स्त्रीदेहीं ज्यां आसक्ती । तेही कृमिप्राय निश्चितीं । संदेह ये अर्थीं असेना ॥ ३४ ॥ वनितादेह यापरी एथ । विचारितां अतिकुश्चित । तो वस्त्रालंकारीं शोभित । करूनि आसक्त नर होती ॥ ३५ ॥ घंटापारधी पाश पसरी । त्यावरी तो मृगातें धरी । पुरुष स्त्रियेतें शृंगारी । त्या पाशाभितरीं स्वयें अडके ॥ ३६ ॥ यालागीं स्त्रियांची संगती । कदा न करावी विरक्तीं । गृहस्थीं सांडावी आसक्ती । येचि अर्थीं नृप बोले ॥ ३७ ॥

अथापि नोपसज्जेत स्त्रीषु स्त्रैणेषु चार्थवित् । विषयेन्द्रियसंयोगान्मनः क्षुभ्यति नान्यथा ॥ २२ ॥

किती मोहक आहे. नाक कसें सरळ आहे! काय नाजुक, सुकुमार बांधा आहे! २७ अशा सुंदर स्त्रीची प्राप्ति झाल्यामुळें मी केवढा भाग्यवान् आहे! अशा कामासक्तीनें भ्रांत झालेले लोक स्त्रियांवर लुब्ध होतात. २८ पण स्त्रीदेहाकडे विचारदृष्ट्या पाहिलें असतां मनाला किळस येते. जळो स्त्रियांचें निंद्य जीवित. जे मूर्ख असतील त्यांनींच यांच्यावर आसक्त व्हावें. २९.

—याप्रमाणें गुणांचा आरोप करून स्त्री शरीरांशीं रममाण होणारे माझ्यासारखे पुरुष कृमितुल्य होत असें राजा सांगतो—

त्वक०...संहतौ विण्मूत्रपूये रमतां कृमीणां च कियत् अन्तरं—त्वचा, मांस, रक्त शिरा, मेद, मज्जा, हाडें यांचा संघात व विष्ठा-मूत्र-पू यांचा संघात अशा या देहाशीं रममाण होणारे पुरुष व कृमी यांच्यामध्यें काय अंतर आहे! २१

स्त्रीदेहाची रचना म्हणजे हाडांचा सांपळा असून त्यावर स्नायु, शिरा बांधून त्या देहाला मजबुती आणली आहे. २३० रक्त-मांस यांचा रांधा करून त्यानें तो सांपळा लिंपला आहे. हडावरील वेष्टन त्याला मज्जा असें म्हणतात. ३१ त्या हाडांच्या आंत जो मगज असतो, त्याला मेंदु म्हणतात आणि त्यावर जें पातळ आवरण असतें त्याला 'त्वचा' हें नांव आहे. ३२ त्या देहामध्यें विष्ठामूत्राची पूर्णपणें सांठवण केलेली आहे. अशा त्या स्त्रीदेहाशीं जे पुरुष रममाण होतात, ते मनुष्यरूपी किडेच होत. ३३ किडे जसे विष्ठेमध्यें लोळत असतात, तशी स्त्रीदेहावर ज्यांची आसक्ति असते तेहि कृमिरूपच होत, त्यांत मुळींच संशय नाहीं. ३४ याप्रमाणें विचार करून पाहिलें असतां, स्त्रीदेह अतिशय अमंगल आहे. त्या देहाला वस्त्रालंकारानें सुशोभित करून पुरुष त्यावर आसक्त होतात. ३५ पारधी घंटानाद करून पाश पसरितो आणि त्या नादानें लुब्ध झालेल्या हरिणांना पकडतो; ३६ परंतु पुरुष स्त्रीला भूषणांनीं सजवितो व त्या पाशांत आपण स्वतःच अडकून पडतो. यास्तव विरक्त पुरुषानें स्त्रियांची संगति केव्हांहि धरूं नये. गृहस्थानें स्त्रीवरील आसक्ति सोडून द्यावी. याविषयींच राजा आतां सांगत आहे. २३७.

अथापि अर्थवित् स्त्रीषु स्त्रैणेषु च न उपसज्जेत—स्त्रियांचीं शरीरें अशीं जरी किळसवाणी आहेत, तरी विवेकी पुरुषानें आसक्त होऊन अवलोकन करणें इत्यादि प्रकारेंहि स्त्रिया व स्त्रैण यांच्याशीं संग करूं नये कारण, **विषयेन्द्रियसंयोगात् मनः क्षुभ्यति अन्यथा न**—विषय व इंद्रियें यांच्या संयोगामुळें मन क्षुब्ध होतें, त्यावांचून होत नाहीं. २२

स्त्रीदेह शोभनीय असता । तरी वस्त्रेंवीण शोभता । तो अतिनिंद्य कुश्चितता । उघड सर्वथा शोभेना ॥ ३८ ॥ यालागीं वस्त्राभरणीं । देह गुंडिती कामिनी । जेवीं मैंद ब्राह्मणपणीं । विश्वासूनी घातक ॥ ३९ ॥ तैसी स्त्रियांची संगती । सेवा लावी नाना युक्तीं । शेखीं संगें पाडी अधःपातीं । तेथ विरक्तीं नवजावें ॥ २४० ॥ जरी स्त्रियेची विरक्तस्थिती । तरी साधकीं न करावी संगती । अग्निसंगें घृतें द्रवती । तेवीं विकारे वृत्ति स्त्रीसंगें ॥ ४१ ॥ अमृत म्हणोनि खातां विख । अवश्य मरण आणी देख । स्त्री मानूनि सात्विक । सेवितां दुःख भोगवी ॥ ४२ ॥ अग्निमाजीं घृताची वस्ती । जरी बहुकाळ निर्वाहती । तरी स्त्रीसंगें परमार्थी । निजात्मस्थिती पावते ॥ ४३ ॥ घृत बेंचल्या वर्षे झाली साठी । तरी अग्निसंगें द्रव उपजे घटीं । तेवी प्रमदासंगपरिपाठीं । वार्धकींही उठी अतिकामू ॥ ४४ ॥ जरी कापूर अग्नीआंत । नादों लाहतां न पोळत । तरी स्त्रीसंगे परमार्थ । पावते समस्त परब्रह्म ॥ ४५ ॥ अग्निपोळा धरितां हाती । तैसी स्त्रियांची संगती । संगें वाढवी आसक्ती । पाडी अनर्थी पुरुषांते ॥ ४६ ॥ स्त्रियेपरी स्त्रैण । संगती मीनलिया जाण । कोटि अनर्थांचें भाजन । अधःपतन तत्संगें ॥ ४७ ॥ तैसी स्त्रैणेंसीं झाल्या भेटी । ब्रह्मानंद स्त्रीसुखाच्या पोटीं । ऐशा विरक्तां प्रबोधी गोठी । करी उठाउठी स्त्रीकाम ॥ ४८ ॥ तेंथ स्वदारा आणि परदारा । या करूं नेदी विचारा । प्रवर्तवी स्वेच्छाचारा । स्त्रैण खरा अतिघाती ॥ ४९ ॥ स्त्रैण जेथें प्रवेशला । तेथ अनाचार वेलिंगला । अधर्म सर्वांगीं फुलला । बाधकत्वें फळला अनर्थ फळीं ॥ २५० ॥ यालागीं जो परमार्थी । तेणें स्त्रैणचि संगती । सर्वथा न धरावी हातीं । पाडी अनर्थी तो संग ॥ ५१ ॥ मुख्य स्त्रैणचि वाळिला आहे । तेथें स्त्रीसंग कोठें राहे । हे संगतीचि पाहें । सेव्य नोहे परमार्थी ॥ ५२ ॥ यालागीं साधकीं आपण । स्त्रीनिरीक्षण संभाषण । सर्वथा न करावें जाण । एकांतशील न

स्त्रीदेह खरोखरच जर सुंदर असता तर तो वस्त्रांवांचूनहि शोभला असता; परंतु तो अतिशय अमंगल असल्यामुळें उघडा ठेवितां येत नाहीं. ३८ म्हणून स्त्रिया वस्त्रालंकारांनीं आपलें शरीर झांकीत असतात. एखादा ठक जसा सात्त्विक ब्राह्मणाचा वेष घेऊन विश्वास दाखवून अखेर फसवितो, ३९ तशी ही स्त्रीसंगति आहे. ती नाना युक्तींनीं पुरुषाला आपल्या नादीं लाविते व शेवटीं आसक्तीनें त्याचा अधःपात करिते. यास्तव विरक्त पुरुषानें तिच्या वाटेलाहि जाऊं नये. २४० स्त्रीसंगाविषयीं मनांत जरी विरक्ति असली तरीहि साधकानें केव्हांहि स्त्रियांच्या संगतींत राहूं नये. गोठलेलें तूप अग्नीजवळ ठेविलें असतां तें जसें तत्काल विरघळतें, तसा स्त्रीसंगानें पुरुषाच्या वृत्तींत विकार उत्पन्न होतो. ४१ विषाला 'अमृत' म्हणून जरी खाल्लें तरी त्यापासून मरण अवश्य येणारच. त्याप्रमाणें स्त्रीला सात्त्विक समजून जरी तिची आसक्ति धरिली तरी अतिशय दुःख भोगावें लागतें ४२ अग्नीमध्यें तूप जर पुष्कळ वेळ टिकून राहील तर स्त्रीसंगापासून परमार्थाची व आत्मस्वरूपाची प्राप्ति होईल. ४३ साठ वर्षे गोठवून ठेवलेलें जरी तूप असलें तरी अग्नीच्या सान्निध्यांत तें एका क्षणांत वितळूं लागतें, त्याप्रमाणें स्त्रीसंगतीनें साठ वर्षांच्या म्हाताऱ्याच्या मनांतहि कामविकार उद्भवतो. ४४ अग्नीमध्यें कापूर जर न जळतां, न पोळतां राहूं शकेल तर स्त्रीसंगानें सर्वांना परमार्थ लाभेल व परब्रह्माची प्राप्ति होईल. ४५ जळजळीत निखारा जसा हातांत धरावा तशी स्त्रियांची संगति आहे. त्यांच्या संगतीनेंच आसक्ति वाढते आणि ती पुरुषाला अनर्थांत टाकिते. ४६ स्त्रीपेक्षां स्त्रैणपुरुषाची संगति तर कोट्यावधि अनर्थांचें मूळ आहे. त्याच्या संगतीनें अधःपातच होतो. ४७ स्त्रैण पुरुष भेटला कीं तो विरक्ताला 'स्त्रीसंगांतच सगळा ब्रह्मानंद भरलेला आहे.' अशा गोष्टी सांगून त्याच्या मनांत स्त्रीसुखाची इच्छा उत्पन्न करितो. ४८ व ही स्वस्त्री आहे कीं, परस्त्री आहे. याचा विचारहि त्याला करूं देत नाहीं. तो त्याला मनसोक्त वागावयास लावितो. असा स्त्रैणपुरुष महापातकी आहे. ४९ जेथें स्त्रैण पुरुषाचा प्रवेश झाला तेथें अनाचार वाढलाच, अधर्म सर्व बाजूंनी पसरला व अनर्थरूपी फलांनी बांधलाच म्हणून समजावें. २५० यास्तव परमार्थाची इच्छा करणाऱ्या पुरुषानें स्त्रैणाची संगति कदापि धरूं नये. कारण त्याची मैत्री अनर्थांत टाकिते, ५१ मुख्य स्त्रैणाचीच संगति सोडिली तर मग स्त्रीसंग कोठून येणार ! ती संगतीच मुळीं परमार्थाच्या उपयोगी नाहीं, ५२ यास्तव साधकानें

कधीं व्हावें ॥ ५३ ॥ म्हणसी विवेकी जो आहे। त्यासी संग करी काये । स्त्रीसंगास्तव अपाये । सोशिले पाहें सुज्ञांनीं ॥ ५४ ॥ पराशरासी अर्ध घडी । नावेसी मीनली नावाडी । ते अर्धघटिकेसाठीं रोकडी । अंगीं परवडी वाजली ॥ ५५ ॥ ऋष्यशृंग अतितापसी । तोही वश झाला वेश्येसी । इतरांची गोठी कायसी । मुख्य महादेवासी भुलविलें ॥ ५६ ॥ विषयइंद्रियांचे संगतीं । अवश्य क्षोभे चित्तवृत्ती । तेथ सज्ञानही बाधिजती । मा कोण गती अज्ञाना ॥ ५७ ॥ हेही असो उपपत्ती । न साहे स्त्रियांची संगती । कामक्षोम एकांतीं । तेंचि विशदार्थीं नृप बोले ॥ ५८ ॥

अदृष्टादश्रुताद्भावान्न भाव उपजायते । असंप्रयुञ्जतः प्राणान् शाम्यति स्तिमितं मनः ॥ २३ ॥

जें देखिलें ऐकिलें नाहीं । ऐशिया विषयांचे ठायीं । पुरुषाचें मन पाहीं । सर्वथा कंहीं क्षोभेना ॥ ५९ ॥ जे पूर्वभुक्त विषय असती । तेचि स्मरण झालिया चित्तीं । कामउद्रेकें क्षोभे वृत्ती । नसतां संगती स्त्रियेची ॥ २६० ॥ एवं पूर्वापर विषयासक्ती । पुरुषासी बाधक निश्चितीं । तो बैसल्याही एकांतीं वासनासंस्कारें वृत्ति सकामें क्षोभे ॥ ६१ ॥ पूर्वदिवशींचीं पक्वान्नें । जीं ठेविलीं अतियत्नें । तीं न करितांही रांधणें । पहांटे भक्षणें स्वयें जेवीं ॥ ६२ ॥ तेवीं वासनासंस्थित काम । पुरुषास करी सकाम । काम क्षोभे पाडी भ्रम । कर्माकर्म स्मरेना ॥ ६३ ॥ एवं वासना कामसंगती । बाधक होय परमार्थी । यालागीं साधकीं समस्तीं । स्त्रीकामासक्ती त्यागावी ॥ ६४ ॥ मनीं क्षोभल्या कामासक्ती । साधकीं

स्त्रियांकडे पहाणें, त्यांच्याशीं संभाषण करणें व स्त्रीबरोबर एकान्तांत बसणें, सर्वथा वर्ज्य करावें. ५३ यावर तूं कदाचित् म्हणशील कीं, विवेकी माणसाला संग काय करणार ! तर केवल स्त्रीसंगामुळें श्रेष्ठ ज्ञानीहि अनर्थांत पडले आहेत ५४ बरें ! पराशर ऋषीला अर्धाक्षणच कोळ्याची कन्या सत्यवती भेटली, पण त्या अर्धाक्षणांतच तो आपल्या जितेंद्रियत्वापासून ढळला व भ्रष्ट झाला (पराशर व सत्यवति यांच्यापासून श्रीव्यासाची उत्पत्ति प्रसिद्धच आहे.) ५५ ऋष्यशृंग एवढा थोरला तपस्वी असून तोहि वेश्येला वश झाला. प्रत्यक्ष शंकरालाहि जर मोहिनीनें भुलविलें तर मग इतरांची काय कथा ! ५६ विषय व इंद्रियें यांचा संयोग होतांच चित्तवृत्तीचा अवश्य क्षोभ होतो व ज्ञानीहि त्या मोहांत सांपडतात. मग अज्ञाचा त्यांपुढें काय टिकाव लागणार ! ५७ ही युक्ति राहो. एकंदरीत स्त्रियांची संगति योग्य नव्हे. एकान्त सापडतांच कामक्षोभ होतो, हेंच आतां राजा स्पष्ट करून सांगत आहे. २५८.

—' अहोपण, एखादेवेळीं ज्यानें नेत्र मिटले आहेत, त्याच्याहि मनाचा क्षोभ झालेला दिसतो, ' अशी आशंका घेऊन ' पण तो पूर्वदर्शनादिकांवांचून होत नाहीं ' असें सांगतात—

अदृष्टात् अश्रुतात् भावात् भावः न उपजायते—पूर्वीं कधी न पाहिलेल्या व ऐकलेल्या पदार्थामुळें मनाचा क्षोभ कधींहि होत नाहीं. प्राणान् असंप्रयुञ्जतः मनः स्तिमितं सत् शाम्यति—इंद्रियांचें नियमन करणाऱ्या पुरुषाचें मन निश्चल होत्सातें शांत होतें. २३.

जे विषय कधीं पाहिले नाहींत, किंवा ऐकिले नाहींत त्यांनीं पुरुषाच्या मनाला कधींहि क्षोभ होत नाहीं. ५९ जे विषय पूर्वजन्मीं भोगिलेले असतात त्यांचें स्मरण होतांच स्त्रीसहवास नसला तरी मनोवृत्ति क्षुब्ध होतात. २६० याप्रमाणें पुरुषाला पूर्वसंस्कार बाधक होतात. तो अगदीं एकान्तात एकटा जरी बसलेला असला तरीहि वासनेच्या योगानें कामविकार उत्पन्न होऊन वृत्ति क्षुब्ध होते. ६१ आदल्या दिवशींचें मिष्टान्न झांकून ठेविलेलें असलें म्हणजे दुसऱ्या दिवशीं स्वयंपाक न करितांच पहाटेच उठून ते पदार्थ जसे खातां येतात, ६२ त्याचप्रमाणें वासनेंत राहिलेली कामेच्छा पुरुषाला कामासक्त करिते आणि कामविकार क्षुब्ध झाला असतां मनाला भ्रम उत्पन्न होतो. त्यामुळें कर्म-अकर्म कांहीं कळेनासें होत. ६३ याप्रमाणें वासना आणि कामासक्ति ही दोन्ही परमार्थाला बाधक होतात. म्हणून सर्व साधकांनीं स्त्रीसंगाची आसक्ति टाकावी. ६४ मनांत कामविकार उद्भवला असतां पुरुषानें अशी युक्ति करावी कीं, बाह्य इंद्रियवृत्तींना आवरून धरावें. (स्त्रीचा शब्द, स्पर्श, रूप यांपासून दूर रहावें) म्हणजे मन हळूहळू शान्त

तेथें करावी युक्ती । आवराव्या बाह्य इंद्रियवृत्ती । तैं मनासी शांति हळहळू होय ॥ ६५ ॥ कर्मेंद्रियीं राखण । दृढ वैराग्य ठेविलिया जाण । मनीं क्षोभल्या काम पूर्ण । आपल्या आपण उपशमे ॥ ६६ ॥ जेणें पडिजे अनर्थीं । ते त्यागावी संगती । संगत्यागाची निजस्थिती । दृढ श्लोकार्थीं नृप बोले ॥ ६७ ॥

तस्मात्सङ्गो न कर्तव्यः स्त्रीषु स्त्रैणेषु चेन्द्रियैः । विदुषां चाप्यविश्रब्धः षड्वर्गः किमु मादृशाम् ॥ २४ ॥

जेथ सज्ञाना उठी छळ । सकाम भुलवी तत्काळ । ऐसा स्त्रीसंग अनर्थसीळ । त्याहूनि प्रबळ स्त्रैणाचा ॥ ६८ ॥ यालागीं कर्मेंद्रियांचे स्थितीं । स्त्री आणि स्त्रैणाची संगती । घडो नेदावी परमार्थीं । जे निजस्वार्थीं साधक ॥ ६९ ॥ जरी विषयीं क्षोभेल मन । तरी इंद्रियें आवरावीं आपण । तरी मनींचा विषयो जाण । मनींचि आपण स्वयें विरे ॥ २७० ॥ निकट विषय स्त्रीसंगती । मन क्षोभे विषयासक्ती । क्षणार्ध स्त्रीसंगप्राप्ती । पडले अनर्थी सज्ञान ॥ ७१ ॥ स्त्रीदर्शनें कामासक्त । देवेंद्र झाला भगांकित । चंद्र कळंकिया एथ । केला निश्चित गुरुपत्न्या ॥ ७२ ॥ सौभरी तपस्वी तपयुक्त । तो मत्स्यमैथुनास्तव एथ । करूनि सांडिला कामासक्त । संग अनर्थभूत स्त्रियांचा ॥ ७३ ॥ निजकन्येचिया संगतीं । ब्रह्मा भुलला कामासक्ती । इतरांची कोण गती । संग अनर्थी स्त्रियांचा ॥ ७४ ॥ कामिनीसंग अतिदारुण । शिवाशी झालें लिंगपतन । प्रमदासंगें सज्ञान । ठकले जाण महायोगी ॥ ७५ ॥ नारदें विनोददृष्टीं । कृष्णपत्नी मागीतल्यासाठीं । तो नारदी केला गंगातटीं । तेथ जन्मले पोटीं साठी पुत्र ॥ ७६ ॥ कौतुकें स्त्रियांप्रति जातां । सज्ञान पावे बाधकता । मा मजसारिख्या मूर्खाची कथा । कोण वार्ता ते ठायीं ॥ ७७ ॥

होतें. ६५ कर्मेंद्रियांवर दृढ वैराग्याचा पहारा ठेविला असतां मनामध्यें उद्भवलेला कामविकार आपणच शांत होतो. ६६ ज्यायोगें अनर्थांत पडण्याचा संभव असतो, अशी संगति सोडावी. त्या संगतीचा त्याग कसा करावा हेंच पुढील श्लोकांत राजा स्पष्टपणें सांगत आहे. २६७.

तस्मात् स्त्रीषु स्त्रैणेषु च इंद्रियैः सङ्गः न कर्तव्यः—यास्तव स्त्रिया व स्त्रैण पुरुष यांच्या ठिकाणीं इंद्रियांनीं आसक्त होऊं नये. **षड्वर्गः विदुषां अपि अविश्रब्धः**—कामादि रिपुषड्वर्ग विद्वानांच्याहि विश्वासास पात्र नाहीं. **किमु मादृशाम्**—मग माझ्यासारख्याची काय कथा ! २४.

ज्यामुळें ज्ञानी योग्यांचाहि छळ होतो, कामासक्त पुरुषाला तत्काळ भुरळ पडते, तो स्त्रीसंग जरी अनर्थकारक आहे, तरी त्याहून स्त्रैणाची संगति अधिक संकटांत टाकणारी आहे. ६८ म्हणून आपलें हित करूं इच्छिणाऱ्या परमार्थीं साधकानें आपल्या कर्मेंद्रियांची स्त्री आणि स्त्रैण यांच्याशीं भेटहि होऊं देऊं नये. ६९ मनांत जरी विषयेच्छा उद्भवली, तरी आपण इंद्रियांना आवरलें असतां मनांतील विषय मनांतच लीन होतात. २७० विषयेच्छा व स्त्रीसंगति हीं दोन्हीं समीप असलीं कीं, मन तत्काल त्यांच्याविषयीं आसक्त होतें. अर्धाक्षण जरी स्त्रीसंग घडला तरी ज्ञानीहि मोठ्या संकटांत पडतात. ७१ इंद्राला स्त्रीचें नुसतें दर्शन घडतांच त्याचें शरीर हजार छिद्रांनीं युक्त झालें. (गौतम ऋषि माध्यान्ह संध्येसाठीं नदीतीरावर गेला असतां त्याची पत्नी अहल्या आश्रमांत एकटीच असलेली पाहून इंद्रानें ऋषीच्या रूपानें येऊन तिला भ्रष्ट केलें. या त्याच्या अपराधाबद्दल गौतमानें त्याला शाप देऊन त्याचें शरीर सहस्र-भगयुक्त केलें अशी कथा आहे.) गुरुपत्नी जी तारा, तिचा अभिलाष केल्यामुळें चंद्र कायमचा कलंकित होऊन बसला. ७२ सौभरी ऋषि एवढा महान् तपस्वी, पण तोहि मत्स्य नर-मादींचा संयोग पाहून कामातुर झाला. (ही कथा नवव्या स्कंधाच्या सहाव्या अध्यायांत आहे.) असा स्त्रीसंग अत्यंत अनर्थावह आहे. ७३ ब्रह्मदेव तर स्वतः-च्याच कन्येला भुलला, तेव्हां आतां इतरांच्या गोष्टी काय सांगाव्या ! असा हा स्त्रीसंग अनर्थकारक आहे. ७४ स्त्रीसंग अत्यंत दारुण आहे. त्यामुळें शंकरहि आपल्या जितेंद्रियत्वापासून ढळला. असे महान् तपस्वी देखील स्त्रीसंगतीनें फसले आहेत. ७५ नारदानें थट्टेनें श्रीकृष्णाची पत्नी मागितली असतां त्याला गंगातीरीं नारदीचें रूप प्राप्त होऊन त्याच्या पोटीं साठ पुत्र झाले. ७६ सहज लीलेनें जरी स्त्रियांपाशीं गेले, तरी ज्ञानी माणसालाहि ती संगति बाधते.

क्षणार्धं स्त्रियांची संगती । सज्ञान ठकले ऐशा रीतीं । जे स्त्रीसंगा विश्वासती । ते दुःखी होती मजऐसे ॥ ७८ ॥ यालागीं विश्वासतां स्त्रीसंगासी । इंद्रियषड्वर्ग ठकी सर्वांसी । एथ आवरूनि इंद्रियांसी । सर्वथा स्त्रियांसी त्यागावें ॥ ७९ ॥ त्यागूनि स्त्रियांची संगती । उपरमूनि इंद्रियवृत्ती । राजा पावला परम शांती । तेंचि श्रीपति स्वयें सांगे ॥ २८० ॥

श्रीभगवानुवाच–एवं प्रगायन्नरदेवदेवः स उर्वशीलोकमथो विहाय ।
आत्मानमात्मन्यवगम्य मां वै उपारमज्ज्ञानविधूतमोहः ॥ २५ ॥

जो उर्वशीस्वर्गभोग पावोनी । ज्यासी देव मानिती श्रेष्ठपणीं । जो सकळराजचूडामणी । ज्यासी येती लोटांगणीं भूपाळ ॥ ८१ ॥ ऐसा पुरूरवा चक्रवर्ती । लाहोनि उर्वशीभोगप्राप्ती । स्वर्गभोगीं पावला विरक्ती । सभाग्य नृपति तो एक ॥ ८२ ॥ अप्राप्तविषयें योगी । बहुत देखिले विरागी । परी प्राप्तस्वर्गांगनाभोगीं । धन्य विरागी पुरूरवा ॥ ८३ ॥ पुरूरव्याऐशी विरक्ती । नाहीं देखिली आणिकाप्रती । धन्य पुरूरवा त्रिजगतीं । स्वमुखें श्रीपति वाखाणी ॥ ८४ ॥ तेणें अनुतापाच्या अनुवृत्तीं । निंदोनियां निजात्मस्थिती । क्षाळिली कामिनीकामासक्ती । धुतला निश्चितीं महामोहो ॥ ८५ ॥ अनुतापआगिठीं अभंग । वैराग्यपुटें देऊनि चांग । विवेकें दमितां सांग । काममोहाचे डाग क्षाळिले तेणें ॥ ८६ ॥ जेवीं सोनें पुटीं पडे । तुक तुटे वानी चढे । तेवीं निजात्मप्राप्तीनिवाडें । वृत्ति वाडेंकोडें क्षाळिली ॥ ८७ ॥ ऐशिये अतिशुद्ध निजवृत्तीं । विवेकवैराग्यसंपत्ती । पूर्ण अनुतापाचे स्थितीं । माझी कृपाप्राप्ती पावला ॥८८॥ माझिया

मग माझ्यासारख्या मूर्खांची काय कथा ! ७७ एक अर्धाक्षण स्त्रीसंग घडतांच अनेक ज्ञानी अशा प्रकारें फसले आहेत. तेव्हां जे कोणी स्त्रीसंगावर विश्वास ठेवितात ते माझ्यासारखे दुःखांत पडतात. ७८ यास्तव स्त्रीसंगावर विश्वास ठेवल्यानें सहा इंद्रियांचा समूह सर्वांना संकटांत टाकितो. म्हणून इंद्रियनिग्रह करून स्त्रियांचा सर्वथा त्याग करावा. ७९ अशा प्रकारें स्त्रियांची संगति सोडून इंद्रियवृत्तींना शांत करून राजा परम समाधान पावला. तेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. २८०

—पुढील दोन श्लोकांनीं भगवान या ऐलगीताचें फलित सांगतात—

श्रीभ० उ०–भगवान म्हणाले–एवं प्रगायन् सः नरदेवदेवः उर्वशीलोकं विहाय–याप्रमाणें वैराग्यानें आपल्या प्रमादाचें वर्णन करणारा व मनुष्यें व देव यांमध्यें प्रकाश पावणारा ऐल उर्वशीलोक सोडून अथो आत्मानं मां आत्मनि अवगम्य ज्ञानविधूतमोहः उपारमत वै–व आत्मा जो मी त्याला आपल्याच शरीरांत साक्षात् जाणून ज्ञानानें ज्याचा मोह निवृत्त झाला आहे, असा होत्साता स्वरूपांतच लीन झाला. २५.

ज्यानें उर्वशीबरोबर सगळें स्वर्गसुख भोगिलें, त्याला देवांनीं श्रेष्ठ मानिलें, जो सगळ्या राजांचा मुकुटमणि, ज्याला सगळे राजे लोटांगण घालीत होते. ८१ असा तो सार्वभौम पुरूरवाराजा उर्वशीच्या सहवासांत स्वर्गसुख भोगून विरक्त झाला. म्हणून तो राजा मोठा भाग्यवान् होय. ८२ ज्यांना विषयांचे दर्शनच झालें नाहीं असे पुष्कळ योगी अतिशय विरक्त असलेले दिसतात, परंतु उर्वशीसारख्या स्वर्गांतील अप्सरेशी विलास भोगूनहि पुरूरवा राजा विरक्त झाला. यास्तव तो खरोखर धन्य होय. ८३ पुरूरव्यासारखी दुसऱ्या कोणाचीहि विरक्ति मी पाहिली नाहीं. पुरूरवा त्रिभुवनांत धन्य होय. अशी स्वतः श्रीकृष्णानें त्याची स्तुति केली. ८४ त्यानें पश्चात्तापाच्या आवेशांत आपली स्वतःची निंदा करून स्त्रीसंगाची आसक्ति फेंकून दिली व महामोहाला धुवून टाकिलें. ८५ पश्चात्तापरूपी अखंड अग्नीमध्यें वैराग्याचीं चांगलीं पुटें देऊन व विचारानें दमन करून काम-मोहांचे डाग घालविलें. ८६ सोनें तावून घेतलें म्हणजे त्याचें वजन कमी होऊन तेज वाढतें, त्याप्रमाणें त्यानें आत्मानुभवाच्या लाभानें वृत्तींना धुवून स्वच्छ केलें. ८७ याप्रमाणें वृत्ति अत्यंत शुद्ध व विवेक-वैराग्ययुक्त झाल्यामुळें तो राजा माझ्या कृपेला प्राप्त झाला. ८८ कारण माझ्या कृपेवांचून कधींहि पश्चाताप उत्पन्न होणार नाहीं. ८९ ज्याच्या मनाला खरा पश्चाताप

कृपेवीण कांहीं । कदा अनुताप नुपजे देहीं । शुद्ध अनुताप ज्याच्या ठायीं । ते माझी कृपा पाहीं परिपूर्ण ॥ ८९ ॥ माझी कृपा झालिया जाण । जीव होय ब्रह्मपूर्ण । निःशेष गळे देहाभिमान । मीतूंपण भासेना ॥ २९० ॥ तेथ कार्य कर्म आणि कर्ता । भोग्य भोग आणि भोक्ता । दृश्य दर्शन द्रष्टृता । त्रिपुटी सर्वथा असेना ॥ ९१ ॥ त्रिगुणत्रिपुटीचें कारण । मूळभूत निजअज्ञान । तें सद्गुरुकृपेस्तव जाण । गेले हरपोन मिथ्यात्वें ॥ ९२ ॥ जेवीं दोराचे सापपण । निर्धारितां हारपे पूर्ण । तेवीं गुणेंसीं अविद्या जाण । जाय हारपोन गुरुबोधें ॥ ९३ ॥ सद्गुरुबोधें पाहतां जाण । दिसेना द्वैताचे भान । तेथ उर्वशी भोगी कोण । राजा स्वानंदे पूर्ण निवाला ॥ ९४ ॥ राजा निवाला ब्रह्मरसीं । मग सांडूनियां उर्वशी । त्यजोनियां स्वर्गलोकासी । निजबोधेंसी निघाला ॥ ९५ ॥ इतर ज्ञाते स्त्रिया त्यागिती । परी त्यागेना कामासक्ती । तैशी नव्हे रायाची स्थिती । परमार्थविरक्ती पावला ॥ ९६ ॥ ते परम विरक्तीचे पोटीं । कामिनीकामवार्ता तुटी । ब्रह्मानंदें कोंदली सृष्टी । स्वानंदपुष्टीं निवाला ॥ ९७ ॥ ऐसा सुखरूपें सहज । मी होऊनि पावला मज । जिणोनि कल्पनाकामकाज । नाचत भोज स्वानंदें ॥ ९८ ॥ ऐसा निश्चयेंसीं निश्चित । माझें निज स्वरूप झाला प्राप्त । तेणें हा इतिहास एथ । निजसुखार्थ गायिला ॥ ९९ ॥ अनुतापआवडी इतिहास । गाता प्रकटे पूर्ण परेश । तेथ सहजे अविद्येचा नाश । निजसुखें क्षितीश निवाला ॥ ३०० ॥ एवढी पावावया निजप्राप्ती । त्यागावी कामिनिकामासक्ती । मुख्यत्वें धरावी सत्संगती । हेंचि उद्धवाप्रती हरि सांगे ॥ १ ॥

ततो दुःसङ्गमुत्सृज्य सत्सु सज्जेत बुद्धिमान् । सन्त एतस्य छिन्दन्ति मनोव्यासङ्गमुक्तिभिः ॥ २६ ॥

होतो त्यावर माझी कृपा झाली असतां जीव पूर्णपणें ब्रह्ममय होतो. देहाभिमान समूळ नाहींसा होतो व 'मी-तूं-'पणा मुळींच भासत नाहीं. २९० त्या वेळीं कार्य-कर्म-कर्ता; भोग्य-भोग-भोक्ता, दृश्य-दर्शन-द्रष्टा ही त्रिपुटी उरतच नाहीं. ९१ त्रिगुणांच्या या त्रिपुटीचें मुख्य कारण अज्ञान आहे. तें मिथ्या असल्यामुळें सद्गुरूची कृपा होतांच तत्काल नाश पावतें. ९२ दोरावरील सर्पाचा आरोप 'हा दोर आहे' असें जाणतांच जसा तत्काल नाहींसा होतो, त्याप्रमाणें गुरूच्या उपदेशानें तीन गुणांसह अविद्येचें निरसन होतें. ९३ सद्गुरूच्या उपदेशानें द्वैताचेंच भान नाहींसें झालें; म्हणजे मग उर्वशीला भोगणारा तरी कोण उरतो ! याप्रमाणें तो राजा आत्मानंदामध्यें शांत झाला. ९४ राजा ब्रह्मानंदांत तल्लीन होऊन उर्वशीला सोडून आत्मस्वरूपाच्या ज्ञानासह स्वर्गलोकांतून निघाला. ९५ इतर ज्ञानी स्त्रियांचा त्याग करितात; परंतु त्यांची कामासक्ति सुटत नाहीं, तशी या राजाची स्थिति नव्हती. त्याला खरी विरक्ति आली होती. ९६ त्या तीव्र विरक्तीपुढें स्त्रीसंगाचें नांवहि निघेनासें झालें. त्याच्या दृष्टीला हें सर्व विश्व ब्रह्मानंदानें भरलेलें दिसूं लागलें व तो स्वानंदाच्या भरांत तृप्त झाला. ९७ अशा रीतीनें तो आत्मस्वरूपीं लीन होऊन मत्स्वरूपानेंच मला प्राप्त झाला. काल्पनिक कामाच्या कार्याला जिंकून तो स्वानंदाचा पुतळा नाचूं लागला. ९८ तो दृढ निश्चयानें मद्रूप झाला व त्यानें हें स्वतःचें चरित्र येथें आपल्याच सुखासाठीं गाइलें. ९९ पश्चात्तापानें हा इतिहास गाईल्यामुळें तेथें पूर्ण परमेश्वर प्रकट झाला व अविद्येचा सहजच नाश झाल्यामुळें राजा तृप्त झाला. ३०० अशी उत्कट आत्मप्राप्ति होण्यासाठीं अगोदर स्त्रीसंगाची आसक्ति टाकावी आणि मुख्यत्वेंकरून सत्संगति धरावी. हेंच आतां श्रीहरि उद्धवाला सांगत आहे. ३०१.

तत् बुद्धिमान् दुःसङ्गं उत्सृज्य सत्सु सज्जेत—म्हणून बुद्धिमानानें दुःसंग टाकून सत्संगतींत आसक्त व्हावें. **सन्तः उक्तिभिः एतस्य मनोव्यासङ्गं छिन्दन्ति**—संत आपल्या हितोपदेशांनीं याच्या मनःसंगाचा छेद करितात. [याच्या मनाची विषयासक्ति निवृत्त करितात. यास्तव तीर्थ, देव इत्यादिकांच्या संगाहूनहि सत्संग श्रेयस्कर आहे.] २६.

अवश्य त्यागावी दुःसंगता । तो दुःसंग कोण म्हणशी आतां । तरी स्त्री आणि स्त्रैणाबरता । दुःसंग सर्वथा असेना ॥ २ ॥ जो मानीना वेदशास्त्रार्था । जो अविश्वासी परमार्था । ज्यामाजी अतिविकल्पता । तोही तत्त्वतां दुःसंग ॥ ३ ॥ जो बोल बोले अतिविरक्त । हृदयीं अधर्मकामरत । कामरोधें द्वेषा येत । तोही निश्चित दुःसंग ॥ ४ ॥ कां स्वधर्मकर्मविनीतता । बाह्य दावी सात्त्विकता । हृदयीं दोषदर्शी संतां । हे दुःसंगता अतिदुष्ट ॥ ५ ॥ जो मुखें न बोले आपण । परी देखे साधूंचे दोषगुण । तेंचि सबाह्य दावी उपलक्षण । तो अतिकठिण दुःसंग ॥ ६ ॥ मुख्य आपली जे सकामता । तेचि दुःसंग सर्वथा । तो काम समूळ त्यागितां । दुःसंगता त्यागिली ॥ ७ ॥ कामकल्पनेचा जो मारू । तोचि दुःसंग दुर्धरू । ते कामकल्पना त्यागी जो नरू । त्यागी संसारू सुखरूप ॥ ८ ॥ कामकल्पना त्यागावया जाण । मुख्य सत्संगाचे कारण । संतांचें वंदितां श्रीचरण । कल्पनाकाम जाण उपमर्दे ॥ ९ ॥ संग सर्वथा बाधक । म्हणसी त्यजावा निःशेख । तरी सत्संग न धरितां देख । केवीं साधक सुटतील ॥ ३१० ॥ सत्संगेंवीण जें साधन । तेंचि साधकां दृढ बंधन । सत्संगेंविण त्याग जाण । तें संपूर्ण पाखंड ॥ ११ ॥ चित्तविषयांचा संबंध । गांठी बैसल्या सुबद्ध । त्यांचा करावया छेद । विवेकें विशद निजसाधु ॥ १२ ॥ संतांच्या सहज गोठी । त्याचि उपदेशांच्या कोटी । देहात्मता जीवगांठी । बोलासाठीं छेदिती ॥ १३ ॥ भावें धरिल्या सत्संगती । साधकां भवपाश निर्मुक्ती । यालागीं अवश्य बुद्धिमंतीं । करावी संगती संतांची ॥ १४ ॥ त्या संतलक्षणांची स्थिती । अतिसाक्षेपें श्रीपती । आदरें सांगे उद्धवाप्रती । यथानिगुती निजबोधें ॥ १५ ॥

दुःसंगति अवश्य सोडावी. ती दुःसंगति कोणती, असें जर विचारशील तर (सांगतों, ऐक–) स्त्री व स्त्रैण या दोघांहून नाश करणारी, दुसरी कोणतीहि दुःसंगति नाहीं. २ जो वेद-शास्त्रादि प्रमाण मानीत नाहीं, परमार्थावर विश्वास ठेवीत नाहीं, अत्यंत विकल्प करणारा असतो, त्याचीहि संगति निंद्यच होय. ३ जो विरक्तीच्या मोठ्या गप्पा मारितो; परंतु अंतःकरणांत अधर्माची व कामासक्तीची अत्यंत आवड असते, त्याच्या इच्छेला प्रतिबंध होताच मनांत द्वेष उद्भवतो. तोहि संगतीला अयोग्यच होय, ४ किंवा जो बाहेरून स्वधर्म, कर्म, विनय व सात्त्विकता दाखवितो, परंतु मनांतून संतांचे गुण-दोष पहात असतो त्या दुर्जनाची संगति अत्यंत हीन होय. ५ किंवा जो बाहेरून तोंडातून एक शब्दहि काढीत नाहीं, पण अंतःकरणांतून मात्र साधूंचे गुण-दोष पहातो. हेहि दुःसंगाचेंच लक्षण होय. ६ आपली विषयासक्तिच मुख्य दुःसंग आहे. यास्तव आधीं त्या विषयाचांच निःशेष त्याग केला कीं, दुःसंगता सहजच टाकिली जाते. ७ काम-कल्पनेचा मारा हाच खरा दुःसंग होय. ही कामकल्पना जो पुरुष टाकितो त्याचाच संसार ८ सुखमय होतो. कामकल्पनेचा त्याग करविणारा सत्संग मुख्य होय. संताच्या चरणांना वंदन केलें असतां कामकल्पनेचा सहजच नाश होतो. ९ आसक्ति सर्वथा बाधणारी आहे. तिचाच निःशेष त्याग करावा, असें जर म्हणशील तर सत्संगतिवांचून साधक मुक्त होतील कसे ! ३१० कारण सत्संगावांचून आचरिलेलें साधन साधकाला बद्ध करितें. सत्संगावांचून त्याग करणें हें निव्वळ पाखंड आहे. ११ चित्त आणि विषय यांची अत्यंत दृढ गांठ बसली आहे. ती विवेकानें सोडविण्यास केवळ एक संतच समर्थ आहेत. १२ संतांचें सहज बोलणें हेंच उपदेशाचे कोट्यवधि ढीग आहेत. देह व आत्मा यांचें दृढ बंधन ते एका शब्दासरसें तोडून टाकितात. १३ श्रद्धेनें सत्संगति धरिली असतां साधक तत्काल भवपाशांतून मुक्त होतो. यास्तव बुद्धिमानानें संतांची संगति अवश्य धरावी. १४ त्या संतसंगतीचें यथार्थ लक्षण श्रीकृष्ण अति संक्षेपानें व मोठ्या आदरानें उद्धवाला सांगत आहे. ३१५

सन्तोऽनपेक्षा मच्चित्ताः प्रशान्ताः समदर्शनाः । निर्ममा निरहङ्कारा निर्द्वन्द्वा निष्परिग्रहाः ॥ २७ ॥

साधूंचे अमित गुण । त्यांत मुख्यत्वें अष्टलक्षण । निवडूनि सांगे श्रीकृष्ण । ते कोण अवधारीं ॥ १६ ॥ प्राप्ताप्राप्तलाभावस्था । बाधूं न शके साधूंच्या चित्ता । चित्त रातलें भगवंता । निरपेक्षता या नांव ॥ १७ ॥ पैल विषयो मज व्हावा । ऐसा आठव नाठवे जीवा । हा साधूचा निरपेक्ष ठेवा । जाण उद्धवा गूण पहिला ॥ १८ ॥ चित्तें चिंतावें चैतन्य । याचि नांवें मच्चित्तपण । याचि नांवें निरपेक्ष पूर्ण । इतर चिंतन भवबंधू ॥ १९ ॥ निरपेक्ष व्हावया एथ । जागृतिस्वप्नसुषुप्तीआंत । चिन्मात्रीं जडलें चित्त । या नांव मच्चित्त गुण दुजा ॥ ३२० ॥ देह झालिया लक्ष्मीयुक्त । अथवा हो कां आपद्‌ग्रस्त । चित्त परमानंदें निश्चित । या नांव मच्चित्त उद्धवा ॥ २१ ॥ कामलोभादिदोषरहित । परमानंदीं जडलें चित्त । शांतिसुखवासें वसे तेथ । यालागीं प्रशांत बोलिजे त्यासी ॥ २२ ॥ जरी प्राणांत केला अपकार । तरी न म्हणे हा दुष्ट नर । अपकाऱ्या करी अतिउपकार । प्रशांतिप्रकार या नांव ॥ २३ ॥ जरी ठाकूनि सर्वस्व नेलें । तरी क्षोभेना दोषबळें । तें जाणे ब्रह्मार्पण झालें । येणें अंगा आलें प्रशांतत्त्व ॥ २४ ॥ ब्रह्मभावेंचि तत्त्वतां । विश्वासणें सर्व भूतां । कदा विकल्प नुपजे चित्ता । हे प्रशांतता गुण तिजा ॥ २५ ॥ ऐसा हा प्रशांततागुण । अंगीं बाणावया हेंचि कारण । जगीं देखे समदर्शन । ब्रह्म परिपूर्ण समसाम्यें ॥ २६ ॥ जग पाहतां दिसे विषम । विषमीं देखे सम ब्रह्म । तोचि समदर्शी परम । हा गुण निरुपम पैं चौथा ॥ २७ ॥ हे समदृष्टि यावया हाता । भावें भजोनि भग-

---

—संतांचें लक्षण सांगतात—

सन्तः अनपेक्षाः—संत निरपेक्ष असतात, **मच्चित्ताः** त्यांचें चित्त माझ्या ठिकाणींच असतें. **प्रशान्ताः**—ते अत्यंत शांत असतात. **समदर्शनाः**—त्यांची सर्वत्र समदृष्टि असते. **निर्ममाः**—त्यांचें ममत्व निवृत्त झालेलें असतें. **निरहङ्काराः**—त्यांच्या ठिकाणीं अहंकार नसतो. **निर्द्वंद्वाः**—शीत उष्णादि द्वंद्वें त्यांना व्याकुल करीत नाहींत **निष्परिग्रहाः**—तें सर्वपरिग्रहशून्य असतात. २७.

साधूंचे असंख्य गुण आहेत. त्यांतील मुख्य आठ गुण निवडून श्रीकृष्ण सांगत आहे. कोणते ! ते ऐक. १६ साधूंच्या मनाला लाभ किंवा हानि बाधत नाहीं. त्यांचें चित्त भगवंतामध्येंच रंगून गेलेलें असतें. यालाच निरपेक्षता म्हणतात. १७ पलीकडचा विषय मला प्राप्त व्हावा, असा विचारहि त्यांच्या मनांत कधीं येत नाहीं; असला निरपेक्ष ठेवा, हा साधूंचा पहिला गुण आहे. १८ मनानें आत्मस्वरूपाचें चिंतन करणें यालाच 'मच्चित्तता' म्हणतात. याच चिंतनानें पूर्ण निरपेक्षता प्राप्त होते. इतर सर्व पदार्थांचें चिंतन भवबंधांत टाकणारें आहे. १९ निरपेक्षता मनावर ठसण्यासाठीं जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन्ही अवस्थांमध्यें चित्त ब्रह्मस्वरूपाकडे लावावें. असें मच्चित होणें हा दुसरा गुण होय. ३२० देह संपत्तीनें युक्त होवो किंवा दारिद्र्यानें पीडलेला असो, ज्याचें चित्त परमानंदानें युक्त असतें तेच मच्चित्तपरायण होत, असें हे उद्धवा ! तूं निश्चित जाण. २१ काम-क्रोध-लोभादिकांनी रहित होऊन चित्त परमानंदांत शांतिसुखानें रहातें, म्हणून त्याला प्रशान्त बोलतात, २२ एखाद्यानें जीवावर बेतण्याइतका जरी अपराध केला, तरी त्याला दुष्ट पुरुष न म्हणतां त्या अपकार करणारांवर उलट उपकार करणें, हाच उत्कृष्ट शांतीचा प्रकार होय, २३ एखाद्यानें फसवून सर्वस्व लुबाडून नेलें, तरीहि त्या अपराधाबद्दल क्रोध न आणितां तें ब्रह्मार्पण झालें, असें समजणें, हेंच अंगी खरी शांति बाणल्याचें चिन्ह समजावें. २४ सर्व प्राणिमात्रावर ब्रह्मभावनेनें विश्वास ठेवणें व मनांत कदापि विकल्प उपजूं न देणें, हाच प्रशांतीचा तिसरा गुण आहे. २५ अशी ही प्रशांति अंगीं बाणण्यासाठीं सगळ्या जगांत परिपूर्ण ब्रह्म भरलेलें आहे, असें समजून सर्वांविषयीं समभाव ठेविला पाहिजे. २६ जगत् पाहूं गेलें असतां अत्यंत विचित्र आहे. अशा विषम जगामध्यें समब्रह्म पहाणाराच खरा समदर्शी होय. हा चवथा निरुपम गुण आहे. २७ अशी समदृष्टि प्राप्त होण्यासाठीं भक्तिभावानें भगवंताचें

वंता । निःशेष त्यजिली अहंममता । हेही कथा अवधारीं ॥ २८ ॥ धरितां देहाचा अभिमान । ते अहंता वाढवी मीपण । मीपणें ममता जाण । वाढे संपूर्ण देहसंबंध्यां ॥ २९ ॥ जे वाढली अहंममता । ते वर्तवी महादुःखवार्ता । तिची निवारावया निजव्यथा । सद्भावें माथा गुरुचरणीं ॥ ३३० ॥ गुरुकृपा झालिया पूर्ण । माझे देहींचें मीपण । तें उकलोनि दावितां जाण । जग संपूर्ण मी एक ॥ ३१ ॥ जें जें सान थोर दिसे दृष्टीं । तें तें अवघें मीचि सृष्टीं । माझ्या मीपणाची निजपुष्टी । घोंटीत उठी त्रैलोक्य ॥ ३२ ॥ ऐसा मीपणें मी परिपूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणतें कोण । निःशेष निमालें मी तूंपण । निरभिमान या नांव ॥ ३३ ॥ ऐसें माझें मीपण पाहतां । समूळ हारपली ममता । हें माझें म्हणावया पुरता । ठाव रिता नुरेचि ॥ ३४ ॥ माझ्या मीपणाबाहिरें । जैं ममतास्पद दुजें उरे । तैं तेथ पूर्ण ममता स्फुरे । तें म्यां चिन्मात्रें घोंटिलें ॥ ३५ ॥ तेथ मीपणें मी माझें । नुरेचि तूंपणेंसीं तुझें । ऐसे परब्रह्माचेनि निजें । झाले सहजें निर्मम ॥ ३६ ॥ निर्मम निरभिमान । तें हें उद्धवा गा संपूर्ण । पांचवें सहावें लक्षण । संतांचें जाण निजगुह्य ॥ ३७ ॥ ऐसे निर्मम निरहंकार । जे होऊनि ठेले साचार । त्यांसी द्वंद्वदुःखडोंगर । अणुमात्र न बाधी ॥ ३८ ॥ देह अदृष्टाच्या वाटा । लागतां सुखदुःखांच्या झटा । तो ब्रह्मसुखाचे चोहटा । देहाचा द्रष्टा होऊनि असे ॥ ३९ ॥ देहासी पदवी आली थोरी । तो श्लाघेना जीवाभितरीं । देह घोळसितां नरकद्वारीं । तो अणुभरी कुंथेना ॥ ३४० ॥ देह व्याघ्रमुखीं सांपडे । तेणें दुःखें तो न सांकडे । देह पालखीमाजीं चढे । तैं वाडेंकोडें श्लाघेना ॥ ४१ ॥ छाया विष्ठेवरी पडे । कां पालखीमाजीं चढे । तेणें पुरुषा सुखदुःख न जोडे । मुक्तासी तेणें पाडें देहभोग ॥ ४२ ॥ त्याचे दृष्टीखालीं एकाएक । दुःखपणा मुके दुःख । सुखपणा विसरे सुख । निर्द्वंद्व

भजन करून अहं-ममता निःशेष टाकिली पाहिजे. तोहि प्रकार सांगतों, ऐक—देहाभिमान धरिला असतां, तो ' मीपणा ' उत्पन्न करितो आणि त्या ' मीपणा ' पासून देहसंबंधी ममता वाढते व ती ममताच दुस्तर दुःखाच्या भोंवऱ्यांत टाकितो. त्या ममतेची व्यथा घालविण्यासाठीं गुरुचरणांवर सद्भावानें मस्तक ठेवावें. ३० गुरूची पूर्ण कृपा झाली असतां ते गुरु माझ्या देहांतील ' मीपणा ' उघड करून दाखवितात. मग जगांत मीच एक परिपूर्ण भरलेला दिसून येतों. ३१ जगांत जेवढी म्हणून लहान-मोठी वस्तु दिसते ती सर्व माझेच स्वरूप आहे. त्यामुळें माझें ' मीपण ' सगळ्या त्रिभुवनाला व्यापून राहिलें आहे. ३२ अशा मीपणानें मी पूर्णपणें भरलेला असतां ' मी ' असें म्हणावयास रहातें तरीं कोण ! त्यानंतर मी-तूंपण सगळेंच नाहींसें होतें. यालाच निरभिमान म्हणतात. ३३ असें माझें मीपण पाहिलें असतां ममता समूळ नाहींशी होते. ' हें माझें ' असें म्हणण्यासहि चित्तांत जागा उरत नाहीं, ३४ माझ्या मीपणाच्या बाहेर जर कांहीं ममतास्पद उरेल तर तेथें ममता उत्पन्न होईल ! पण मीं ज्ञानस्वरूपानें तें सर्व व्यापून टाकिलें आहे. ३५ तेव्हां ' मीपणानें मी माझें आणि तूंपणानें तुझें ' असें कांहीं रहातच नाहीं. अशा प्रकारें परब्रह्माशीं एकरूप झाल्यामुळें मन सहजच ' निर्मम ' होतें ३६ उद्धवा ! असें निर्मम व निरभिमान होणें हें पांचवें व सहावें लक्षण आहे, संतांचें तें निजगुह्य आहे ३७ जे असें निर्मम व निरहंकार होऊन रहतात, त्यांना द्वंद्वरूपी दुःखाचा डोंगर अणुमात्रहि बाधत नाहीं. ३८ देहप्रारब्धमार्गांत सुख-दुःखांच्या झळा जरी लागल्या तरी तो ब्रह्मसुखाच्या चव्हाट्यावर देहाचा द्रष्टा-साक्षी होऊन रहातो, ३९ देहाची प्रतिष्ठा वाढली व तो मोठ्या श्रेष्ठ पदवीला चढला तरी त्याच्या जीवाला हर्ष वाटत नाहीं. किंवा देह नरकाच्या दारांत जाऊन पडला, तरीहि तो कष्टी होत नाहीं. ३४० देह वाघाच्या तोंडांत सांपडला किंवा पालखींत बसला तरी त्यांचें मन निर्विकार असते. ४१ आपली छाया विष्ठेवर पडली किंवा पालखींत असली तरी त्याचा जसा कोणाला शोक किंवा हर्ष होत नाहीं, तसा मुक्त देहाच्या भोगांविषयीं उदासीन असतो. ४२ त्याच्या दृष्टीपुढें दुःख आपल्या दुःखपणाला सर्वथा विसरतें व सुख सुखपणाला विसरतें. यास्तव तो

देख या हेतू ॥ ४३ ॥ जो निर्मम निरभिमान । त्यासी नाहीं भेदभान । अभेदीं मिथ्या द्वंद्वबंधन । हा सातवा गुण निर्द्वंद्व ॥ ४४ ॥ जो निर्द्वंद्व निरभिमान पहा हो । त्यासी मिथ्या समूळ निजदेहो । तेथ देहसंबंधें परिग्रहो । उरावया ठावो मग कैंचा ॥ ४५ ॥ स्वजनधनस्त्रीपुत्रांसीं । नांदोनि तो नातळे त्यांसी । स्वप्नघरवात जागृता जैसी । तैसा साधूसी संसारू ॥ ४६ ॥ एव परिग्रहीं असोन । साधु अपरिग्रही पूर्ण । हें आठवें मुख्य लक्षण । अतर्क्य जाण जगासी ॥ ४७ ॥ साधु परिग्रही दिसती । परी ते परिग्रही नसती । हेचि संतांची पावावया स्थिती । त्यांची निजभक्ती करावी ॥ ४८ ॥ हें साधूचें अष्टलक्षण । तें ब्रह्मींचें अष्टांग जाण । कीं अष्टमहासिद्धि निर्गुण । ते हे अष्टगुण साधूचे ॥ ४९ ॥ चैतन्यसरोवरींचें कमळ । विकासलें अष्टदळ । तें हें संतलक्षण केवळ । स्वानंदशीळ साधूसी ॥३५०॥ ऐसे हे अष्ट महागुण । सकळ भूषणां भूषण । ज्याचे अंगीं बाणले पूर्ण । ते साधु सज्जन अति शुद्ध ॥ ५१ ॥ इतर संगाचिये प्राप्ती । संग बाधक निश्चितीं । तैसी नव्हे सत्संगती । संगें छेदी आसक्ती देहसंगा ॥ ५२ ॥ तेथ उपदेश न लागे कांहीं । संगें देही करी विदेही । तेचि सात श्लोकीं पाहीं । संतांची नवाई हरि सांगे ॥ ५३ ॥

तेषु नित्यं महाभाग महाभागेषु मत्कथाः । संभवन्ति हिता नृणां जुषतां प्रपुनन्त्यघम् ॥ २८ ॥

इंद्रपदादि ब्रह्मसदन । ये प्राप्ती नांव भाग्य गहन । तेही सत्संगासमान । कोट्यंशें जाण तुकेना ॥ ५४ ॥ ऐसी जे कां सत्संगती । सभाग्य भाग्याचे पावती । भगवद्भावें साधु वर्तती । माझे कथाकीर्ति-अनुवादें ॥ ५५ ॥ जे कथा अवचटें कानीं । पडतां कलिमलाची धुणी । करूनि सांडी तत्क्षणीं । जे

निर्द्वंद्व होय. ४३ जो निर्मम, निरहंकार झाला त्याला भेदाचें भान नसतें. अभेदांत द्वंद्वाचें बंधन मिथ्या होतें. निर्द्वंद्व म्ह० अभेदभाव हा सातवा गुण झाला. ४४ जो निर्द्वंद्व निरभिमान झाला त्याला आपला देहहि समूळ मिथ्या भासतो. मग देहसंबंधीं परिवार वाढविण्यास अवकाश कोठचा ! ४५ आप्त-धन-स्त्री-पुत्र या सर्वांच्या परिवारांत रहात असूनहि तो त्यांच्यांत आसक्त होत नाहीं. जाग्या माणसाला स्वप्नांतील व्यवहार जसे मिथ्या वाटतात, तसा साधु संसाराला मिथ्या समजतो. ४६ याप्रमाणें परिग्रहांत राहूनहि साधु पूर्णपणें अपरिग्रही असतो. जगाला अगम्य असलेलें साधूचें हें आठवें मुख्य लक्षण आहे. ४७ साधु परिग्रहवान् असल्यासारखे दिसतात; पण ते परिग्रही नसतात. संतांची ही स्थिति प्राप्त होण्यासाठीं त्यांची भक्ति करावी. ४८ साधूंचीं हीं आठ लक्षणें म्हणजे ब्रह्माचीं आठ अंगेंच आहेत किंवा साधूंचे हे आठ गुण या निर्गुण अष्टमहासिद्धि आहेत. ४९ संतांचें हें अष्टलक्षण चैतन्य-सरोवरांतील अष्टदलकमलच आहे. साधूंना तें आत्मानंद देतें. ३५० सगळ्या भूषणांतील भूषण असे हे आठ महागुण आहेत. ते ज्याच्या अंगीं पूर्णपणें बाणले, तोच अत्यंत शुद्ध व सज्जन साधु समजावा. ५१ इतर कोणा-चीहि संगति प्राप्त झाली असतां ती बाधक होते, पण सत्संगति तशी नाहीं. या सत्संगतीनें देहावरील आसक्ति सुटते. ५२ त्यासाठीं निराळा उपदेश लागत नाहीं. केवळ संतांच्या संगतीनेंच देहवान् विदेही होतो. तीच संतांची अपूर्व कथा पुढील सात श्लोकांनीं हरी सांगत आहे. ३५३.

‘ त्यांच्या उपदेशाचीच कांहीं अपेक्षा नाहीं, तर त्यांच्या नुसत्या सांनिध्यांत जरी राहिलें तरी पुरुषाचा उद्धार होतो, असें या पुढील सात श्लोकांनीं भगवान् सांगतात—

महाभाग—हे श्रेष्ठ उद्धवा ! तेषु महाभागेषु नित्यं मत्कथाः संभवन्ति—त्या महात्म्यांपाशीं सतत माझ्या कथा चाललेल्या असतात. ताः जुषतां नृणां अघं प्रपुनन्ति हि—त्या (कथा) मत्संग करणाऱ्या पुरुषांचें पाप सर्वथा घालवितात. २८.

इंद्रपदापासून ब्रह्मलोकापर्यंत प्राप्ति होण्यास मोठेंच भाग्य लागत असतें. परंतु तें भाग्यहि सत्संगतीच्या कोट्यंशाचीहि बरोबरी करूं शकत नाहीं, ५४ अशी ही सत्संगति भाग्यवानांसच प्राप्त होते. कारण साधु माझ्या कथेचें अनुकीर्तन करीत भगवद्भावनेनेंच वागत असतात. ५५ त्यांचे कथानुकीर्तन अकस्मात् जरी कानीं पडलें तरी त्यानें

गंगेहूनी पवित्र ॥ ५६ ॥ जेथ माझी निजकथा गाती । तीर्थें तेथें पवित्र होती । ऐसिया भगवत्कथाकीर्ती । साधु गर्जती सर्वदा ॥ ५७ ॥ स्वयें आपण भागीरथी । सर्वदा ऐसें जीवीं चिंती । कोणी साधु ये जैं मजप्रती । तैं माझीं पापें जाती निःशेष ॥ ५८ ॥ पार्वतीचा द्वेष मनीं । बद्ध पाप मजलागुनी । तेंही झडे संतचरणीं । सकळ पापा धुणी सत्संगें ॥ ५९ ॥ कां ज्याचे मुखीं हरिनामकीर्ती । त्याचे पाय जैं मज-माजीं येती । तैं सकळ पापें माझीं जाती । ऐसें भागीरथी स्वयें बोले ॥ ३६० ॥ ऐसी संतांची संगती । सदा वांछी भागीरथी । अवचटें गेलिया संतांप्रती । पापें पळती प्राण्यांचीं ॥ ६१ ॥ ते संतमुखींची माझी कथा । जैं अत्यादरें ऐके श्रोता । तैं त्याचें निजभाग्य तत्त्वतां । मजही सर्वथा न वर्णवे ॥ ६२ ॥ माझे कथेची अतिआवडी । नित्य नूतन नवी गोडी । सादरें ऐकतां पापकोडी । जाळोनि राखोंडी उरवीना ॥ ६३ ॥ माझी कथा माझें नाम । सकळ पातकां करी भस्म । हेंचि चित्तशुद्धीचे वर्म । अतिसुगम उद्धवा ॥ ६४ ॥ नाना योग याग वेदाध्ययन । करितां पवित्र नव्हे मन । तें करितां हरिकथाश्रवण । होय अंतःकरण पुनीत ॥ ६५ ॥ अबद्ध पढतां वेद । दोष बाधिती सुबद्ध । नाम पढतां अबद्ध । श्रोते होती शुद्ध परमार्थतां ॥ ६६ ॥ नाना योग याग वेदाध्ययन । तेथ अधिकारी द्विज संपूर्ण । कथाश्रवणें चारी वर्ण । होती पावन उद्धवा ॥ ६७ ॥ ऐसा लाभ कथाश्रवणीं । तरी कां नाइकिजे सकळ जनीं । तें भाग्य भगवत्कृपेवांचूनी । सर्वथा कोणी लाहेना ॥ ६८ ॥ भगवत्कृपा पावले सांग । त्यांसी कथाकीर्तनीं अनुराग । तेचि निजभाग्यें महाभाग । स्वमुखें श्रीरंग बोलिला ॥ ६९ ॥ जगातें पवित्र करिती । माझी जाण नामकीर्ती । ऐसा कळवळोनि श्रीपती । उद्धवाप्रती बोलिला ॥ ३७० ॥ ऐसी भगवत्कृपेची प्राप्ती । केवीं आतुडे आपुले हातीं । तेंचि अर्थी श्रीपती । विशद श्लोकार्थीं सांगत ॥ ७१ ॥

तत्काल पातकें धुवून जातात. अशी ती कथा गंगेहूनहि पावन आहे. ५६ माझी कथा जेथें गातात, तेथलीं तीर्थें त्यायोगें होतात. अशा भगवत्कथेचा घोष साधु निरंतर करीत असतात. ५७ स्वतः भागीरथी नेहमीं मनांत चिंतन करीत पवित्र असते कीं, कोणी साधु जर माझ्यापाशीं येईल, तर माझीं सगळीं पातकें नाहींशीं होतील. माझ्या मनांत पार्वतीचा मत्सर असल्यामुळें मी पातकांनीं युक्त झालें आहें. संतचरणांनीं तें पातक झडून जाईल. कारण सत्संगतीनें सगळ्या पापांचें क्षालन होतें. ५९ किंवा ज्याच्या मुखांत हरिनामाचें कीर्तन आहे, त्यानें आपले चरण जरी माझ्या जलांत बुडविले, तरी माझ्या सगळ्या पातकांचा नाश होईल, असें भागीरथी स्वतः बोलत असते. ३६० व ती स्वतः सत्संगतीची इच्छा सतत करिते. अकस्मात् जरी संतांची भेट झाली तरी प्राण्यांचीं पातकें पळून जातात. ६१ त्या संतांच्या मुखानें माझी कथा मोठ्या आदरानें ऐकणाऱ्या श्रोत्यांच्या भाग्याचें मलाहि वर्णन करवत नाहीं. ६२ ज्यांस माझ्या कथेची आवड आहे, त्यांस त्यांत नित्य नवी गोडी वाटूं लागते. आदरानें कथा श्रवण केली असतां कोट्यवधि पातकें जळून जातात. त्याची राख देखील उरत नाहीं. ६३ उद्धवा ! माझी कथा व माझें नाम सगळ्या पातकांचें भस्म करितें. चित्तशुद्धीचें अत्यंत सुलभ व खरें वर्म हेंच आहे. ६४ अनेक प्रकारचे योगयाग व वेदाध्ययन करण्यानें मन पवित्र होत नाहीं. परंतु हरिकथेच्या श्रवणानें अंतःकरण पावन होतें. ६५ अशुद्ध वेदोच्चार केले असतां महादोष लागतात; परंतु हरीचें नामस्मरण अशुद्ध वाणीनें जरी केलें, तरी श्रोते परमार्थांत शुद्ध होतात. ६६ उद्धवा ! अनेक प्रकारचे योग, याग, व वेदाध्ययन यांचे अधिकारी द्विज आहेत; परंतु मत्कथाश्रवणानें चारी वर्णांतील लोक पावन होतात. ६७ हरिकथाश्रवणांत जर एवढा लाभ आहे तर सगळे लोक हरिकथाच कां ऐकत नाहींत ! याचेंहि कारण ऐक. भगवत्कृपेवांचून हें भाग्य कोणालाहि सर्वथा लाभत नाहीं. ६८ ज्यांच्यावर पूर्ण भगवत्कृपा असते, त्यांनाच कथा-कीर्तनाची आवड असते. तेच भाग्यवान् श्रेष्ठ होत, असें श्रीकृष्ण सांगत आहे. ६९ माझें नांव व कीर्ति जगाला पवित्र करितात, असें श्रीपतीनें उद्धवाला कळवळून सांगितलें. ७० अशा भगवत्कृपेची प्राप्ती आपल्या हातीं कशी येईल याविषयीं श्रीहरि पुढील श्लोकांत स्पष्ट करून सांगत आहे. ३७१.

ता ये शृण्वन्ति गायन्ति ह्यनुमोदन्ति चादृताः । मत्पराः श्रद्दधानाश्च भक्तिं विन्दन्ति ते मयि ॥ २९ ॥

आपुलिया गृहकार्यार्था । विषयव्यापारी जात जातां । कानीं पडली हरिकथा । स्वभावतां प्रसंगें ॥ ७२ ॥ कृष्णकीर्तिकथनाक्षरें । रिघतांचि कर्णद्वारें । भीतरील पाप एकसरें । निघे नाहिरें गजबजोनी ॥ ७३ ॥ जेवीं पंचाननाची आरोळी । करी मदगजां रांगोळी । तेवीं हरिकथेच्या मेळी । करी रंवदळी महापापा ॥ ७४ ॥ ऐसा निघाल्या पापाचा केरू । कथेसी उपजे अत्यादरू । कथावधानीं धरितां धीरू । हर्षे निर्भरू मन होय ॥ ७५ ॥ जंव जंव कथारहस्य जोडे । तंव तंव अनुमोदनीं प्रीति वाढे । वाढले प्रीतिचेनि पाडें । ते कथा कैवाडें स्वयें गाय ॥ ७६ ॥ फेडूनि लोकलाजेचें विरडे । गातां हरिकीर्तिगुणपवाडे । न पाहे तो कर्माकडे । तें सांकडें सुहृदांसी ॥ ७७ ॥ निजभावें भगवत्कथा गातां । स्वयंभ उपजे सादरता । तेणे अत्यादरें हरिकथा । होय सांगता अतिश्रद्धा ॥ ७८ ॥ जंव जंव कथा सांगे निवाडें । तंव तंव श्रद्धा अधिक वाढे । प्रेमाचा पूर चढे । त्यामाजी बुडे निजश्रद्धा ॥ ७९ ॥ कथाकीर्तन अनुकीर्ती । वाढत्या श्रद्धेचिये प्रीतीं । बाधूं न शके विषयासक्ती । तेणें मत्पर स्थिती साधकां ॥ ३८० ॥ न करितां भगवद्भजन । वेदाध्ययन यज्ञ दान । येणेंचि आम्ही जाऊं तरोन । म्हणती ते जनमहामूढ ॥ ८१ ॥ एथ मुख्यत्वें भगवद्भक्ती । हा विश्वास धरितां चित्तीं । भगवत्पर झाली वृत्ती । सर्वभूतीं मद्भाव ॥ ८२ ॥ ऐसा भाव धरोनि हृदयीं । माझे भक्तीवेगळें कांहीं । सर्वथा स्वयें करणें नाहीं । मत्पर पाहीं या रीतीं ॥ ८३ ॥ ऐशिया मत्पर वृत्ती । सावधान निजस्थिती । भक्तां उपजे चौथी भक्ती । तेंचि श्रीपति स्वयें सांगे ॥ ८४ ॥ तेथ न करितां आठवण । अखंड होय हरीचें स्मरण । क्रियामात्र भगवद्भजन । सहजें जाण सर्वदा ॥ ८५ ॥ जें जें दृष्टी देखे आपण । थोर अथवा सूक्ष्म सान । तें तें हरीचें निज-

---

ये आदृताः मत्पराः श्रद्दधानाः च ताः शृण्वन्ति गायन्ति अनुमोदन्ति ते मयि भक्तिं विन्दन्ति—जे मोठ्या आदरानें युक्त, मत्परायण व श्रद्धावान् होऊन त्या कथा ऐकतात, गातात व त्यांच्या श्रवणानें आनंदित होतात ते माझ्या ठिकाणच्या भक्तीला प्राप्त होतात. [किंवा आदरानें केलेल्या श्रवणादिकांना मत्परायण व श्रद्धावान होऊन माझ्या ठिकाणच्या भक्तीला प्राप्त होतात.] २९.

आपल्या गृहकार्यांतील लौकिक व्यवहारासाठीं जात असतां प्रसंगीं सहज हरिकथा कानीं पडल्यास ७२ तीं कृष्णाच्या कीर्तिकथनाचीं अक्षरें कानांत शिरतात व आंतील पाप मोठ्या गडबडीनें बाहेर पडतें. ७३ सिंहाची गर्जना जशी मत्त गजाचा नाश करिते, त्याप्रमाणें हरिकथेच्या श्रवणानें महापातकांचा नाश होतो. ७४ अशाप्रकारें पापरूपी केर निघून गेला म्हणजे कथेविषयीं अत्यंत आदर उत्पन्न होतो. कथा ऐकण्यांत धीर धरला असता मन आनंदानें उचंबळूं लागतें. ७५ कथेचें रहस्य जसें कळूं लागतें. तशी-तशी अनुमोदनाची आवड उत्पन्न होते व वाढत्या प्रीतीच्या ओढीनें तो स्वतः कथा गाऊं लागतो. ७६ लोकलज्जेचें बंधन तोडून हरीच्या यशाचा महिमा गात असतां तो कर्माकडे ढुंकूनहि पहात नाहीं. तें त्याच्या सुहृदांस संकट वाटतें. ७७ भक्तिभावानें भगवत्कथा गाईली असता स्वभावतःच सादरता उत्पन्न होते. त्यामुळें तो मोठ्या आदरानें व अत्यंत श्रद्धेनें हरिकथा सांगूं लागतो. ७८ तो जशी जशी कथा सांगूं लागतो तशी तशी त्याची श्रद्धा अधिक वाढते. प्रेमाचा पूर वाहूं लागतो. त्यात श्रद्धाहि बुडून जाते. ७९ कथा-कीर्तनाची आवड व श्रद्धा यांवरील प्रीति वाढली असतां विषयासक्ति बाधूं शकत नाहीं. त्यामुळें साधक मत्परायण होतात. ३८० परंतु महामूढ लोक भगवद्भजन न करितां ‘ वेदाध्ययन, यज्ञ दान यांच्यायोगें आम्ही तरुन जाऊं ’ असें म्हणत असतात. ८१ पण त्यांतहि भगवद्भक्तीच मुख्य आहे, असा भाव मनांत धरिला असतां वृत्ति भगवत्परायण होते व ती सर्व प्राण्यांत मद्भाव पाहूं लागते. ८२ असा भाव हृदयांत धरून ती वृत्ति माझ्या भक्तीवांचून स्वतः दुसरें कांहींहि करीत नाहीं. या रीतीनेंच तेहि मत्पर होतात. ८३ अशा मत्परवृत्तीनेंच आत्मस्थिति सावधान होते व भक्तांच्या मनांत चौथी भक्ति उपजते, हेंच श्रीपति स्वतः सांगत आहे. ८४ त्या वेळीं मुद्दाम आठवण करण्याची गरज रहात नाहीं. हरीचें स्मरण अखंड होत असतें. क्रियामात्र भगवद्भजन सर्वदा सहज सतत घडत असतें. ८५ जें जें कांहीं लहान-मोठें दृष्टीला दिसतें, तें तें हरीचेंच

दर्शन । सहजें भजन अहेतुक ॥ ८६ ॥ जें जें वाचा वदे वचन । तें तें होय हरीचें स्तवन । स्तव्य स्तविता उणखूण । हेही आठवण विसरोनी ॥ ८७ ॥ शब्दीं शब्दातें शब्दवितां । ते शब्दरूपें हरीची सत्ता । शब्दद्योतक ज्या शब्दार्था । ते अर्थग्राहकता हरीची ॥ ८८ ॥ यापरी शब्दश्रवण । श्रवणीं श्रवण होतां जाण । तो शब्दार्थ संपूर्ण । होय ब्रह्मार्पण श्रवणेंसीं ॥ ८९ ॥ गंधघ्राणां होतां भेटी । भोक्तेपणें हरीचि उठी । तो घ्रेय घ्राता घ्राह्य त्रिपुटी । स्वयें घोंटी चिद्‌त्वें ॥ ३९० ॥ रस रसना रसत्वबोध । तेथ निजभोक्ता गोविंद । तो भोग्य भोक्ता भोजनसंबंध । करी परमानंद निजबोधें ॥ ९१ ॥ शीत उष्ण मृदु कठिण । निजांगीं लागतां जाण । तें अंगेंचि होय आपण । मृदु कठिण मिथ्यात्वें ॥ ९२ ॥ करांची जे कर्तव्यता । तीतें चालवी अकर्ता । यालागीं घेतांदेतां । अकर्तात्मता हरिभजन ॥ ९३ ॥ निश्चळ निजरूपावरी । चपळ पाउलांच्या हारी । चालवी जैसा लहरी । सूर्यकरीं मृगजळाच्या ॥ ९४ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीं । चिन्मात्रीं जडली वृत्ती । चित्त चित्तत्वाची विसरे स्फूर्ती । या नांव मद्भक्ति उद्धवा ॥ ९५ ॥ हे माझी आवडती भक्ती । इचें नांव म्हणिजेत चौथी । हें भाग्य आतुडे ज्याचे हातीं । तैं चारी मुक्ती निजदासी ॥ ९६ ॥

भक्तिं लब्धवतः साधोः किमन्यदवशिष्यते । मय्यनन्तगुणे ब्रह्मण्यानन्दानुभवात्मनि ॥ ३० ॥

अत्यंत माझी पढियंती । ते हे जाण चौथी भक्ती । निजभाग्यें लाधल्या हातीं । चारी मुक्ती तृणप्राय ॥ ९७ ॥ निरपेक्ष जेथ माझी भक्ती । तेथ पायां लागती चारी मुक्ती । त्यांतें भक्त न धरिती हातीं । एथवरी प्रीति मद्भजनीं ॥ ९८ ॥ माझिया निजभजनप्रीतीं । स्वप्नींही बद्धता नेणिजे भक्तीं । बद्धतेवीण मिथ्या मुक्ती । जाणोनि न घेती निजभक्त ॥ ९९ जेथ बद्धता समूळ कुडी । तेथ मुक्ति कायशी

स्वरूप समजून तो निष्काम भजन करीत असतो. ८६ त्याची वाचा जें वचन उच्चारिते, तें स्तव्य व स्तविता यांस विसरून हरीचें स्तवनच होतें, ८७ शब्दानें शब्द बोलवितांना हरीची सत्ता त्या शब्दरूपानेंच असते. कारण शब्दांवरून जो अर्थबोध होतो, त्यांतील ती अर्थग्राहकताहि हरीचीच आहे. ८८ याप्रमाणें कानांनीं शब्दांचें श्रवण होत असतां श्रवणांसह सर्व शब्दार्थ ब्रह्मार्पण होतो. ८९ सुगंध व नाक यांचीं गांठ पडतांच भोक्तेपणानें हरिच दिसूं लागतो आणि तो सुवास, वास घेणारा व नाक या त्रिपुटीला स्वतःमध्येंच चिद्रूपानें गिळून टाकितो. ३९० रस, रसना आणि रसाची चव, यांचाहि भोक्ता गोविंदच आहे. त्यामुळें भोग्य, भोक्ता व भोजनसंबंध आत्मज्ञानामुळें परमानंदच होऊन रहातो. ९१ शीत, उष्ण, मृदु, कठिण, यांचा आपल्या अंगाशी संबंध झाला असतां, ते स्वतःच तो होतो. कारण मृदु, कठिण इत्यादि सर्व मिथ्या आहे. ९२ हाताचें जें कर्तव्य तें तो अकर्ताच करवितो. त्यामुळें देतांना व घेतांनाहि त्याचें ते अकर्तृरूप हरीचें भजनच होतें. ९३ आत्मस्वरूपांत निश्चल राहून तो आपल्या पावलांच्या पंक्ति सूर्यकिरणांनीं उत्पन्न झालेल्या मृगजलाच्या लाटाप्रमाणें चालवितो. ९४ जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ति या अवस्थांमध्यें वृत्ति चित्स्वरूपांत जडली म्हणजे चित्त आपलें चित्तपण विसरून जातें. उद्धवा ! ९५ यालाच मद्भक्ति म्हणतात. ही माझी आवडती चवथी भक्ति आहे. हें भाग्य ज्याला लाभते, त्याच्या चारी मुक्ति दासी होऊन रहातात. ३९६.

अनंतगुणे ब्रह्मणि आनंदानुभवात्मनि मयि भक्तिं लब्धवतः साधोः किं अन्यत् अवशिष्यते—ज्याचे गुण अनंत आहेत अशा सर्वगत आनंदानुभवरूप अशा माझ्या ठिकाणीं भक्तीला प्राप्त झालेल्या साधूला आणखी काय मिळवयाचें रहातें ! [कांहीं नाहीं.] ३०.

माझी ही अतिशय आवडती चवथी भक्ति मोठ्या भाग्यानें हातीं आली असतां चारी मुक्ति तृणवत् होतात. ९७ जो माझी निरपेक्ष भक्ति करितो, त्याच्या पायांवर चारी मुक्ति पडतात; परंतु भक्त त्यांना हातहि लावीत नाहीं. त्याची भगवद्भजनावर एवढी प्रीति असते. ९८ माझ्या भजनाच्या आवडीमुळें माझ्या भक्ताला स्वप्नांतहि बद्धता ठाऊक नसते. कारण बंधावांचून मुक्ति मिथ्या आहे, हें जाणून माझे भक्त तिचा स्वीकार करीत नाहींत. ९९

बापुडी । माझिया निजभजनआवडीं । स्वानंदकोडी मद्भक्तां ॥ ४०० ॥ निरपेक्ष निजप्रीतीं । भावें करितां अनन्य भक्ती । भक्तांसीं स्वानंदाची प्राप्ती । भजनस्थितीमाझारीं ॥ १ ॥ जेवीं गर्भेंसी वर्तवी गुर्विणी । कां तरुणपणें तरुणीसी । तेवीं स्वानंदाच्या पूर्णपणीं । माझे निजभजनीं मद्भक्त ॥ २ ॥ तेथ सगुण अथवा निर्गुण । उभयरूपें मी ब्रह्म पूर्ण । तेथ भावें करितां भजन । ब्रह्मसंपन्न मद्भक्त ॥ ३ ॥ भावें करितां माझी भक्ती । भाविकां कोण पां अप्राप्ती । विवेकवैराग्यज्ञानसंपत्ती । पायां लागती मद्भक्तां ॥ ४ ॥ माझे निजभजनें तुटे भेद । स्वयेंचि तेथें प्रकटे अभेदबोध । तेणें वोसंडे परमानंद । स्वानंदकंद स्वयंभ ॥ ५ ॥ माझे स्वस्वरूपा नाहीं अंत । यालागीं नांवें मी अनंत । बाप भक्तभाव समर्थ । तेणें मी अनंत आकळिलों ॥ ६ ॥ ऐसे ज्याचें प्रेम गोड । त्याचें सेवेचें मज कोड । त्याचें सोशीं मी सांकड । निचाडा चाड मज त्याची ॥ ७ ॥ देव सप्रेमें भुलला । म्हणे मी त्याचाचि अंकिला । जीवेंभावें तया विकिला । मी त्याचा जाहला तिहीं लोकीं ॥ ८ ॥ एथवरी भक्तां माझी प्राप्ती । अवचटें झाल्या सत्संगती । मा सद्भावें जे साधु सेविती । त्यांची निजगती न बोलवे ॥ ९ ॥ ऐसा संतमहिमा वानितां । धणी न पुरे श्रीकृष्णनाथा । तोचि संतमहिमा मागुता । होय वानितां चौं श्लोकीं ॥ ४१० ॥

यथोपश्रयमाणस्य भगवन्तं विभावसुम् । शीतं भयं तमोऽप्येति साधून् संसेवतस्तथा ॥ ३१ ॥

जेवीं वैश्वानर तेजोमूर्ती । त्याची सेवा जे करूं जाणती । त्यांचें शीत-तम भयनिवृत्ती । जो करी निश्चितीं उद्धवा ॥ ११ ॥ शीत निवारी सन्निधीं । तम निवारीं तेजोवृद्धी । भय निवारी भगवद्बुद्धी । जेवीं त्रिशुद्धी विभावसू ॥ १२ ॥ तैसीच जाण सत्संगती । संगें त्रिविध ताप निवारती । तेचि अर्थांची

जेथें बद्धताच मिथ्या आहे, तेथें बापडी मुक्ति ती काय ! माझ्या भजनाच्या आवडीमुळें माझ्या भक्ताजवळ आत्मानंदाच्या राशी असतात. ४०० माझें निरपेक्षा व भक्तिभावानें अनन्य भजन केलें असतां भक्तांना त्यांतच आत्मानंद प्राप्त होतो. १ गर्भिणी जसा गर्भ वाढविते, किंवा तरुणी जशी तारुण्य वाढविते, त्याप्रमाणें माझा भक्त आत्मानंदाच्या भरांत स्वानंदाला वाढवीत माझ्या भजनांत तत्पर होतो. २ सगुण किंवा निर्गुण या दोन्हीं रूपानीं मी पूर्ण ब्रह्म आहें. माझें भक्तीनें भजन केलें असतां माझा भक्त ब्रह्मसंपन्न होतो. ३ भक्तीनें माझें भजन केलें असतां भाविकांना अप्राप्त असें काय आहे ! विवेक-वैराग्यासह सगळी ज्ञानसंपत्ति माझ्या भक्ताच्या पायांवर पडत असते. ४ माझ्या भजनामुळें भेद नाहींसा होऊन तत्काल अभेदाचें ज्ञान उत्पन्न होतें. त्यामुळें स्वयंभु, स्वानंदकंद असा परमानंद उचंबळतो. ५ माझ्या स्वरूपाला अंत नाहीं. म्हणून मला अनंत म्हणतात. पण माझ्या भक्तांचा भाव इतका समर्थ आहे कीं, त्यानें मज अनंतालाहि बांधून टाकिलें आहे. ६ ज्याचें प्रेम असें गोड आहे त्याच्याच सेवेची मला आवड आहे त्याच्यावरील संकट मी सोशितो. मज निष्कामाला त्याची काळजी असते. ७ देव प्रेमाला भाळला व मी ' त्याचा अंकित आहें ' असें म्हणाला. सर्वस्वी त्याला वाहून घेऊन तीन्ही लोकीं तो त्याचाच झाला. ८ अकस्मात् जरी सत्संगति घडली, तरी माझ्या भक्तांना एवढी प्राप्ति होते, मग जे सद्भावाने साधूंची सेवा करितात त्यांना किती लाभ होत असेल, त्याचें तर वर्णनहि करवत नाहीं ! याप्रमाणें संतांचा महिमा वर्णन करीत असतां श्रीकृष्णाची तृप्ति झाली नाहीं, म्हणून तो त्याच संतमहिम्याची पुढील चार श्लोकांत पुनः स्तुति करीत आहे. ४१०.

यथाः भगवन्तं विभावसुं उपश्रयमाणस्य–ज्याप्रमाणें भगवान् अग्नीचा आश्रय करणाराचें शीतं भयं तमः अप्येति–शीत, भय व अंधकार, याचा नाश होतो तथा साधून् संसेवतः–त्याप्रमाणें साधूंच्या संगतींत रहाणाऱ्या पुरुषाचें कर्मजाडय, पुढील संसारभय व त्याचें मूळ अज्ञान, हीं नाश पावतात. ३१.

उद्धवा ! जे तेजोमय अग्नीची सेवा करूं जाणतात, त्यांच्या–थंडी, अंधकार व भीति—या तिहींचें तो अग्नि निवारण करितो. ११ त्यांच्या सान्निध्यानें थंडीचें, प्रकाशानें अंधाराचें आणि ईश्वरभावानें भीतीचें निवारण होतें. सत्संगहि अग्नीसारखाच आहे, असें तूं समज. १२ संतांच्या संगतीनें त्रिविध तापाचें निवारण होतें. उद्धवा !

निजयुक्ती । ऐक उपपत्ती उद्धवा ॥ १३ ॥ शीत म्हणिजे द्वंद्वबाधू । तो समूळ निवारिती साधू । तम । म्हणिजे अज्ञानांधू । त्यांसी करिती प्रबोधू निजज्ञानें ॥ १४ ॥ भयांमाजीं श्रेष्ठ मरण । तें निवारिती साधु विचक्षण । दूर करिती जन्ममरण । कृपाळू पूर्ण दीनांचे ॥ १५ ॥ अग्निसमान म्हणणें साधु हाहि बोल अतिअबिद्ध । अग्नीहूनि अधिक साधू । तोचि प्रबोधू हरि सांगे ॥ १६ ॥ अग्नीपाशीं प्रबळ धूम । साधु निष्क्रोध निर्धूम । अग्नि पोळी अधमोत्तम । साधु सर्वसम सुखदाते ॥ १७ ॥ साधूंची धन्य धन्य संगती । संगें जडजाड्य तोडिती । कर्मांचें कर्मठत्व मोडिती । बुडत्या तारिती निजसंगें ॥ १८ ॥

निमज्ज्योन्मज्जतां घोरे भवाब्धौ परमायनम् । सन्तो ब्रह्मविदः शान्ता नौर्दृढेवाप्सु मज्जताम् ॥ ३२ ॥

प्रतिक्षणीं अधिक वृद्धी । अमर्याद वाढी भवाब्धी । तेथ उबकल्या चुबकल्या त्रिशुद्धी । अधर्मबुद्धि जनांसी ॥ १९ ॥ अधर्में निमज्जन नरकांत । स्वधर्में उन्मज्जन स्वर्गांत । ऐसे भोगिती आवर्त । स्वर्गनरकांत संसारी ॥ ४२० ॥ यापरी संसारी जन । पावतां उन्मज्जन निमज्जन । त्यासी तरावया भवाब्धि जाण । साधु सज्जन दृढ नांव ॥ २१ ॥ पडल्या जळार्णवामाझारीं । जेवीं अच्छिद्र नाव तारी । तेवीं पडतां भवसागरीं । सुखरूपें तारी सज्जननाव ॥ २२ ॥ कामक्रोधरहित शांती । हेचि नावेची अच्छिद्र स्थिती । ब्रह्मज्ञानें सपुरती । सुखरूप निश्चितीं या हेतू ॥ २३ ॥ कामक्रोधादि सावजांसी । बळें घ्यावया आंविसासी । कदा न येववे नावेपाशीं । संगें सकळांसी तारक ॥ २४ ॥ नवल ये नावेची स्थिती । जुनी नव्हे कल्पांतीं । बुडवूं नेणे धारावर्तीं । तारक निश्चितीं निजसंगें ॥ २५ ॥

मी आतां त्याचेंच स्पष्टीकरण करितों. तें ऐक. १३ थंडी म्हणजे शीतोष्ण-सुखदुःखादि द्वंद्वांपासून होणारी पीडा. साधु तिचें समूळ निवारण करितो, तम म्हणजे अज्ञान, त्याला तो आत्मज्ञानानें प्रकाशित करितो. १४ सर्व भयांत मरणाचें भय मुख्य आहे, पण दीनांवर पूर्ण कृपा करणारे साधु त्यालाहि जन्म-मरणनिवृत्तीच्या द्वारा दूर करितात. १५ साधु अग्नीप्रमाणें आहेत असें बोलणेंहि यथार्थ नाहीं. कारण साधु अग्नीहूनहि अधिक आहेत. ते कसे ! तेंच हरि सांगत आहे. १६ अग्नीपाशीं भयंकर धूर असतो. परंतु साधु क्रोधरहित, धूमरहित असतो, अग्नि उत्तमाला व अधमाला पोळून टाकितो; पण साधु सगळ्यांना सारखेंच सुख देणारे आहेत. १७ साधूंची संगति धन्य-धन्य होय. त्यांच्या संगतीनें कर्मजाड्य, भवभय व मूल अज्ञान हीं नाश पावतात. कर्मांचें कर्मठत्व नाहींसें होतें आणि ते बुडत असलेल्याला आपल्या संगतीनें तारतात. ४१८.

अप्सु मज्जतां दृढा नौः इव घोरे भवाब्धौ निमज्य उन्मज्जतां शान्ताः ब्रह्मविदः सन्तः परमायनं— समुद्रजलांत बुडणाऱ्या जीवांना दृढ नौका हा जसा मोठा आश्रय आहे, त्याप्रमाणें घोर संसारसागरांत उच्च-नीच योनींस प्राप्त होणाऱ्या पुरुषांचा शांत, ब्रह्मज्ञ संत हा मोठा आश्रय आहे. ३२.

या संसारसागराला प्रत्येक क्षणाला जोराची भरती येत असते. त्यांत गटंगळ्या खाणाऱ्या लोकांना अधर्माची बुद्धि होते. १९ अधर्मामुळें ते नरकांत बुडतात व स्वधर्मानें स्वर्गावर चढतात. अशा स्वर्ग-नरकांच्या भोवऱ्यांत संसारी जन सांपडतात. ४२० पण संसारी लोक याप्रमाणें वर-खालीं जात असतां त्यांस त्या संसारसागरांतून तारण्यास साधु-संत ही एक दृढ नौकाच आहे. २१ छिद्ररहित नौका जशी जलप्रवाहांतून तारून नेते, तशी ही सज्जनरूपी नौका संसाराच्या प्रवाहांत पडलेल्या लोकांना सुखरूपपणें परतीराला नेऊन सोडिते. २२ काम-क्रोधरहित शान्ति हाच नौकेचा अच्छिद्रपणा होय. ब्रह्मज्ञानानें संपन्न असणें यालाच सुखरूप म्हटलें आहे. २३ काम-क्रोधादिरूप सावजें नौकेजवळ बलात्कारानें आमिष तोडून घ्यावयास केव्हांहि येऊं शकत नाहींत. सत्संग असा सर्वांना तारणारा आहे. २४ या नौकेचा चमत्कार असा आहे कीं, ती कधींहि जुनी होत नाहीं. भोवऱ्यांत बुडूं देत नाहीं. आपल्या संगतीनें सर्व प्राण्यांना तारिते. २५ या नावेचें दुसरें एक असें आश्चर्य आहे कीं, जे वर

परी ये नावेची नवलगती । वरी चढले ते बुडती । तळीं राहिले ते तरती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २६ ॥ दीनांचा कळवळा पहा हो । हाचि मुख्यत्वें तरणोपावो । त्या कळवळ्याचा अभिप्रावो । स्वयें देवो सांगत ॥ २७ ॥

अन्नं हि प्राणिनां प्राण आर्तानां शरणं त्वहम् । धर्मो वित्तं नृणां प्रेत्य सन्तोऽर्वाग्बिभ्यतोऽरणम् ॥ ३३॥

जेवीं अन्नेंवीण प्राण । सर्वथा न वांचती जाण । प्राण्यांचें प्राणपोषण । करावया सामर्थ्य पूर्ण अन्नीं नांदे ॥ २८ ॥ जोडली धर्माची संपत्ती । ते इहलोकीं होय रक्षिती । तेवीं धर्मधन देहांतीं । उत्तम गतिदायक ॥ २९ ॥ संसारीं पीडिले दारुण । त्रिविध तापें तापले पूर्ण । ऐसिया शरणागतां शरण्य । मी नारायण रक्षिता ॥ ४३० ॥ माझें करितां नामस्मरण । सहजें निवारे जन्ममरण । त्या मज रिघालिया शरण । बाधी दुःख कोण बापुडें ॥ ३१ ॥ दुःखभय न पावतां आधीं । जिंहीं साधु सेविले सद्बुद्धीं । त्यांसी भवभयाची आधिव्याधी । जाण त्रिशुद्धी बाधीना ॥ ३२ ॥ प्राणियांसी होतां पतन । भाग्यें भेटल्या सज्जन । निजकृपेनें अधोगमन । जन्ममरण छेदिती ॥ ३३ ॥ संसार तरावया जाण । सत्संगतीचि प्रमाण । त्यांचे भावें धरितां चरण । दीनोद्धरण त्यांचेनी ॥ ३४ ॥

सन्तो दिशन्ति चक्षूंषि बहिरर्कः समुत्थितः । देवता बान्धवाः सन्तः सन्त आत्माहऽमेव च ॥

जेवीं अंधारेंसीं सगळी राती । निजतेजें निरसी गभस्ती । सत्संगसूर्यप्राप्ती । अविद्येची निश्चितीं निरसी निशा ॥ ३५ ॥ बाह्य उगवल्या गभस्ती । चोरभयाची होय निवृत्ती । तेवीं जोडल्या सत्संगती । भवभय कल्पांतीं असेना ॥ ३६ ॥ बाह्य सूर्योदयकाळीं । पक्षी सांडिती आंसोळी । सत्संगसूर्याचे मेळीं । देहाची आंसोळी सांडिती जीव ॥३७॥ बाह्य सूर्याच्या किरणीं । हर्षें विकासे कमळिणी । सत्संगसूर्याचे मिळणीं ।

चढले ते बुडतात; आणि तळाशीं राहिलेले तरतात. उद्धवा ! तूं हें अगदीं निश्चित समज. २६ दीनांचा कळवळा हाच खरोखर तरणोपाय आहे. त्या कळवळ्याचा हेतु श्रीहरि सांगत आहे. ४२७.

यथा अन्नं हि प्राणिनां प्राणः तु आर्तानां अहं शरणं धर्मः नृणां प्रेत्य वित्तं तथा सन्तः अवाक् बिभ्यतः अरणं—ज्याप्रमाणें अन्नच प्राण्यांचें जीवन आहे, मीच आर्तांचें रक्षण आहें, धर्मच मनुष्याचें परलोकांतील धन आहे, त्याप्रमाणें संतच संसारतापाला भिणाऱ्या पुरुषांचें रक्षण करणारे आहेत. ३३.

अन्नावांचून प्राण कधींहि वांचत नाहींत. प्राणिमात्रांचें पोषण करण्याचें पूर्ण सामर्थ्य अन्नांत असतें. २८ त्याप्रमाणें मनुष्यानें मिळविलेली धर्मरूपी संपत्ति त्याचें या लोकीं रक्षण करिते आणि मरणोत्तर उत्तम गति देते. २९ संसारांत भयंकर त्रिविध तापानें पीडलेल्या व मला शरण आलेल्या जीवांचा रक्षण करणारा मी एक नारायणच आहें. ४३० माझें नामस्मरण केलें असतां जन्म-मरणाचें सहज निवारण होतें. अशा मला शरण आल्यावर कोणतें दुःख बाधूं शकेल ! ३१ दुःखाचें भय बाधण्याच्या आधींच ज्यांनीं सद्बुद्धीनें साधूंची सेवा केली आहे, त्यांस भवभयाची आधि-व्याधि मुळींच बाधत नाहीं. ३२ प्राणी अधोगतीला जात असतां सुदैवानें त्यांस एखादा साधु-संत भेटला तर त्याच्या कृपेमुळें त्यांचा अधःपात व जन्म-मरण हीं दोन्ही टळतात. ३३ या संसारांतून तरून जाण्यास संतसंगति हाच मोठा आश्रय आहे. संतांचे चरण भक्तिभावानें धरिलें असतां दीनांचा उद्धार होतो. ४३४.

सन्तः चक्षूंषि दिशंति—संत सगुण-निर्गुण ज्ञान देतात. अर्कः समुत्थितः अपि बहिः—सूर्य जरी चांगला उदय पावला तरी तो बाहेरच असतो (व तोहि नुस्ता चक्षुच आहे.) संतः देवताः बान्धवाः—पण संत देवता व बान्धव आहेत. संतः आत्मा अहं एव च—सन्तच आत्मा व मी आहें. ३४.

सूर्य जसा आपल्या प्रकाशानें अंधारासह सगळ्या रात्रीला घालवितो, त्याप्रमाणें सत्सगरूपी सूर्य अविद्यारूपी रात्रीचा नाश करितो. ३५ सूर्योदय होतांच चोरांचें भय जसें नाहींसें होते, त्याप्रमाणें सत्संग लाभतांच भवभयांचें निरसन होतें. ३६ लौकिक सूर्य उगवतांच पक्षी आपलीं घरटीं सोडून जसे बाहेर पडतात; तसा जीव सत्संगाचा उदय होतांच आपलें देहरूपी घरटें सोडितो. ३७ सूर्यकिरणांनीं कमलिनीचा जसा विकास होतो,

निर्विकल्प कमळिणी विकासे ॥ ३८ ॥ सूर्य उगवलिया गगनीं । चक्रवाकें मिळती मिळणीं । तेवीं सत्संग पावोनी । जीव शिव दोनी एकवटती ॥ ३९ ॥ बाह्य सूर्याचे पहांटेसी । पांथिक चालती स्वग्रामासी । सत्संगसूर्याचे प्रकाशीं । मुमुक्षु निजधामासी पावती ॥ ४४० ॥ बाह्य सूर्याचे उदयस्थितीं । कर्माची चाले कर्मगती । सत्संगसूर्याचे संगतीं । निष्कर्मप्रवृत्ति प्रवर्ते ॥ ४१ ॥ सूर्यबिंबाचे उदयसंधीं । अर्घ्यदानादि जे वेदविधी । सत्संगसूर्याचे संबंधीं । दीजे देहबुद्धी तिलांजळी ॥ ४२ ॥ सूर्य-उदयाचिया प्राप्ती । याज्ञिक होमातें हविती । तेवीं सत्संगसूर्यस्थिती । अहंता हविती ज्ञानाग्नीं ॥ ४३ ॥ सूर्य उगवूनि आकाशीं । जगाची जड निद्रा निरसी । संत उगवूनि चिदाकाशीं । जीवां चित्प्रकाशीं प्रबोधी ॥ ४४ ॥ हो कां साधु सूर्यासमान । हें बोलणें निलाग हीन । सूर्यो पावे अस्तमान । साधु प्रकाशमान सर्वदा ॥ ४५ ॥ सूर्यासी आच्छादीं आभाळ । साधु सदा जनीं निर्मळ । सूर्यासी भ्रमणकाळ । साधु अचंचळ भ्रमणरहित ॥ ४६ ॥ ग्रहणकाळाचा लवलाहो । पावतां सूर्यातें ग्रासी राहो । साधु ग्रहांचा पुसोनि ठावो । स्वानंदें पहा हो नांदती ॥ ४७ ॥ धुई दाटतां प्रबळ । तेणें आच्छादे रवि-मंडळ । तम धूम मोहपडळ । साधूंसी अळुमाळ बांधीना ॥ ४८ ॥ सूर्य निजकिरणें सर्वांतें तावी । साधु निजांगें जग निववीं । सूर्य सर्वांतें क्षयो दावी । साधू अक्षयी करी निजबोधें ॥ ४९ ॥ सूर्यो साह्य झालिया दृष्टी । दृश्याकारें उघडे सृष्टी । सत्संग साह्य झालिया सृष्टीं । चिन्मात्रें सृष्टी ठसावे ॥ ४५० ॥ विवेकें विचारितां देख । सूर्याहूनि साधु अधिक । साधु धरातळीं ज्ञानार्क । भवाब्धि तारक निजसंगियां ॥ ५१ ॥ पृथ्वीतळीं देवता साधू । साधु दीनांचे सखे बंधू । साधुरूपें मी परमानन्दू । जाण प्रसिध्द परमात्मा ॥ ५२ ॥ देवां दीजे बळिअवदान । तेव्हां देव होती प्रसन्न । कृपातारक निजसज्जन । दयाळु

त्याप्रमाणें सत्संगरूपी सूर्याच्या संयोगानें निर्विकल्प कमलिनी उमलते. ३७ आकाशांत सूर्योदय होतांच चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें जसें प्रेमानें परस्परांस भेटतें. (चक्रवाकाची नर-मादी रात्र होतांच वियुक्त होतात व दिवसा त्यांची गांठ पडते) ३९ तसें सत्संगानें जीव-शिव या दोघांचें ऐक्य होतें. सूर्योदयाची पहांट होतांच प्रवासी आपल्या मुक्कामाचा मार्ग आक्रमूं लागतात; सत्संगसूर्य प्रकाशतांच मुमुक्षु निजधामाला जातात. ४४० लौकिक सूर्य उगवतांच कर्माची कर्मगति सुरू होते; सत्संगसूर्याच्या उदयानें भक्तांची निष्कर्माकडे प्रवृत्ति होते, ४१ गृहस्थ सूर्योदयाचेवेळीं मंत्रयुक्त अर्घ्यदानादि देतात. भक्त सत्संग लाभतांच देहबुद्धीची तिलांजलि देतात. (म्ह० देहच मी या बुद्धीचा लोप होतो.) ४२ सूर्योदयाच्या वेळीं याज्ञिक होम देतात. सत्संगतीच्या वेळीं ज्ञानाग्नीमध्यें अहंकाराचा होम होतो. ४३ सूर्य आकाशांत उगवून जड जगाची निद्रा घालवितो. संतरूपी सूर्य चिदाकाशांत व्यक्त होऊन जीवांना ज्ञानाचा उपदेश करितो. ४४ सारांश, साधु सूर्यासारखे होत. ही उपमाहि फोलच आहे, कारण सूर्याला अस्त आहे व संत सदा-सर्वदा प्रकाशमान आहेत. ४५ सूर्याला अभ्रें आच्छादित करितात, पण साधु निरंतर निर्मल असतात. सूर्य सतत फिरत असतो, पण साधू निश्चल असतात. ४६ ग्रहणाच्या वेळीं राहू सूर्याला ग्रासून टाकितो, पण साधु ग्रहांचा चुराडा करून स्वानंदांत रहात असतात. ४७ दाट धुकें पसरलें म्हणजे सगळें सूर्यमंडळ झांकून जातें, परंतु अंधार, धुकें, मोहाचें पटल हीं साधूच्या आड केव्हांहि येत नाहींत. ४८ सूर्य आपल्या अंगच्या उष्णतेनें सर्वांना ताप देतो, पण साधु आपल्या थंड स्वभावानें सर्वांना शांत करितो. सूर्य सर्वांची नश्वरता दाखवितो. साधू आपल्या उपदेशानें सर्वांना अक्षय करितो. ४९ दृष्टीला सूर्याचें साह्य झालें म्हणजे सगळी सृष्टि दृश्याकारानें दिसूं लागते व सत्संगाचें साह्य झालें म्हणजे सृष्टि चिन्मात्र दिसूं लागते. ४५० याप्रमाणें विवेकदृष्टीनें पाहिलें असतां सूर्याहून साधूची योग्यता अधिक ठरते. साधु पृथ्वीवरील ज्ञानसूर्य आहे. तो आपल्या संगतीनें संसारसागराच्या पार नेतो. ५१ या सृष्टीमध्यें साधुच देवता आहेत. साधु दीनजनाचे सख्खे बंधु आहेत. साधुरूपानें मीं आनंदरूप परमात्माच प्रकट होतों. ५२

पूर्ण दीनांचे ॥ ५३ ॥ सुहृद सखे सगोत्र बंधू । द्रव्यलोभें भजनसंबंधू । निर्लोभें कृपाळु साधू । सखे बंधू दीनांचे ॥ ५४ ॥ संत केवळ कृपेचे दीप । संत तें माझें निजस्वरूप । यालागीं सत्संगें फिटे पाप । होती निष्पाप साधक ॥ ५५ ॥ निष्पाप करूनि साधकांसी । ब्रह्मस्वरूपता देती त्यांसी । ऐसें कृपाळुत्व साधूंपाशीं । जाण निश्चयेंसीं उद्धवा ॥ ५६ ॥ मी निर्गुणत्वें ब्रह्म पूर्ण । साधू चालतेंबोलतें ब्रह्म जाण । तयांसी रिघालिया शरण । जन्ममरण बाधेना ॥ ५७॥ साधूंसी सद्भावें शरण । रिघाल्या नुरे जन्ममरण । साधु शरणागतां शरण्य । सत्य जाण उद्धवा ॥ ५८ ॥ भावें धरिलिया सत्संगती । संसारिया होय निर्मुक्ती । हें प्रतिज्ञापूर्वक श्रीपती । उद्धवाप्रती बोलिला ॥ ५९ ॥ सद्भावेंसीं सत्संगती । धरितां घरा ये ब्रह्मस्थिती । हें निजवर्म उद्धवाप्रती । देवें अध्यायांतीं निरूपिलें ॥ ४६० ॥ परम विरक्तीचें कारण । तें हें पुरूरवाप्रकरण । उपसंहारें श्रीकृष्ण । अध्यायू जाण संपवी ॥ ॥ ६१ ॥

वैतसेनस्ततोऽप्येवमुर्वश्या लोकनिःस्पृहः । मुक्तसङ्गो महीमेतामात्मारामश्चचार ह ॥ ३५ ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे ऐलगीतं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

पूर्वीं सूर्यवंश प्रसिद्ध । तेथ सोमवंशाचा संबंध । 'वैतसेन' श्लोकींचें पद । लावूनि गोविंद बोलिला ॥ ६२ ॥ उमावनीं अतिएकांत । तेथ उमा आणि उमाकांत । विगतवासेंसीं क्रीडत । स्वानंद-युक्त स्वलीला ॥ ६३ ॥ तेथ शिवाचे दर्शनासी । अवचटें आले सप्तऋषी । लज्जा उपजली पार्वतीसी । तिणें त्या वनासी शापिलें ॥ ६४ ॥ जो पुरुष या वनाआंत । येईल तो हो स्त्रीरूप एथ । ऐसा शाप क्रोधयुक्त । वदली निश्चित जगदंबा ॥ ६५ ॥ तेथ राजा सुद्युम्न सूर्यवंशी । नेणोनियां शापप्रभावासी ।

देवतांना जेव्हां बलिदान द्यावें तेव्हां त्या प्रसन्न होतात; पण साधु दीनदयाळ असल्यामुळें आपल्या कृपादृष्टीनेंच दीनांचा उद्धार करितात. ५३ सुहृद्, सखे, बांधव हे सगळे द्रव्यलोभानें आप्तांशीं स्नेहसंबंध ठेवितात; पण साधु निर्लोभी व कृपाळु असल्यामुळें ते दीनांचे खरे मित्र व बंधु आहेत. ५४ ते संत कृपेचे दीपच होत. ते माझेंच स्वरूप आहेत, म्हणून सत्संगतीनें पापाचें निरसन होतें व साधक निष्पाप होतो. ५५ उद्धवा ! याप्रमाणें साधु साधकाला निष्पाप करून त्यास ब्रह्मस्वरूपता देतात. इतका कृपाळुपणा त्याच्यापाशीं असतो, ५६ हें तूं निश्चित समज. मी निर्गुणानें पूर्ण ब्रह्म आहें व साधु चालतें बोलतें ब्रह्म आहेत, त्यांस शरण गेल्यास जन्म-मरण बाधत नाहीं. ५७ उद्धवा ! साधूंस सद्भावानें शरण गेलें असतां जन्म-मरणाचें नांवहि उरत नाहीं. साधु शरणांगताचा आश्रय आहे, हें सत्य जाण. ५८ भक्तिभावानें सत्संगति धरिली असतां संसारी जन मुक्त होतात, असें श्रीहरीनें प्रतिज्ञा-पूर्वक उद्धवाला सांगितलें ५९ सद्भावानें सत्संगति धरली असतां ब्रह्मपद घरीं चालून येतें. श्रीकृष्णानें हें आपलें रहस्य उद्धवाला या अध्यायाच्या शेवटीं सांगितलें. ४६० परम विरक्तीचें निमित्त असें हें पुरूरवाराजाचें आख्यान सांगून श्रीकृष्ण आतां त्याचा उपसंहार करून हा अध्याय पुरा करीत आहे. ४६१.

—अध्यायार्थाचा उपसंहार करितात—

वैतसेनः एवं उर्वश्याः लोकनिःस्पृहः ततः अपि मुक्तसङ्गः आत्मारामः एतां महीं चचार ह—पुरूरवाराजा याप्रमाणें उर्वशीच्या दर्शनाविषयींहि निःस्पृह होऊन आणि सत्संगामुळें सर्वसंगशून्य व आत्माराम होऊन या पृथ्वीवर यथेष्ट संचार करूं लागला. ३५.

पूर्वीं प्रसिद्ध सूर्यवंशांत सोमवंशाचा संबंध आला आहे. म्हणून श्लोकामध्यें श्रीकृष्णानें पुरूरवा राजाला 'वैतसेन' म्हटलें आहे. ६२ एकदा पार्वतीच्या क्रीडावनांत शंकर आणि पार्वती एकान्तांत वस्त्ररहित होऊन आनंदानें क्रीडा करीत होतों ६३ तेथें अकस्मात् शंकराच्या दर्शनाला सप्तऋषि आले. त्यांना पाहून पार्वतीला लाज वाटली व तिनें त्या वनाला शाप दिला. ६४ 'या वनांत जो पुरुष पाय ठेवील तो तत्काळ स्त्री होईल, असें जगदंबा क्रोधानें बोलली. ६५ कांहीं दिवसांनीं हा शापाचा प्रभाव माहित नसल्यामुळें सूर्यवंशी सुद्युम्न राजा

पारधी आला त्या वनासी । सकळ सेनेसी सन्नद्ध ॥ ६६ ॥ रिघतांचि त्या वनाआंत । पुरुषत्व पालटलें तेथ । बाप शापाचें सामर्थ्य । झाले समस्त स्त्रीरूप ॥ ६७ ॥ तेथ पुरुषत्वाची आठवण । निःशेष विसरलें मन । आपण पूर्वीं होतों कोण । हेंही संपूर्ण विसरले ॥ ६८ ॥ अश्व झाले अश्विनी । हस्ती झाले हस्तिणी । पुरुष झाले कामिनी । तत्क्षणीं त्या वनांत ॥ ६९ ॥ तेथ पुरुषकामें कामासक्ती । अनेक अनेकां पुरुषांप्रती । स्त्रिया गेलिया त्या समस्ती । अतिकामरतीं संभोगा ॥ ४७० ॥ राजा सुद्युम्न झाला नारी । अतिसुकुमार सुंदरी । तो सोमपुत्र बुधातें वरी । अतिप्रीती करी भाळोनि ॥ ७१ ॥ बुधें सुद्युम्न देखोनि नारी । तो भुलला स्त्रीकामकरीं । एवं अतिप्रीती परस्परीं । येरयेरावरी भाळलीं ॥ ७२ ॥ बुध महाराजचूडामणी । तो सुद्युम्नातें स्त्रीत्वें पर्णी । केलीं पटाचो निजराणी । बाप करणी कर्माची ॥ ७३ ॥ सुद्युम्नबुधवीर्यैकरीं । पुरूरवा जन्मे त्यांचे उदरीं । एवं सूर्यवंशामाझारीं । सोमवंश यापरी संचरला ॥ ७४ ॥ हे सोमवंशींची आद्यकथा । एथूनि सोमवंश वाढता । श्रीकृष्ण बोलिला ध्वनितार्था । तेचि म्यां कथा उपलविली ॥ ७५ ॥ सुद्युम्न झाला बुधाची नारी । मागें सूर्यवंशामाझारीं । नाहीं राज्यासी अधिकारी । संकट भारी वोढवलें ॥ ७६ ॥ ते सूर्यवंशींच्या कुळगुरू । वसिष्ठ महायोगीश्वरू । तेणें करूनि अत्यादरू । गौरीहरू प्रार्थिलीं ॥ ७७ ॥ प्रसन्न करूनि पार्वतीसी । मागे सुद्युम्नाच्या उच्छापासी । येरी सांगे महादेवासी । तुम्हीं वसिष्ठासी बुझवावें ॥ ७८ ॥ जें भवानीचें शापवचन । तें कदा अन्यथा नव्हे जाण । धरावया वसिष्ठाचें मन । नवलविंदान शिवें केलें ॥ ७९ ॥ शुक्लपक्षीं सुद्युम्नासी । पुरुषत्व प्राप्त होईल त्यासी । कृष्णपक्षीं बुधापाशीं । स्त्रीभावेंसीं वर्तेल ॥ ४८० ॥ पक्षें पुरुष पक्षें नारी । ऐशिया उच्छापाची परी । शिवें करूनि कृपेकरीं । केला अधिकारी निजराज्या ॥ ८१ ॥

आपल्या सर्व सेनेसह मृगयेसाठीं त्या वनांत आला. ६६ त्यानें त्या वनांत प्रवेश करितांच तत्काल त्याचें पुरुषरूप पालटून त्याला स्त्रीचें रूप प्राप्त झालें. ६७ शापाचें सामर्थ्य केवढें अगाध असतें, पहा ! ते सगळे लोक स्त्रीरूपी बनले. त्या वेळीं त्यांना आपल्या पुरुषत्वाचा विसर पडला. ६८ आपण पूर्वीं कोण होतों, याचेंहि स्मरण राहिलें नाहीं. त्या वनांत तत्काळ घोडे घोड्या बनल्या, ६९ हत्तींच्या हत्तिणी झाल्या व पुरुषांच्या स्त्रिया बनल्या. तेव्हां त्या स्त्रिया कामासक्तीनें पुरुषांच्या मागें लागल्या व त्या सगळ्या स्त्रिया कामातुर होऊन चोहोंकडे निघून गेल्या. ४७० राजा सुद्युम्न अत्यंत सुकुमार सुंदर स्त्री झाला होता. त्यानें सोमपुत्र बुधावर मोहित होऊन त्याला वरिलें. ७१ बुधहि सुद्युम्नाच्या स्त्रीरूपाला भुलला. अशाप्रकारें तीं दोघें परस्परांवर अत्यंत लुब्ध झालीं. ७२ राजांचा मुकुटमणि अशा महाराज बुधानें स्त्रीरूपी सुद्युम्नाबरोबर विवाह करून तिला आपली पट्टराणी केली. देवाची करणी किती विचित्र आहे, पहा. ७३ त्या दोघांच्या संयोगापासून पुरूरवाचा जन्म झाला. अशा प्रकारें सूर्यवंशांत सोमवंशाचा संचार झाला. (वैवस्वत राजाचा पुत्र इलराजा पार्वतीच्या शापानें स्त्रीत्व पावला, तेव्हां त्याला ‘ इला ’ नांव प्राप्त झालें. त्या इलेचा पुत्र पुरूरवा ऐल होय) ७४ ही सोमवंशाची मूळ कथा आहे. याप्रमाणें सोमवंश वाढला. तो वृत्तान्त श्रीकृष्णानें संक्षेपांत सांगितला होता, त्याचाच मीं थोडासा विस्तार केला, ७५ सुद्युम्नाला स्त्रीरूप प्राप्त होऊन तो बुधपत्नी झाल्यामुळें त्याच्या मागें राज्याला कोणी वारस राहिला नाहीं व त्यामुळें मोठें संकट ओढवलें. ७६ तेव्हां सूर्यवंशाचा कुलगुरु जो महान् योगी वसिष्ठऋषि त्यानें मोठ्या भक्तीनें गौरीहराची प्रार्थना केली. ७७ व पार्वतीला प्रसन्न करून ‘ सुद्युम्नाला उःशाप देण्याविषयीं विनविलें. त्या वेळी तिनें श्रीशंकराला वसिष्ठाची समजूत घालण्यास सांगितलें. ७८ पार्वतीचें वचन खोटें न करितां वसिष्ठाच्या समजुतीसाठीं शंकरानें एक विलक्षण युक्ति योजिली. ७९ त्यानें सांगितलें कीं, शुक्लपक्षांत सुद्युम्न पुरुष होईल व कृष्णपक्षांत स्त्री होऊन बुधाबरोबर विलास करील. ४८० याप्रमाणें एक पंधरवडा पुरुष व एक पंधरवडा स्त्री असा विभाग करून शिवानें त्याच्या राज्यास अधिकारी करून दिला. ८१

पुरुषत्व पावल्या सुद्युम्नासी । तें पुरुषत्व नावडे त्यासी । स्त्रीसंभोगें बुधापाशीं । अतिप्रीतीसी लाधला ॥ ८२ ॥ स्वर्गअप्सरा आलिया पाशीं । त्याही नावडती सुद्युम्नासी । त्याहूनि प्रीति बुधापाशीं । स्त्रीभावेंसीं अनिवार ॥ ८३ ॥ बुधासींही स्वर्गांगना । संभोगीं न येती मना । ऐसि अतिप्रीति सुद्युम्ना । स्त्रीभोगें जाणा विगुंतलीं ॥ ८४ ॥ पुरुषीं पुरुषत्वाची रती । भोगूं जाणें मी श्रीपती । इतर बापुडीं तीं किती । स्त्रीदेहासक्तीं भुललीं ॥ ८५ ॥ स्त्रीदेहीं जो आत्मा असे । तो भोगिजे म्यां हृषीकेशें । इतरांसी स्त्रीदेहींचें पिसें विषयावेशें भुलोनी ॥ ८६ ॥ असो हें सांगावें किती । कामीं निष्कामतेची रती । ते मी जाणें रमापती । कां जाणती निजानुभवी ॥ ८७ ॥ स्त्रीदेहीं अतिआसक्ती । पुरुषत्वापरीस कामरती । त्या स्त्रीकामाची निजनिवृत्ती । जाण निश्चितीं सत्संगें ॥ ८८ ॥ वसिष्ठाचिये सत्संगती । झाली स्त्रीभावाची निवृत्ती । सुद्युम्न पावला पुरुषत्वप्राप्ती । धन्य त्रिजगती सत्संग ॥ ८९ ॥ पुरुषत्व पावोनि सुद्युम्न । निजनगरा येतां जाण । स्त्रीभावें नष्टले सैन्य । एकला आपण स्वयें आला ॥४९०॥ एवं निःशेष विगतसैन्य । यालागीं नांवें वीतसेन । त्या वीतसेनाचा पुत्र जाण । वैतसेन पुरूरवा ॥ ९१ ॥ तेणें निजात्मता अतिविरक्ती । सांडूनि स्वर्गभोगसंपत्ती । त्यजूनि उर्वशीकामासक्ती । आत्मारास्थिती पावला ॥ ९२ ॥ आत्माराम निजस्थिती । मिथ्या देहसंग सांगाती । निजात्मबोधें त्रिजगती । स्वानंदें नृपचि विचरत ॥ ९३ ॥ जेथें जेथें पाऊल उठी । तेथें तेथें होती सुखाच्या कोटि । स्वानंदें कोंदली सृष्टी । ब्रह्मदृष्टी विचरतू ॥ ९४ ॥ ब्रह्मीं विचरतां ब्रह्मपणें । ब्रह्मरूप झालें जिणें । विसरला जिणें मरणें । पूर्णी पूर्णपणें परिपूर्ण ॥ ९५ ॥ हें उर्वशीपुरूरवोपाख्यान । जो स्वयें ऐके सावधान । तैं दोष जाती अगम्यागमन । विरक्ति संपूर्ण साधकां ॥ ९६ ॥ यापरी वैराग्ययुक्तीं । राजा पावला ब्रह्मप्राप्ती । वैराग्य उपजे सत्संगतीं । सत्संगें विरक्ती मद्भजनें ॥ ९७ ॥ सद्भावें करितां माझी भक्ती । साधकां उपजे विरक्ती । ऐसें बोलिला श्रीपती । तें

परंतु सुद्युम्नाला पुरुषत्व आवडेना. त्याला स्त्री होऊन बुधाशीं विलास भोगण्यांतच सुख वाटूं लागलें. ८२ स्वर्गांतील अप्सरा जरी आल्या तरी सुद्युम्नाला त्याहि आवडेनात. त्यांच्याहून तो बुधावर अत्यंत आसक्त झाला. ८३ बुधालाहि सुद्युम्नापुढें अप्सराहि तुच्छ वाटत. इतकीं तीं दोघें परस्परांवर अनुरक्त होतीं. ८३ पुरुषानें पुरुषावर आसक्त होण्याचें वर्म मी हरीच काय तो एक जाणतों. इतर बिचारे प्राणी स्त्रीदेहावर भाळतात. ८५ मी श्रीपति स्त्रीदेहांतील आत्म्याचा भोग घेतो व इतर लोक विषयेच्छेनें स्त्रीशरीरासाठीं वेडे होतात. ८६ याचें वर्णन कोठवर करावें ! आत्मा कामामध्यें निष्काम कसा असतो, हें मी एक श्रीहरि जाणें किंवा जे अनुभवी आहेत तेच जाणतात. ८७ स्त्रीदेहावरील आसक्तीची निवृत्ति केवल सत्संगानेंच होते. वसिष्ठाच्या संगतीनें सुद्युम्नाला पुनः पुरुषत्व लाधलें. यास्तव सत्संग त्रिभुवनांत धन्य होय. सुद्युम्नाला पुरुषत्व प्राप्त होतांच तो आपल्या नगरास जाण्यास निघाला. परंतु त्याचें सर्व सैन्य स्त्रीरूपानें नाश पावल्यामुळें तो एकटाच आपल्या नगरांत परत आला. ४९० अशा रीतीनें त्याचें निःशेष 'विगत' म्ह० नष्ट झालें म्हणून त्याला 'वीतसेन' हें नांव पडलें. त्या वीतसेनाचा जो पुत्र तोच हा वैतसेन पुरूरवा राजा होय. ९१ तो आत्मस्वरूप जाणून विरक्त झाला. स्वर्गांतील सुखोपभोग व उर्वशीवरील आसक्ति हीं दोन्हीं सोडून तो आत्मस्वरूपांत तल्लीन झाला. ९२ अशा प्रकारें आत्मस्वरूपांत स्थित होऊन व देहावरील आसक्ति टाकून तो राजा आत्मज्ञानांत तल्लीन होऊन पृथ्वीवर संचार करूं लागला. ९३ तो जिकडे पाऊल ठेवीत असे, तिकडे असंख्य सुखाच्या राशी पडत असत. तो ब्रह्मदृष्टीनें संचार करीत असतां सगळी सृष्टि ब्रह्मानंदानें व्यापून गेली. ९४ ब्रह्मभावनेनें ब्रह्मामध्यें संचार करीत असतांना त्याचें जीवितच ब्रह्मरूप झालें व जन्म-मरणाला विसरून पूर्णपणें पूर्ण ब्रह्मामध्यें परिपूर्णरूप होऊन राहिला. ९५ हें उर्वशी-पुरूरव्याचें आख्यान जो स्वतः सावधान चित्तानें श्रवण करितो त्या साधकाचे अगम्यगमनासारखे दोष नाहींसे होतात व त्याला पूर्ण विरक्ति येते. ८६ अशा तीव्र वैराग्यानेंच राजाला ब्रह्मप्राप्ति झाली. सत्संगानें विरक्ति उत्पन्न होते व माझ्या भक्तीनें वैराग्य व सत्संग हीं दोन्ही लाभतात. ९७ सद्भावानें माझी भक्ति केली असतां साधकाला विरक्ति येते. हें श्रीकृष्णाचें

उद्धवें चित्तीं दृढ धरिलें ॥ ९८ ॥ ते भजनक्रियेचा प्रश्न । पुढिले अध्यायीं जाण । उद्धव पुसेल आपण । जेणें श्रीकृष्ण संतोषे ॥ ९९ ॥ उद्धव पुसेल गोड गोठी । जेणें श्रीकृष्ण सुखावे पोटीं । तेणें स्वानंदें निजपुष्टी । भजनहातवटी सांगेल ॥ ५०० ॥ उपासनाकांडरहस्य पूर्ण । मुख्य क्रियायोगनिरूपण । समूळ आगमलक्षण । स्वमुखें श्रीकृष्ण सांगेल ॥ १ ॥ ते कथेसी अवधान । श्रोतां द्यावें सावधान । एका तुष्टला जनार्दन । स्वानंदघन निजबोधें ॥ ५०२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीका ऐलगीतोपाख्यानं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे ऐलगीतं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

अध्याय सत्ताविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो देव सहज निज । तूं चतुर्भुज अष्टभुज । तूं विश्वात्मा विश्वभुज । गुरुत्वें तुज गौरव ॥ १ ॥ निजशिष्याचिया भावार्था । तूं गुरुनामें अभयदाता । अभय देऊनि तत्त्वतां । भवभयव्यथा निवारिसी ॥ २ ॥ निवारूनि निजजन्ममरण । आपण्या भेटसी आपण । तेव्हां गुरुशिष्यनामीं संपूर्ण । तुझें एकपण आभासे ॥ ३ ॥ तें एकपण पाहतां दिठीं । एका जनार्दनीं पडे मिठी । गुरुत्वें कोंदे सकळ सृष्टी । स्वानंदपुष्टीं जग नांदे ॥ ४ ॥ तो स्वानंदैकचिद्घन । जगद्गुरु जनार्दन । एका जनार्दना शरण । एकीं एकपण दृढ केलें ॥ ५ ॥ दृढ केलें जें एकपण । तेंही सद्गुरु

वचन उद्धवानें नीट लक्षांत ठेविलें. ९८ त्या भजनविधीचा प्रश्न उद्धव पुढील अध्यायांत विचारणार आहे. त्यामुळें कृष्णाला अत्यंत संतोष होईल. ९९ ज्यायोगें श्रीकृष्णाला आनंद होईल, असा गोड प्रश्न उद्धवानें विचारिला असतां तो त्या संतोषाच्या भरांत भजनाचा मार्ग सांगेल. ५०० उपासनाकांडाचें पूर्ण रहस्य, असें कर्ममार्गाचें मुख्य निरूपण व वेदाचें सर्व लक्षण आपल्या मुखानें सांगेल. १ त्या कथेकडे आतां श्रोत्यांनीं लक्ष द्यावें. स्वानंदघन एकनाथ-जनार्दन आत्मबोधानें संतुष्ट झाला आहे. ५०२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील
ऐलगीत नांवाचा सव्विसावा अध्याय समाप्त झाला.

हे सहज निजदेवा ! तुला नमस्कार असो. तूं चतुर्भुज, अष्टभुज आहेस. तूं विश्वात्मा विश्वभुज आहेस. तुझा गुरुत्वानेंच गौरव करितों. १ आपल्या शिष्यावरील भक्तिप्रेमासाठीं गुरूच्या नांवानें अभय देऊन भवभयाची व्यथा तूंच निवारितोस. २ जन्म-मरणांचें निवारण करून तूं स्वतःच स्वतःला भेटतोस. तेव्हां गुरु व शिष्य या नांवांनीं तुझें पूर्णपणें ऐक्य दिसतें. ३ तें ऐक्य दृष्टीस पडतांच एकनाथ व जनार्दन हें एकरूप होतात. ही सगळी सृष्टि गुरुत्वानें भरून जाते व सगळें जगत् स्वानंदांत नांदूं लागतें. ४ असा तो स्वानंदैकचिद्घन जगद्गुरु जनार्दन आहे. त्या जनार्दनाला एकनाथ शरण आहे. त्यानें एकामध्येंच एकपण दृढ केलें. ५ व तें दृढ केलेलें एकपणहि